# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मा.व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त-

**दिनांक- २७.१०.२०१५**

# अनुक्रमणिका

**त्रिसदस्य समिती सर्वसाधरण सभा** **दि.२७.१०.२०१५**

**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सकाळी ०८.०० वाजता**


| अ.नं. | विषय नं | विषय | पान नंबर |
|---|---|---|---|
| 1. | १ | दिनांक ०८.१०.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ०१ |
| 2. | २ | दिनांक १०.१०.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | ०१ |
| **(अ) प्रशासकीय मान्यतेचे विषय-** | | | |
| | | **श्री साईबाबा हॉस्पिटल** | |
| 3. | ३ | डॉ.मनोहर शिंदे, कॉर्डीओलॉजीस्ट (कंत्राटी) यांचे नेमणूक व मानधनाबाबत. | ०७ |
| 4. | ४ | कॉर्डीओलॉजीस्ट यांना पुनर्नेमणूक देणेबाबत. | ०८ |
| 5. | ५ | डॉ.आर.प्रभाकरराव, प्र.वैद्यकिय संचालक यांचेबाबत. | ०९ |
| 6. | ६ | डॉ.विजय बाळकृष्ण पाटील, उपवैद्यकीय संचालक यांचेबाबत. | ०९ |
| 7. | ७ | डॉ. गौरव वर्मा व डॉ.हरीष बजाज यांचे अर्जाबाबत. | ०९ |
| 8. | ८ | डॉ.सुभाष शामकुवर, निवासी वैद्यकिय अधिकारी व डॉ.मयुर म्हात्रे, न्युरोसर्जन यांचे परस्पर विरोधी तक्रार अर्जाबाबत. | १० |
| 9. | ९ | व्हिजीटींग पध्दतीने बालरोग तज्ञाची नेमणूक करणेबाबत. | ११ |
| 10. | १० | व्हिजीटींग पध्दतीने रुमॅटोलॉजीस्टची नेमणूक करणेबाबत. | १२ |
| 11. | ११ | व्हिजीटींग पध्दतीने गॅस्ट्रोएन्ट्रॉलॉजीस्टची नेमणूक करणेबाबत. | १२ |
| 12. | १२ | व्हिजीटींग पध्दतीने रेडीओलॉजीस्टची नेमणूक करणेबाबत. | १३ |
| 13. | १३ | कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने परुफ्युजनिस्ट घेणेस मान्यता मिळणेबाबत. | १३ |
| 14. | १४ | संस्थानचे रुग्णालयातील वैद्यकिय अधिका-यांचे रिक्त पदांवर व्हिजीटींग अथवा कंत्राटी पध्दतीने भरती करणेसाठी वर्तमानपत्र/ संस्थानचे संकेतस्थळावर जाहिर आवाहन करणेबाबत. | १४ |
| 15. | १५ | संस्थान रुग्णालयातील फिजिशियन पदावरील डॉक्टरांचे वेतनाबाबत. | १५ |
| 16. | १६ | श्री साईनाथ रुग्णालयातील पदव्युत्तर पदविकाधारक यांना तीन व पदव्युत्तर पदवीधारक वैद्यकीय अधिकारी यांना सहा वेतनवाढ देणेबाबत. | १६ |
| 17. | १७ | श्री साईबाबा हॉस्पिटलमधील काही वार्डचे बेडचार्जेस व टीएसआर वॉर्डचे शस्त्रक्रिया सेवांच्या सुधारीत दरपत्रकास मान्यता मिळणेबाबत. | १७ |
| 18. | १८ | श्री साईबाबा रुग्णालयातील दंत विभागासाठी मटेरीयल खरेदीबाबत. | १९ |
| 19. | १९ | श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.नं.२ करीता Syringe Pumps खरेदी करणेबाबत. | २० |
| 20. | २० | श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.नं.२ करीता Cautery Machine खरेदी करणेबाबत. | २१ |
| 21. | २१ | श्री साईबाबा रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटर करीता S.S.Tray आणि S.S.Bowl खरेदी करणेबाबत. | २१ |
| 22. | २२ | श्री साईबाबा रुग्णालयातील Neuro O.T. या विभागाकरीता Bipolar Cable व Bayonet forcep खरेदी करणेबाबत. | २२ |
| 23. | २३ | श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी.या विभागाकरीता Knife of otis Urethrotomy व Telescope Bridge Nipple खरेदी करणे बाबत. | २३ |
| 24. | २४ | श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी.या विभागाकरीता Instrument खरेदी करणे बाबत. | २३ |
| 25. | २५ | श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागाकरीता Syringe Pump खरेदी करणेकामी प्राप्त कमर्शियल निविदा उघडून निर्णय होणे बाबत. | २४ |
| 26. | २६ | श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागाकरीता Defibrillator Machine खरेदी करणेकामी प्राप्त कमर्शिअल निविदा उघडून निर्णय होणे बाबत. | २५ |
| 27. | २७ | श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.नं.२ Imported Operation Table with Accessories करीता खरेदी करणेबाबत. | २७ |
| 28. | २८ | न्युरो ऑपरेटींग मायक्रोपचे झेनॉन लॅम्प खरेदीबाबत. | २७ |
| 29. | २९ | श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणेबाबत. | २८ |
| 30. | ३० | १० MBPS Internet Lease Line चालू ठेवणेस व नवीन 5 MBPS Internet Lease Line घेणेबाबत. | २९ |
| 31. | ३१ | श्री साईनाथ रुग्णालयातील 4 Body Mortuary Cabinet Buyback करुन 6 Body Mortuary Cabinet नवीन खरेदीबाबत. | २९ |
| 32. | ३२ | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यक असणारे लिनन खरेदीचे कापड मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या.मुंबई यांचेकडून खरेदी करणेबाबत. | ३१ |
| 33. | ३३ | बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिनचे (Konelab 20i) PM Kit खरेदी करणेबाबत. | ३३ |

| अ.नं. | विषय नं | विषय | पान नंबर |
|---|---|---|---|
| 34. | ३४ | सी.व्ही.टी.एस.ओ.टी.क्र.०२ मध्ये झालेल्या दुर्घटनेबाबत अहवाल. | ३३ |
| 35. | ३५ | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये अत्याधुनिक संगणकीकृत करणेकामी साहीत्य खरेदी करणेबाबत. | ३५ |
| | | **श्री साईनाथ रुग्णालय** | |
| 36. | ३६ | विरार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, विरार येथील ०४ ज्यादा इंटर्न घेणेबाबत. | ३५ |
| | | **बांधकाम विभाग** | |
| 37. | ३७ | दिनांक ०१ ऑक्टोबर २०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सुरु होणार असल्याने शिर्डी व लगतच्या परीसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेकामी सल्लागार संस्था Tata Consulting Engineers Limited, Noida यांची नेमणूक होणेबाबत. | ३६ |
| 38. | ३८ | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१५ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत. | ३८ |
| 39. | ३९ | दिपावली सुट्टीचे कालावधीत तसेच डिसेंबर-२०१५ मधील नाताळ सुट्टी व नववर्षानिमीत्ताने होणारे गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत. | ४० |
| 40. | ४० | नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत मंदिर परिसर,साईप्रसादालय तसेच वाहनतळ व्यवस्थेचे ठिकाणी पत्राशेड मंडप,लॉकर्स व बॅरेकेडींग आदी अतिरिक्त व्यवस्थेबाबत. | ४१ |
| | | **कामगार विभाग** | |
| 41. | ४१ | श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटनेच्या वतीने दिनांक ०१.०९.२०१५ रोजीचे उपोषणाबाबत. | ४३ |
| 42. | ४२ | साईभजन गायनासाठी परदेशी दौरा जाणेकामी परवानगी मिळणेबाबत. | ४५ |
| | | **माहिती तंत्रज्ञान विभाग** | |
| 43. | ४३ | संस्थानचे सर्व विभागांचे कालबाहय व निकामी झालेले संगणके व संगणकीय (E-Scrap) साहित्य विक्री करणेबाबत. | ४६ |
| 44. | ४४ | संस्थानचे दैनंदिन कामकाजासाठी प्रिंटर्स संस्थानचे विहित पध्दतीने खरेदी करणेबाबत. | ४७ |
| 45. | ४५ | श्री साईबाबांचे ऑनलाईन प्रसाद खाजगी वेबसाईटव्दारे विक्रीबाबतचे प्रस्तावास मा.मुंबई हायकोर्टाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेबाबत. | ४८ |
| | | **श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर** | |
| 46. | ४६ | शैक्षणिक संकुलाकरीता ग्रथपालांना वेतनश्रेणी नेमणूक दिनांकापासून देणेबाबत. | ५३ |
| | | **मालमत्ता विभाग** | |
| 47. | ४७ | श्री साईबाबा संस्थानकडील मोकळया जागेस व जमीनीस कंपाऊंड करणेबाबत. | ५६ |
| | | **विद्युत विभाग** | |
| 48. | ४८ | श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे सन २०१५-२०१६ या कालावधीत वार्षिक कॉन्ट्रक्ट देणेस मान्यता मिळणेबाबत. | ५६ |
| | | **विधी विभाग** | |
| 49. | ४९ | मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा संस्थानचे पॅनलवर अॅडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी नियमावलीस मान्यता मिळणेबाबत. | ५८ |
| | | **पाणी पुरवठा विभाग** | |
| 50. | ५० | शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी श्री साई पोलीस विश्रामगृह यांचे नळ कनेक्शन मागणीबाबत. | ५९ |
| | | **बगीचा विभाग** | |
| 51. | ५१ | शिर्डी शहरातील रस्त्यांच्या कडेला शोभेची झाडे लावणेबाबत. | ६० |
| | | **मेकॅनिकल विभाग** | |
| 52. | ५२ | श्री साईबाबा हॉस्पिटल येथील ०३ लिफ्ट तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५००) येथील ०४ लिफ्ट अशा एकूण ०७ लिफ्ट बायबॅकचे शासन मान्यतेबाबत व बील अदा करणेबाबत. | ६१ |
| 53. | ५३ | जुने प्रसादालय येथील कॅन्टीन किचनकरीता एल.पी.गॅस पाईप लाईन बसविणेबाबत. | ६३ |
| | | **सामान्य प्रशासन** | |
| 54. | ५४ | विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत. | ६४ |
| 55. | ५५ | मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी तांत्रिक/ अतांत्रिक पदे सरळसेवेने भरती करणेकामी सादर केलेल्या पडताळणी अहवालाबाबत. | ६५ |
| | | **सामान्य प्रशासन वशी -५** | |
| 56. | ५६ | श्री रामनवमी उत्सव-२०१५ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | ६७ |
| 57. | ५७ | श्री विरभद्र महाराज, शिर्डी (बिरोबा बन) येथील कुस्ती हंगामासाठी रक्कम देणेबाबत. | ६७ |

| अ.नं. | विषय नं | विषय | पान नंबर |
|---|---|---|---|
| | | **खरेदी विभाग** | |
| 58. | ५८ | चनाडाळ व मुग यांच्या बिलाबाबत. | ६८ |
| 59. | ५९ | विद्युत विभागाचे वार्षिक साहित्य खरेदीबाबत. | ६८ |
| 60. | ६० | कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करणेबाबत. | ६८ |
| 61. | ६१ | साईआश्रम विभागाकरीता बेडशीट व उशीकव्हर खरेदी करणेबाबत | ६८ |
| 62. | ६२ | प्रसादालयाकरीता गहु खरेदी करणेबाबत. | ६८ |
| 63. | ६३ | सन २०१५-१६ गावरान तूप खरेदी. | ६९ |
| | | **भांडार विभाग** | |
| 64. | ६४ | देणगी रवा व आटयाबाबत. | ६९ |
| | | **संरक्षण विभाग** | |
| 65. | ६५ | पोलिस विभाग, साई मंदीर सुरक्षा यांना वॉकीटॉकी व रिपीटर मशिन देणेबाबत. | ६९ |
| 66. | ६६ | कुंभमेळा- २०१५ चे नियोजनाकामी खरेदी करण्यात आलेले सुरक्षा साहित्यांपैकी मुदतीत प्राप्त/ मुदतीनंतर प्राप्त/ आज अखेर प्राप्त न झालेले सुरक्षा साहित्यांबाबत. | ७० |
| 67. | ६७ | श्री क्षेत्र शिर्डी साईबाबा संस्थान येथे पार पडलेल्या गुरुपौर्णिमा उत्सवामध्ये भाविकांच्या दर्शन व्यवस्थेतील त्रुटीबाबत कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्राबाबत. | ७० |
| **आयत्या वेळेचे विषय-** | | | |
| | | **बांधकाम विभाग** | |
| 68. | ०१ | सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ मधिल गर्दीचे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरांत साईभक्तांसाठी करण्यात आलेल्या अतिरिक्त सोई-सुविधांकरीता झालेल्या खर्चाचा अहवाल मा.उच्च न्यायालयापूढे सादर करणेकामी मूदतवाढ मिळणेबाबत. | ७० |
| 69. | ०२ | मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत. | ७१ |

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१९/ २०१५** **दिनांक २७.१०.२०१५**

**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सकाळी ०८.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २७.१०.२०१५ रोजी सकाळी ०८.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ४१४१/ २०१५, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू मंगळवार दिनांक २७.१०.२०१५ रोजी सकाळी ०८.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.श्रीकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०८.१०.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३७६** दिनांक ०८.१०.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक १०.१०.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३७७** दिनांक १०.१०.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **साईनगर सबस्टेशन येथील इलेक्ट्रीक कंट्रोल पॅनेलमधील स्पेअरपार्ट खरेदी करणेकामी प्राप्त झालेली टेंडर उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक २४-०६-२०१५ चे सभेतील विषय नं.०२ निर्णय क्र.१६२ (०८) अन्वये साईनगर सबस्टेशन येथील इलेक्ट्रीक कंट्रोल पॅनेलमधील स्पेअरपार्ट खरेदी करणेकामी येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेकामी येणारे रक्कम रुपये ५१,४७९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दि.२७-०८-२०१५ रोजी दै.लोकमंथन, अहमदनगर व दि.२८-०८-२०१५ रोजी दै.महाराष्ट्र निरोप्या, नाशिक या वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दि.२८-०८-२०१५ ते दि.०७-०९-२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती. व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.१०-०९-२०१५ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार ०३ टेंडरची विक्री झालेली असून सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे तीन टेंडर प्राप्त झालेले आहेत. जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं., अंबड, नाशिक |
| ०२) | मे.पिणाकेश्वर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |

साईनगर सबस्टेशन येथील इलेक्ट्रीक कंट्रोल पॅनेलमधील स्पेअरपार्ट खरेदी करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ टेंडर्स आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित टेंडरधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१) | मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं., अंबड, नाशिक | ५०,८०९/- |
| ०२) | मे.पिणाकेश्वर इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ५२,६६३/- |
| ०३) | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ५१,४७९/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर सबस्टेशन येथील इलेक्ट्रीक कंट्रोल पॅनेलमधील स्पेअरपार्ट खरेदी करणेकामी मे.साई समर्थ इंजिनिअरींग कं., अंबड, नाशिक यांचे रु.५०,८०९/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता, विद्युत विभाग)

---

०२ **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव (दसरा) सन २०१५ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेल्या ई– निविदांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

**मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय–** दि.२३/०७/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र.२०४ (१९) संमत करणेत आलेला आहे.

"श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव सन २०१५ निमित्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, ई– निविदांची मागणी करणे व याकामी येणा-या एकूण अंदाजे रु.६,०९,३८६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या समितीची शिफारस मान्य करण्यात आली."

**प्रस्तावना:-** सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक जा.नं.एसएसएस/वशी-५/२१०९/२०१५ दि.०२/०९/२०१५ अन्वये श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव बुधवार दि.२१ ऑक्टोबर २०१५ ते शुक्रवार दि.२४ ऑक्टोबर २०१५ अखेर ०४ दिवस साजरा होणार असल्याने याकामी येणा-या संभाव्य खर्चाची बाबवार माहिती सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार इकडील विभागामार्फत जा.नं.२३९/२०१५ दि.११/०९/२०१५ अन्वये श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१५ करिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी तसेच मंदिर परिसरात रंगकाम करणे, विद्युत रोषणाई करीता आवश्यक असलेले बांबु, गोल्टे भाडोत्री घेणे, आवश्यक माहितीचे बोर्ड तयार करणे याकामी येणारे एकत्रित रक्कम रु.७,९७,५१५/- इतका खर्च कळविणेत आलेला आहे.

संस्थानचे सन २०१५ चे दैनंदिनीमध्ये श्री पुण्यतिथी उत्सव दि.२१/१०/२०१५ ते दि.२४/१०/२०१५ असा चार दिवस असल्याचे नमूद आहे. तथापी आता छापणेत आलेल्या उत्सव पत्रिकेमध्ये सदर उत्सव कालावधी तिनच दिवस दर्शविणेत आलेला आहे. सामान्य प्रशासन विभाग यांचे वर नमूद परिपत्रकान्वये इकडील दि.१५/०९/२०१५ रोजीचे टिपणीद्वारे चार दिवसांचे उत्सव कालावधीसाठी सुधारीत वेळापत्रकानुसार निविदा सूचना संस्थानचे संकेत स्थळावर व निविदा प्रपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आल्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ०३ ई– निविदांमधील टेक्नीकल बीड दि.०३/१०/२०१५ रोजी उघण्यात आले आहेत. त्यावेळी खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.नं | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. डी. टी. उगले | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. आर.बी. आहेर | उप कार्यकारी अभियंता |
| ३ | श्री. डी. एम. देसाई | उप अभियंता |
| ४ | श्री. एस. पी. लंके | लेखाधिकारी |
| ५ | श्री. एम.पी. गव्हाणे | कनिष्ठ अभियंता |
| ६ | श्री. गनन सुर्वे | ज्यु. ई डी पी विभाग, प्रतिनिधी |

वरीलप्रमाणे उघडण्यात आलेल्या ई– निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| तपशिल | ठेकेदार नांव | | |
|---|---|---|---|
| | साईकृपा टेंन्ट हाऊस, बेलापूर ता. श्रीरामपूर | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर |
| को-या निविदेची किंमत व बयाना रक्कमेचा डी.डी. | SBH – Dt.19/09/2015 D.D. No.502000 Rs.500/- SBH – Dt.19/09/2015 D.D. No.501937 Rs.6000/- | SBH-Dt.21/09/2015 D.D.No.503128 Rs.500/- SBH-Dt.21/09/2015 D.D.No.503127 Rs.6000/- | SBI –Dt.29/09/2015 D.D.No.666731 Rs.500/- SBI –Dt.29/09/2015 D.D.No.666730 Rs.6000/- |
| पॅन कार्डची छायांकीत प्रत | जोडली आहे. | जोडली आहे. | जोडली आहे. |
| सर्व्हीस टॅक्स रजिस्ट्रेशन | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. |
| रु.१००/- मात्रचे मुद्रांकावर हमीपत्र. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. |
| मंडप उभारणीच्या उलब्ध साहित्याचा तपशिल | जोडला आहे. | जोडला आहे. | जोडला आहे. |
| ४ लक्ष किमतीचे एक काम पूर्ण केल्याचे संबंधीत संस्थेचे प्रमाणपत्र. | जोडलेले नाही. | जोडलेले नाही. | जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, पुणे यांचेकडे रु.४,६७,६१९/- मात्र इतक्या रकमेचे मंडप, स्टेज, इतर व्यवस्थेबाबतचे कामाचे दि.२७/०१/२०१४ चे प्रमाणपत्र सादर केले आहे. |
| **शेरा** | सदर ठेकेदार यांनी रु.४ लक्ष किमतीचे एक काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही, त्यामुळे तांत्रिकदृष्टया ते अपात्र ठरतात. तथापी त्यांनी यापुर्वी संस्थानकरीता सन २०१५ मधिल | सदर ठेकेदार यांनी रु.४ लक्ष किमतीचे एक काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही, त्यामुळे तांत्रिकदृष्टया ते अपात्र ठरतात. तथापी त्यांनी यापुर्वी संस्थानकरीता सन २०१४ | **पात्र** |

| | | | |
|---|---|---|---|
| | उन्हाळी मंडपाचे रु.८,६०,७४६/- इतक्या रकमेचे काम पूर्ण केलेले आहे. | मधिल पुण्यतिथी उत्सव कालावधीतील मंडपाचे रु.४,६६,३९६/- इतक्या रकमेचे काम पूर्ण केलेले आहे. | |

वरील पैकी ठेकेदार कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर हे पात्र असून, ठेकेदार न्यु रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर, ता. राहुरी व साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर ता. श्रीरामपूर यांनी किमान पात्रता निकषामधील रु.४ लक्ष किमतीचे एक काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नसल्याने ते तांत्रिकदृष्टया अपात्र ठरत आहेत.

तथापी वरीलपैकी ठेकेदार न्यु रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर, ता. राहुरी व साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर ता. श्रीरामपूर यांनी वरील तक्यात नमूद केलेनुसार यापुर्वी सन २०१४ व २०१५ मध्ये संस्थानचे रु.४ लक्ष पेक्षा जास्त रकमेचे मंडप, स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था पूरविणेचे काम पूर्ण केलेले आहे. त्यामुळे त्यांना पात्र ठरविणेबाबत विचार होणेस हरकत नाही.

श्री पुण्यतिथी उत्सव जवळ आलेला असल्याने सदर मंडप व अनुषंगिक कामे उभारणीचे काम तातडीने सुरु करणे आवश्यक आहे. त्यासाठी वरील तिनही ठेकेदारांच्या ई– निविदांमधील कमर्शिअल बीड आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | न्यु रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी | ५,८०,४२४.०० |
| २ | साईकृपा टेंन्ट हाऊस, बेलापूर ता. श्रीरामपूर | ६,००,६३१.४० |
| ३ | कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर | १०,०३,१९८.०० |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता प्रस्तावितकामी न्यु रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी यांचे रु.५,८०,४२४/- मात्र निम्नतम दर येत आहेत. परंतु त्यांनी हे दर चार दिवसासाठी दिलेले आहेत. तथापी संस्थानमार्फत श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव तीन दिवस साजरा करणेत येणार असल्याने, त्यानुसार तीन दिवसाचे कालावधीसाठी सदर निविदादरानुसार मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी रु.४,३५,३१८/- मात्र इतका खर्च येईल. याबाबत न्यु रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी यांचेबरोबर सभेने चर्चा केली असता, या दरात सदरहू काम करणेचे त्यांनी मान्य केले.

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव (दसरा) सन २०१५ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी न्यु रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी यांचे तीन दिवसासाठीचे रु.४,३५,३१८/- मात्र दर स्विकारणेत येऊन, सदरहूकामी त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच पुण्यतिथी उत्सव कालावधीमध्ये साईभक्तांचे सोयीसाठी ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**०३ आर सी (रिकंडीशन) झेरॉक्स मशीनचे कोटेशन उघडून निर्णय होणेबाबत.**

सामान्य प्रशासन विभागामार्फत संस्थान कामकाजासाठी आरसी (रिकंडीशन) झेरॉक्स मशिन खरेदीकामी दि.०२/०८/२०१५ चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.२४१ अन्वये वृत्तपत्रात जाहीरात देऊन पुरवठादारांकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता मिळाली आहे. कोटेशन मागविण्याची अंतिम दि.२०/०९/२०१५ होती. दैनिक पुण्यनगरी, औरंगाबाद या वृत्तपत्रातील दि.१०/०९/२०१५ रोजीचे जाहीरातीनुसार पुरवठादारांकडून झेरॉक्स मशीन खरेदी करणेबाबत कोटेशन मागविले आहे. त्यानुसार विहीत वेळेत खालीलप्रमाणे ०३ सिलबंद कोटेशन प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| १ | मृणाल एन्टरप्रायजेस, नासिक | १२०५४ दि.१४/०९/२०१५ |
| २ | पुजा कॉम्पूटर्स, औरंगाबाद | १२४५५ दि.१८/०९/२०१५ |
| ३ | ओम साई मार्केटींग,औरंगाबाद | १२४५६ दि.१८/०९/२०१५ |

तरी वरीलप्रमाणे प्राप्त झालेली ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील मुळ दर रु. | |
|---|---|---|---|
| | | कॅनॉन | झेरॉक्स |
| १ | मृणाल एन्टरप्रायजेस, नासिक | १,२६,०००/- | ७८,७५०/- |
| २ | पुजा कॉम्पूटर्स, औरंगाबाद | --- | १,५७,०००/- |
| ३ | ओम साई मार्केटींग,औरंगाबाद | १,२३,९००/- | ७६,६५०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सामान्य प्रशासन विभागास आवश्यक असलेले ०१ नग आर सी (रिकंडीशन) झेरॉक्स मशीन खरेदी करणेकामी ओम साई मार्केटींग, औरंगाबाद यांचे रु.७६,६५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, झेरॉक्स विभाग)

---

०४ **संस्थान वाहनांकरिता आवश्यकतेनुसार बॅटरीज पुरविणे कामी आलेले सिलबंद दरपत्रके उघडून न्युनत्तम दरपत्रकधारकांस पुरवठा आदेश देणेकामी निर्णय होणेबाबत.**

वाहन विभागाकडे असलेल्या सर्व वाहनांसाठी नवीन बॅटरी खरेदी करणे कामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०६/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६२ नुसार नामांकित कंपनीचे डिलर्स यांचेकडून खालील प्रमाणे सिलबंद दरपत्रके दि.३१/०७/२०१५ अखेर मागविण्यात आलेले होते.

| अ.न. | बॅटरी प्रकार | वाहन प्रकार |
|---|---|---|
| १. | 150 Ampere | बसेस |
| 2. | 130 / 120 Ampere | बसेस |
| 3. | 88 Ampere | टाटा-११०९, टाटा-४०७, स्वराज ट्रॅक्टर |
| 4. | 75 Ampere | टोयोटा ईनोव्हा, महिंद्रा बोलेरो, टाटा विंगर रुग्णवाहिका |
| 5. | 70 Ampere | महिंद्रा XUV |
| 6. | 65 Ampere | टाटा-ACE, महिंद्रा मॅक्स |
| 7. | 55 Ampere | मारुती ईको रुग्णवाहिका |
| 8. | 38 Ampere | ट्रॅक्टर |
| 9. | 40 / 35 Ampere | टाटा नॅनो |

त्यानुसार खालील पुरवठादारांनी दरपत्रके दिलेले आहेत.

| अ.न. | पुरवठाधारकांचे नाव/ पत्ता | आवक नंबर/दिनांक |
|---|---|---|
| १. | वर्धमान ऑटो पार्टस् , श्रीरामपूर | ८७२२-०७.०८.२०१५ |
| २. | अंबिका बॅटरी इन्वर्टर सर्व्हिस व इलेक्ट्रिकल्स् , साकुरी | ८०६५-२८.०७.२०१५ |
| ३. | साई ऑटो बॅटरी सर्व्हिस, शिर्डी | ८२०१-३०.०७.२०१५ |
| ४. | एस.अे. बॅटरी , शिर्डी | ८२८४-३१.०७.२०१५ |

तरी संस्थान वाहनांचे आवश्यकतेनुसार सन-२०१५-१६ या सालांकरिता वार्षिक मंजूर दराने बॅटरीज खरेदी करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.न. | तपशील | साई ऑटो बॅटरी सर्व्हिस, शिर्डी (बॅटरी- एस.एफ.सोनिक) | अंबिका बॅटरी इन्वर्टर सर्व्हिस व इलेक्ट्रिकल्स् , साकुरी (बॅटरी- ॲमरॉन) | वर्धमान ऑटो पार्टस् , श्रीरामपूर (बॅटरी- ॲमरॉन) | एस.अे. बॅटरी, शिर्डी (बॅटरी- एक्साईड) |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदेमध्ये देऊ केलेले दर (जुन्या बॅटरीची किंमत वजा करुन) प्रती नग रु. | | | |
| १. | 150 Amp. | ९३२९/- | ९२००/-<br>८३००/- | **७७१४/-** | १०२०२/- |
| २. | 130/120 Amp. | ७६८२/-<br>६९२०/- | ८१००/-<br>७९००/- | **६७४८/-** | ९०८४/-<br>७३३०/- |
| ३. | 88 Amp. | ४९०७/-<br>४७२८/- | ५०००/-<br>(90 Amp.) | **४१५२/-** | ५४८९/- |
| ४. | 75 Amp. | --- | ५०००/- | **४०७४/-** | ५३८५/- |
| ५. | 70 Amp. | **४३४५/-** | --- | ४८५२/- | ५३५५/- |
| ६. | 65 Amp. | ४६३८/- | ४४००/- | **४२७५/-** | --- |
| ७. | 55 Amp. | --- | ४७००/- | **३८६६/-** | ५६९३/- |
| ८. | 38 Amp. | --- | --- | **२३३३/-** | --- |
| ९. | 40/35 Amp. | २६५१/- | २६००/- | **२३३३/-**<br>२७१७/- | ३८५८/- |



**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वाहनांकरिता आवश्यकतेनुसार बॅटरीज पुरविणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

०५ **सन २०१५-२०१६ करीता वार्षीक साहित्य खरेदीबाबत प्राप्त झालेले दरपत्रक उघडणेस मंजूरी मिळणेबाबत.**

दि.१६/०६/२०१५ रोजीच्या मा.उपसमिती सभेतील निर्णय क्र.१६२ अन्वये बगीचा विभागासाठी सन २०१५-२०१६ करीता वार्षीक साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रक मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,७७,३९०/- (एक लाख सत्याहत्तर हजार तिनशे नव्वद) मात्र खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार स्थानीक दुकानदारांकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेत आलेली होती. दरपत्रके सादर करावयाची मुदत दि.२०/०८/२०१५ अखेर संपलेली असुन अद्याप एकुण ०४ दरपत्रके प्राप्त झालेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | पार्टीचे नाव | आवक नंबर/दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे शेतकरी कृषी सेवा केंद्र, श्रीरामपूर | ९२७४- दि.१२/०८/२०१५ | बंद लिफाफा |
| ०२ | विरभद्र ट्रेडर्स, संवत्सर | ९६७८-दि.१८/०८/२०१५ | बंद लिफाफा |
| ०३ | कल्याणी कृषी सेव केंद्र, सावळीविहीर | ९६९३- दि.१८/०८/२०१५ | बंद लिफाफा |
| ०४ | अरविंद सेल्स एजन्सी, साकुरी | १००२२-दि.२०/०८/२०१५ | बंद लिफाफा |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र. | मालाचा तपशिल | मागणी | दर (प्रती लिटर/किलो) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे.शेतकरी कृषी सेवा केंद्र, श्रीरामपूर | विरभद्र ट्रेडर्स, संवत्सर | कल्याणी कृषी सेवा केद्र, सावळीविहीर | अरविंद सेल्स एजन्सी, साकुरी |
| **औषधे** | | | दर प्रती किलो/ लिटर/ गोणी रु. | | | |
| ०१ | तननाशक | १०० ली | २६६/- | ३५५/- | २९०/- | २९५/- |
| ०२ | नुवान | ५ ली. | ५२०/- | ६८५/- | ५५०/- | ५७०/- |
| ०३ | रोगर | ५ ली | ३३२/- | ४५५/- | ३५०/- | ३१५/- |
| ०४ | कान्टॉक | ३ ली. | ४८०/- | ५९८/- | ४८०/- | ४९०/- |
| ०५ | क्लोरीपायरीफॉस (लिफान) | ५ ली. | ५००/- | ६००/- | ५००/- | ५५०/- |
| ०६ | टाटा मिडा Trishul | ५ ली. | ९००/- | २२९०/- | २०९०/- | १४५०/- |
| ०७ | सल्फर | २ किलो | ८५/- | ------- | २२०/- | १४०/- |
| ०८ | व्हटी सिलीयम | ४ किलो | २६५/- | ------- | ------ | ३००/- |
| ०९ | ब्लॉयट्रेक्स | ५ किलो | ४९०/- | ६७६/- | ५२०/- | २४०/- |
| १० | M 45 | ४ किलो | ३३०/- | ४२३/- | ३१०/- | ३५०/- |
| ११ | कॉन्फीडोर | २ ली. | २१००/- | २८५४/- | २२००/- | ४९०/- |
| १२ | बायझाईन | १ ली. | ९००/- | ७०२/- | ६५०/- | ४००/- |
| **खते** | | | | | | |
| ०१ | युरीया | २० गोणी | २९५/- | ३१०/- | २९७/- | ३००/- |
| ०२ | निंबोळी पेन्ड | ५० गोणी | --- | --- | --- | --- |
| ०३ | D.A.P. | १५ गोणी | १२६५/- | १३५०/- | १२७३/- | ११७५/- |
| ०४ | सुरपर फॉस्फेट (पावडर) | ३० गोणी | ३३२/- | ४००/- | ३५०/- | २९२/- |
| ०५ | १०/२६/२६ | १५ गोणी | ११६२/- | १२५०/- | ११६८/- | --- |
| ०६ | पोटॅश | २० गोणी | ८३०/- | ९२५/- | ८४५/- | ८४०/- |
| ०७ | ब्लिाचींग पावडर | २५० किलो | --- | २०/- | --- | ३०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, बगीचा विभागासाठी सन २०१५-२०१६ करीता वार्षीक साहित्य खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ज्या साहित्यांसाठी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, त्यासाठी विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभाग प्रमुख)

---

०६ **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागातील जुने Fully Automatic Blood Gas Analyser Machine खरेदी करणेकामी प्राप्त कमर्शियल निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात Fully Automatic Blood Gas Analyser Machine हे रक्ताच्या वेगवेगळया तपासण्या करणेसाठी आवश्यकता असते. त्यांच्याकडे असलेले Fully Automatic Blood Gas Analyser Machine हे सन २००५ साली रु. ६७५०००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले असून सदर मशिन हे वारंवार बंद पडत आहे. त्यामुळे बायोमेडीकल विभागाने दि.२२/१२/२०१२ चे पत्रान्वये सदर मशिन बायबॅक करणेबाबत शिफारस केलेली आहे.

सदरचे Fully Automatic Blood Gas Analyser Machine खरेदीकामी ५ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून इकडील पत्र क्र.९५७२ दि.२३/०३/२०१३ अन्वये अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानूसार M/s. Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai & M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad यांनी दर कळविलेले आहे. M/s. Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai. यांचे दरानूसार सदर Fully Automatic Blood Gas Analyser Machine खरेदीकामी रु. ६०२७००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२१/०६/२०१३ निर्णय क्र.४६९ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात Fully Automatic Blood Gas Analyser Machine खरेदी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.६०२७००/- चे खर्चास तसेच जुने Fully Automatic Blood Gas Analyser Machine बायबॅक करणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळालेली आहे. तसेच त्यानुसार इकडील पत्र क्र. २७२७, दिनांक २४/०८/२०१३ अन्वये विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे सदर जुने मशीन बायबॅक करणेस मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग निर्णय क्र. सासंवि-२०१३/३३९/प्र.क्र.७५/का-सोळा, दिनांक २१/०७/२०१४ अन्वये सदर जुने मशीन बायबॅक करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश - पुणे, दिव्य मराठी - नाशिक, पुण्यनगरी - औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, तर मुंबई कार्यालयात ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, अशा एकूण ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s.DHR Holding India Pvt. Ltd., Mumbai | 25/11/2014 |
| 2 | M/s.J. K. Sales & Services, Aurangabad | 25/12/2014 |
| 3 | M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad | 25/12/2014 |
| 4 | M/s.Transasia Bio - Medicals Ltd, Mumbai | 25/11/2014 |
| 5 | M/s.Srushti Healthcare, Pune | 25/11/2014 |

उपरोक्त तांत्रीक निविदा मा. उप समितीची सभा दि.19/01/2015 रोजी समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदर तांत्रिक बाबींच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आलेला असून सदर तांत्रिक तुलनात्मक तक्त्यावर वापर करणा-या डॉक्टरांची Priority प्रमाणे त्याची शिफारस घेण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Name of Supplier | Make | Model | User Recommendation |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Srushti Healthcare, Pune | Nova Biomedical | Nova stat profile PHOX Ultra | Priority 1$^{st}$ |
| 2 | M/s. DHR Holding India Pvt. Ltd., Mumbai | RADIOMETER | ABL800 BASIC ANALYZER | Priority 2$^{nd}$ |
| 3 | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | Roche | cobas b221<6> | Priority 3$^{rd}$ |
| 4 | M/s. J. K. Sales & Services, Aurangabad | Not given | Not given | Not Recommended |
| 5 | M/s. Transasia Bio-Medicals Ltd, Mumbai | Erba | EBG Stat 1020 | Not Recommended |

उपरोक्त अ.नं. १ ते ३ निविदाधारांनी आपण Specification मध्ये मागणी केल्याप्रमाणे Specification दिलेले असून अ.नं.४ यांनी त्यांचे Technical Specification निविदेसाबत दिलेले नाही तर अ.नं.५ यांचे Technical Specification मध्ये मागणी केल्याप्रमाणे Specification दिलेले नाही.

तरी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ कमर्शियल सिलबंद निविदा पैकी अ.नं. १ ते ३ यांचे कमर्शियल सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Name of Supplier | M/s.DHR Holding India Pvt. Ltd., Mumbai | M/s. J. K. Sales & Services, Aurangabad | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | M/s. Transasia Bio- Medicals Ltd, Mumbai | M/s. Srushti Healthcare, Pune |
|---|---|---|---|---|---|
| Make | RADIOMETER | Not ROCHE | Roche | Erba | Nova Biomedical |
| Model | ABL800 BASIC ANALYZER | COBAS b221 | cobas b221<6> | EBG Stat 1020 | Nova stat profile PHOX Ultra |
| Rate Per in Rs. | 11,00,000/- (13,18,750- 2,18,750) | Net Amount = 14,18,750=00 (1518750- 100000) | 11,96,250 (1271250- 75000) | 10,53,130/- (11,03,130- 50,000) | Net Amount 12,00,000 (1239840- 39840) |
| Consumables | NA | Free reagent supply for 6 months /5000 test | free reagent supply for 6 months / 5000 test | NA | NA |
| AMC | AMC 22,000+Tax | | | AMC CMC 21,420 53,550 Per Year Fixed For 5 years | CMC = 5 % of Basic Cost |
| Warranty | 3 Years | 5 Years including Electrodes | 5 Years including Electrodes | 3 Years | Not given |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपसमिती सभेस रु.१० लाख मात्र पर्यंत खर्चाच्या निविदा उघडण्याचे अधिकार असून श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागातील जुने Fully Automatic Blood Gas Analyser Machine बायबॅक करुन नवीन खरेदी करणेकामी रु.६,०२,७००/- मात्रचे खर्चास मान्यता आहे. परंतु आजचे उपसमिती सभेत मुळ दरांच्या निविदा उघडण्यात आल्या असता याकामी रु.१० लाख मात्रपेक्षा जास्त दर असल्याचे दिसून आले. सबब सदरहू उघडण्यात आलेल्या निविदांवर निर्णय होणेसाठी त्रीसदस्य समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०३** **डॉ.मनोहर शिंदे, कॉर्डीओलॉजीस्ट (कंत्राटी) यांचे नेमणूक व मानधनाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल केलेल्या सिव्हील अॅप्लीकेशन नं. २७९७/२०१४ वर दि. १९/०३/२०१४ दिलेल्या आदेशानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने व व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरती नेमणुक करणेकरिता मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त आदेशास अनुसरुन कोर्टाशी संलग्न असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ. पी. आर. कानडे व कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तसेच प्र. वैद्यकीय संचालक, रुग्णालये यांचे समितीने दि. २३/०३/२०१४ रोजी मुलाखती घेतल्या. सदर मुलाखतीत डॉ.मनोहर शिंदे यांनी पुर्णवेळ कार्डीओलॉजिस्टचे नेमणुकीकरीता मासिक रु.४,००,०००/- एकत्रित मानधनाची मागणी केली होती त्यांना सर्वसमावेशक रु.३,००,०००/- एकत्रित मानधन देता येईल असे समितीने त्यांना सांगितले. डॉ. शिंदे यांनी सर्वसमावेशक रु.३,००,०००/- एकत्रित मासिक मानधनावर काम करणेस तयार असलेबाबत त्यांचेकडील दि.२८/०४/२०१४ रोजीचे ई-मेलद्वारे कळविले होते. त्यानुसार दरमहा सर्वसमावेशक एकत्रित मानधन रु.३,००,०००/- वर त्यांची जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ६२४/२०१४ दि.३०/०४/२०१४ नुसार कार्डीओलॉजिस्ट पदावर कंत्राटी पद्धतीने नेमणुक करणेत आली. सदर नेमणुकीस दि.१२/०४/२०१४ व ०५/०६/२०१४ रोजीचे सभेतील अनुक्रमे निर्णय क्र. २७५ व ३५८ नुसार कार्योत्तर मान्यता देण्यात आली होती.

डॉ.मनोहर शिंदे यांचा नेमणुक कालावधी संपल्याने त्यांना पुन्हा मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या सिव्हील अॅप्लीकेशन नं. २९०/२०१५ मधील दि. १२/०१/२०१५ रोजीच्या निर्णयानुसार दि.०२/११/२०१४ पासुन पुढे एक वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. मध्यंतरीच्या काळात डॉ. मनोहर शिंदे यांनी वेळोवेळी अर्ज करुन पगारात सुधारणा करणेची मागणी केलेली आहे.

डॉ.मनोहर शिंदे यांना सर्वसमावेशक मासिक रुपये तीन लाख मानधनाऐवजी त्याच पदावर स्थायी स्वरुपात कार्यरत असणा-या इतर वैद्यकीय अधिका-यांना मिळणा-या वेतनाचे जवळपास म्हणजेच रु.६०,०००/- मानधन पुर्णवेळेसाठी अधिक कामाच्या प्रमाणात प्रति केस इन्सेंटीव्ह लागु करण्यास तसेच इतर कार्डीयालॉजिस्ट यांना कॅथलॅब विभागातील शस्त्रक्रिया/ प्रोसिजर्स वरील इंसेटीव्ह दरात वाढ करणेबाबत मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव दि. २६/०४/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. १३९ नुसार इंन्सेंटीव्ह देणेचा अंतिम निर्णय झाल्यानंतर डॉ. मनोहर शिंदे यांचेबाबत स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले.

डॉ.शिंदे यांनी दिलेल्या दि. ११/०७/२०१५ चे पत्रास अनुसरुन त्यांनी मासिक रुपये तीन लाख मानधनाऐवजी त्याचपदावर स्थायी स्वरुपात कार्यरत असणा-या इतर वैद्यकीय अधिका-यांना मिळणा-या सुरुवातीचे वेतनाचे जवळपास वेतन त्यांना मानधन म्हणून आता रु. ६१,०००/- (अक्षरी रु. एकसष्ट हजार मात्र) तसेच संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देणेबाबत दि. १४/०७/२०१५ रोजी त्रिसदस्य समितीची चक्रीय पद्धतीने मान्यता मिळालेली आहे. उपरोक्त प्रस्तावाला मिळालेल्या मान्यतेची कार्यवाही दि. ०१/०८/२०१५ पासून करावी याबाबत दि. २३/०७/२०१५ च्या नियमित व्यवस्थापन समितीच्या सभेत निर्णय क्र. २११ झालेला आहे.

याकामी दि. २३/०७/२०१५ रोजी झालेल्या निर्णयावर प्र. वैद्यकीय संचालक यांनी मा. अध्यक्ष साहेब यांच्याशी चर्चा केली असता सदरकामी फेरप्रस्ताव सादर करावा असे निर्देश दिले होते त्यानुसार डॉ. शिंदे यांचेबाबत खालीलप्रमाणे फेरप्रस्ताव सादर करणेत आला होता.

"डॉ.शिंदे यांचे योगदान तसेच त्यांचा दि.०१/०८/२०१५ रोजीचा अर्ज विचारात घेता त्यांना दि.०१/०६/२०१५ पासुन रु. ६१,०००/- (अक्षरी रु. एकसष्ट हजार मात्र) तसेच संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देता येईल. सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेस मान्यता असावी". तथापि, उपरोक्त प्रस्तावाचे टिपणीवर मा. कार्यकारी अधिकारी यांनी "कृ.चर्चा" असे निर्देश दिलेले आहेत.

डॉ. मनोहर शिंदे यांनी पुन्हा दि. २५/०८/२०१५चे अर्जान्वये मानधन वाढवुन मिळणेबाबत तसेच इतर अनेक मुद्यांबाबत ऊहापोह करुन विनंती केली आहे.

तथापि दि. ०८/०९/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील आयत्या वेळेचा विषयावरील निर्णय क्र. ३१९ खालीलप्रमाणे झाला आहे.

"डॉ.शिंदे यांची नेमणुक उच्च न्यायालयाचे आदेशाने झालेली आहे. तसेच त्यांचे मानधन कोणत्या आदेशाने ठरले व त्यांच्या वेतन रचनेमध्ये बदल करणेस काही तांत्रिक अडचण आहे का याचा अभ्यास करणे गरजेचे वाटते. डॉ.शिंदे यांचे मानधन वाढवणे अथवा त्यांची वेतन रचना बदलून त्यांनाही इंन्सेंटीव्ह सुरु करणे समितीला योग्य वाटते. परंतु त्यामध्ये कोणती तांत्रिक अडचण येऊ नये म्हणून त्यांची नेमणुक, नेमणुकीच्या वेळी ठरलेले मानधन व मा.उच्च न्यायालयाचे वेळोवेळी आदेश याचा एकत्रित अभ्यास करुन लवकरात लवकर सविस्तर प्रस्ताव समितीसमोर ठेवावा व त्यांनतरच डॉ. मनोहर शिंदे यांचे इन्सेंटीव्ह देणेबाबत ठराव क्र.२११ ची पुढील कार्यवाही करावी, असे ठरले."

मा.न्यायालयाने कार्डीओलॉजीस्टची नेमणुक करणेकामी दिलेल्या आदेशामध्ये वेतन, मानधन किंवा प्रोत्साहन भत्ता याबाबत कुठेही उल्लेख केलेला नाही. त्यामुळे मा.त्रिसदस्य समितीचे निर्णय क्र.२७५ नुसार कंत्राटी कार्डीओलॉजीस्टला फक्त मानधन तर व्हीजीटींग कार्डीओलॉजिस्ट यांना फक्त प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे. सबब कोणत्याही तांत्रिक अडचण असणार नाही असे वाटते.

डॉ. शिंदे यांनी परत दि. २५/०९/२०१५ चे अर्ज करुन त्यात नमुद केले आहे की दि. २३/०७/२०१५ रोजी मा.त्रिसदस्य समितीतील निर्णय क्र.२११ ची अंमलबजावणी दि.०२/११/२०१४ पासून करावी तसेच इतर डॉक्टरांप्रमाणे मानधन व प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा.

सबब डॉ. शिंदे यांना दि. २३/०७/२०१५ च्या नियमित व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.२११ नुसार दि. ०१/०८/२०१५ पासून अथवा त्यांचे दि. २५/०९/२०१५ रोजीचे अर्जातील मागणीप्रमाणे दि. ०२/११/२०१४ पासुन रु.६१,०००/- मात्र मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता द्यावा याबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.३७८ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, डॉ.मनोहर शिंदे, कॉर्डीओलॉजीस्ट (कंत्राटी), श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी कॉर्डीओलॉजीस्ट डॉ.बजाज, डॉ.वर्मा यांचे पश्चात कार्डीओलॉजी विभाग सुरळीतपणे चालू ठेवण्यात संस्थानला सहकार्य केलेले असून डॉ.शिंदे यांची मागणी वाजवी वाटते व त्यांना दि.०१.०८.२०१५ पासून रु.६१,०००/- मात्र मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेबाबत यापुर्वीच समितीने निर्णय घेतलेला आहे. सबब डॉ.शिंदे यांच्या दि.२५.०९.२०१५ रोजीचे मागणीवर निर्णय होणेसाठी त्यांच्या कामाचे स्वरुप, पेशंटची संख्या, होणा-या शस्त्रक्रिया याचा समावेश करणेत येऊन, संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०४ कॉर्डीओलॉजीस्ट यांना पुनर्नेमणूक देणेबाबत.**

प्रस्ताव- सिव्हील अप्लीकेशन नं. २७९७/२०१४ मधील मा.मुंबई हायकोर्टचे खंडपीठ औरंगाबाद यांचा दि. १९/०३/२०१४ रोजीचा आदेशानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दताने व व्हिजीटींग पध्दतीने तात्पुरती नेमणूक करणेकरिता मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरून सदरचे पदाकरिता हॉस्पिटलकडे उपलब्ध असलेल्या कार्डीओलॉजीस्ट अर्जदारांची दि. २३/०३/२०१४ रोजी मुलाखती

घेऊन व्हिजीटींग व कंत्राटी पद्धतीने कार्डीओलॉजिस्ट पदावर तात्पुरते ०६ महिन्यासांठी ०५ कार्डीयोलॉजीस्टच्या नेमणूका करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी डॉ. शितलकुमार हिरण व डॉ. विनोद विजन हे हजर झालेले नव्हते. डॉ प्रशांत पवार व डॉ. मनोहर शिंदे यांची पूर्णवेळ इंटरव्हेशनल कार्डीयोलॉजीस्ट या पदावर ०६ महिन्यांसाठी कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यात आलेली होती. सदर नेमणूका मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७५ नुसार कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे. उपरोक्त सहा महिन्यांसाठी नेमणूक संपुष्टात आल्याने मा. त्रिसदस्यीय समिती दि. ११/०९/२०१४ चे मा. त्रिसदस्यीय समिती सभेतील निर्णय क्र. ७८५ नुसार पुन्हा मुदतवाढ देणेकामी मा.न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन नं. २९०/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर दि. १२/०१/२०१५ रोजीचे आदेशान्वये ०१ वर्ष कालावधीसाठी किंवा डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांची चौकशी पूर्ण होईपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत पूर्वीच्याच अटीशर्तीवर मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर डॉ प्रशांत पवार यांनी राजीनामा दिल्याने त्यांचे जागेवर डॉ. भरत जैन यांना दि. ०३/०३/२०१५ रोजी कामावर हजर करून घेतले आहे. तसेच सिव्हील ॲप्लीकेशन नं.३९३७/२०१५ नुसार दि.१०/०४/२०१५ रोजीचे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार डॉ. धीरज मोरे यांना दि. २२/०५/२०१५ रोजी Adhoc बेसिसवर कामावर हजर करून घेतलेले आहे.

सिव्हील ॲप्लीकेशन नं. २९०/२०१५ मधील मा. मुंबई हायकोर्टचे खंडपीठ औरंगाबाद यांचा दि. १२/०१/२०१५ रोजीचा आदेशानुसार ०१ वर्ष कालावधीसाठी किंवा डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांची चौकशी पूर्ण होईपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत पूर्वीच्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात आलेल्या सध्या कार्यरत कार्डीयोलॉजीस्टची खालील स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविलेनुसार मुदतवाढ संपुष्टात येत आहे.

| अ. नं | नाव | नेमणुक प्रकार | १ वर्ष मुदतवाढ हजर तारीख | मुदतवाढ संपणेची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | डॉ.मुकुंद रामप्रसाद बजाज | व्हिजीटींग इंटरव्हेशनल कॉडीओलॉजीस्ट | ०२/१०/१४ | ०१/१०/१५ |
| ०२ | डॉ. देवराम रामराव ठेंगे | व्हिजीटींग इंटरव्हेशनल कॉडीओलॉजीस्ट | ०४/१०/१४ | ०३/१०/१५ |
| ०३ | डॉ.गिरीश भास्करराव काळे | व्हिजीटींग इंटरव्हेशनल कॉडीओलॉजीस्ट | ०७/१०/१४ | ०६/१०/१५ |
| ०४ | डॉ. मनोहर विश्वासराव शिंदे | कंत्राटी इंटरव्हेशनल कॉडीओलॉजीस्ट | ०२/११/१४ | ०१/११/१५ |
| ०५ | डॉ. भारत पी जैन | कंत्राटी इंटरव्हेशनल कॉडीओलॉजीस्ट | ०३/०३/१५ नविन नेमणूक | ११/०१/१६ |

उपरोक्त कार्डीओलॉजीस्ट यांना दिलेली नेमणूक स्तंभ क्र.५ मध्ये दर्शविलेल्या तारखेस संपुष्टात येत असल्याने त्यांना पुढील १ वर्ष किंवा आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत पुर्वीच्याच अटीशर्तीस अधिन राहून पुर्नःनेमणूक देणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे लागेल.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.३७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या कॉर्डीओलॉजीस्ट यांना त्यांची मुदत संपलेच्या तारखेपासून पुढे एक वर्ष किंवा आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीच्याच अटी/शर्तीस अधीन राहून पुनःर्नेमणूक देणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

विषय नं.०५ **डॉ.आर.प्रभाकरराव, प्र.वैद्यकिय संचालक यांचेबाबत.**

विषय नं.०६ **डॉ.विजय बाळकृष्ण पाटील, उपवैद्यकीय संचालक यांचेबाबत.**

निर्णय क्र.३८० विषय नं.०५ व ०६ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.०७ **डॉ.गौरव वर्मा व डॉ.हरीष बजाज यांचे अर्जाबाबत.**

प्रस्ताव- डॉ. हरिष बजाज आणि डॉ. गौरव वर्मा, इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट यांचे दि. ०६/०७/२०१५ रोजीचे अर्ज इकडील कार्यालयात दि. ०९/०९/२०१५ रोजी सादर केले आहेत. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे मुद्दे मांडलेले आहेत.

- I have submitted a detailed objection in respect of the invalidity of the disciplinary action being initiated again me.
- Without prejudice to the contentions contained therein, and without subjecting myself to your jurisdiction, I submit this application to you as well as the Sansthan for urgent decision.
- I am not conversant with the domestic enquiry and the procedures. I also do not know how to defend the allegations levelled against me and to explain the legal objection which I have taken against the Sansthan and the enquiry officer.
- The allegations levelled against me has serious implications in my social status as well as in my continuity of service. I already indicated that I am being framed by the medical director for his vested interest. I am reserving my right to object to the multiple roles of medical director to issue the change sheet, act as presenting officer and witness at appropriating stage.

- He is the top most officer next to executive officer. I cannot get any officer from Sansthan who is equally competent. That being so I am to engage an advocate to represent me in the enquiry or at least to present the legal position about appointment of advocate as my representative. It is not out of place to mention that the medical director is experienced and well informed of the niceties of domestic enquiry whereas I am not. Likewise the enquiry officer himself is an outsider, advocate and on top of it, a reined district judge. Denying me legal assistance would be mockery of justice.
- I seek assistance of legal assistance of advocate of my choice firstly for hearing of this application who wants to apprise you of the decision of Supreme Court or High Courts and explain the legal aspects to allow me to defend the allegations with the assistance of an advocate.
- Unless the application is decided after hearing my advocate, the matter be not proceeded with. Further the legal objections taken by me separately also need to be done with legal assistance.
- Hence this application for appointment of advocates to defend me in the proceedings, which needs to be allowed in the interest of principles of natural justice.

अशाप्रकारे डॉ.वर्मा आणि डॉ.बजाज यांनी खाते चौकशीकामी त्यांचेतर्फे काम करणेकामी वकीलांची नेमणूक करणेबाबत परवानगी मागितली आहे.

परंतु श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (शिस्त आणि अपील) विनीयम २०१३ ८(८) (पान नं.३८) नुसार संस्थानचा कर्मचारी आपले म्हणणे मांडण्यासाठी/ युक्तीवाद करण्यासाठी संस्थानच्या दुस-या कर्मचा-याची किंवा शासकीय सेवकाची किंवा संस्थानच्या सेवानिवृत्त कर्मचा-याची मदत घेऊ शकतो, परंतु तो यासाठी पुढील परिस्थितीचा अपवाद वगळता व्यावसायीकाची मदत घेऊ शकणार नाही.

शिस्तभंग प्राधिका-यांनी नियुक्त केलेला सादरकर्ता अधिकारी विधी व्यावसायीक असेल किंवा शिस्तभंग प्राधिकारी प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन असे करण्यास अनुमती देतील,

परंतु उपरोक्त विनीयम पाहाता, शिस्तभंग प्राधिका-यांनी नियुक्त केलेले सादरकर्ते अधिकारी प्र.वैद्यकीय संचालक हे असुन त्यांना विधी व्यावसायीकतेचे ज्ञान नाही.

सबब, डॉ.बजाज आणि डॉ.वर्मा यांना, त्यांनी मागणी केलेप्रमाणे विधी व्यावसायिक द्यावा किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३८१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.बजाज आणि डॉ.वर्मा यांनी विधी व्यावसायिक नेमणेबाबत केलेली विनंती मान्य करणेत आली. तसेच संस्थानसाठी सुध्दा याकामी विधी व्यावसायिक नेमणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

विषय नं.०८ **डॉ.सुभाष शामकुवर, निवासी वैद्यकिय अधिकारी व डॉ.मयुर म्हात्रे, न्युरोसर्जन यांचे परस्पर विरोधी तक्रार अर्जाबाबत.**

प्रस्ताव- श्रीमती विद्या भोसले, कंत्राटी परीचारीका श्री साईबाबा हॉस्पिटल व इतर ५ यांनी डॉ.म्हात्रे याचे विरुध्द दि.०६/०५/२०१५ रोजीच्या तक्रार अर्जान्वये "दि.०२/०५/२०१५ रोजी रात्री ०९.३० वाजता डॉ.म्हात्रे सर आयसीसीयुला राऊंडला आले असतांना त्यांनी आम्हाला भालके पेशंटजवळ बोलाविले व पेशंटच्या उपचारासंबंधी आमच्यावर चुकीचे, अवास्तव आरोप करुन आम्हाला धमकाविले, आरडा-ओरड करुन आमच्या कामात अडथळा आणला, आम्ही पुर्ण डयुटी प्रचंड मानसिक दडपणाखली केली. त्यावेळी ऑन डयुटी आरएमओ उपस्थित होते. दुसरे दिवशी देखील डॉ. म्हात्रे सरानी आदल्यादिवशी सारखे शब्द प्रयोग करुन आयसीसीयु मधील कामात अडथळा निर्माण करुन शांततेचा भंग केला. तसेच आम्हा सर्वांस अतिशय अश्लिल भाषेत लज्जा उत्पन्न होईल या प्रकारे शब्द प्रयोग केला. तरी त्या संबंधात उचित कार्यवाही करण्यात यावी" असे कळविले आहे.

त्यानंतर परत अर्जदार यांनी दि.०६/०५/२०१५ राजी इनवर्ड केलेला तक्रार अर्ज मागे घेणेबाबत दि.११/०५/२०१५ रोजीचा अर्ज सादर केला आहे. त्यात डॉ.म्हात्रे चिथावणीखोर भाषा, अंगावर धाऊन येणे, नातेवाईकांना बसून ठेवणे या गोष्टी करणार नाहीत व आम्हाला अर्वाच्च भाषेत बोलणार नाही, भविष्यात अतिदक्षता विभागात काम करताना आम्हाला बदला म्हणून त्रास दिला जाणार नाही व त्या न करण्याची आम्हाला लेखी हमी देत असतील तरच हे पत्र आम्ही मागे घेण्याचे मान्य करावे असे नमूद केले आहे.

उपरोक्त बाब ही डॉ. म्हात्रे व तक्रारदार यांच्यात कामातील वादावरुन झाली आहे असे दिसते त्यानंतर मा. वैद्यकीय संचालक यांचे समोर त्यांच्यातील वाद संपूष्ठात आले असलेबद्दलचे लेखी निवेदन त्यांनी दिले आहे.

डॉ.शामकुवर यांनी १८/०५/२०१५ रोजीच्या तक्रार अर्जान्वये "दि १४/०५/२०१५ रोजी रात्री १०.३० चे सुमारास डॉ. म्हात्रे यांनी साईनगर येथे स्टाफ क्वॅार्टर समोर भेटण्यास बोलाविले. मी स्टाफ क्वॅार्टर समोर गेल्यानंतर डॉ. म्हात्रे यांनी शिवीगाळ व दमबाजी सुरु केली व माझेविरुध्द जातीवाचक शब्दांचा वापर केला. त्यावेळेस तेथे डॉ. निलेश पवार, आरएमओ उपस्थित होते. तथापि डॉ. पवार ताबडतोब त्या ठिकाणावरुन निघून गेले. कारण मी अ.नं. 1 मध्ये नमूद केलेल्या घटनेत (परिचारीकांच्या बाबतीतला) मध्यस्थी करुन तक्रार मिटवण्याचा प्रयत्न करीत होतो. त्यानंतर दि.

१४/०५/२०१५ रोजी रात्री ११:२७ मिनीटांनी मला एका पुढा-याचा फोनवर धमकावणीचा कॉल आला होता. त्यात असे म्हटले होते की, डॉ. म्हात्रे यांचे प्रकरणातून तुम्ही बाहेर व्हा. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, डॉ. म्हात्रे यांच्या प्रकरणात माझा काहीही संबंध नाही. केवळ मी भांडण मिटविण्याचा प्रयत्न करत होतो. डॉ. म्हात्रे यांचे सदरचे वर्तन SC and ST (Prevention of Atrocity) Act, १९८९ चे कलम 3 व भारतीय दंड विधान १८६० चे कलम ५०३ नुसार गंभीर गैरवर्तन ठरते. मला असा विश्वास वाटतो की, सदर प्रकरणावर व्यवस्थापनाकडून व प्रशासनाकडून योगूय ती कार्यवाही होईल, तसे न झाल्यास मला डॉ. म्हात्रे यांचेविरुध्द पोलीस कंम्प्लेंट एफआयआर दाखल करावी लागेल. डॉ म्हात्रे यांचे विरुदध् खाते चौकशी करुन त्यांना निलंबीत करणे जरुरीचे आहे. तरी डॉ. यांचेविरुध्द खाते चौकशी करुन त्यांना निलंबीत करणे जरुरीचे आहे. तरी डॉ. म्हात्रे यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही व्हावी." असे कळविले आहे.

डॉ. मयुर म्हात्रे यांनी दि. २२/०५/२०१५ रोजीच्या अर्जान्वये "डॉ. शामकुवर यांनी माझेविरुध्द खोटे, चुकीचे आरोप केलेले आहेत. डॉ. शामकुवर माझी बदनामी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. डॉ. शामकुवर यांनी माझी बदनामी, माझे सहकर्मचारी यांचेसमोर केलेली आहे. त्यावेळी तेथे डॉ. संजय खुराणा हजर होते. दि. १४/०५/२०१५ रोजी रात्री ०९.३० वाजता वैद्यकीय अधिकारी यांचेबरोबर चर्चा चालू असतांना डॉ. संजय खुराणा आणि डॉ.निलेश पवार उपस्थित होते. त्यावेळी मी शांततेत बोलत होतो. मी कुठल्याही प्रकारचा जातीवाचक शब्द वापरलेला नाही. याबाबत प्रत्यक्षदर्शी डॉ. खुराणा सांगू शकतील." असे कळविले आहे.

वरील दोन्हीही तक्रार अर्जांचे अवलोकन करता असे दिसते की, डॉ.शामकुवर व डॉ.म्हात्रे यांनी एकमेकांविरुध्द तक्रार अर्ज सादर केलेले होते. अशा परिस्थितीत घटनेची सत्यता पडताळणेसाठी घटनेच्या वेळी उपस्थित असलेले डॉ.खुराणा व डॉ. पवार यांचे लेखी जबाब नोंदविणे आवश्यक वाटल्याने, इकडील जा.नं. एसएसएस/ वशी ७बी/१६१/२०१५ दि. ०९/०७/२०१५ अन्वये पत्र काढून डॉ. खुराणा व डॉ. पवार यांचे लेखी जबाब मागविणेत आले होते. त्याप्रमाणे साक्षीदार डॉ.संजय खुराणा व डॉ.निलेश पवार यांनी दि. १४/०५/२०१५ रोजीची घटना रुग्णालय परिसरात घडलेली नाही असे नमूद केले आहे. तसेच जातीवाचक शब्दांचा उच्चार झाला अथवा नाही याबाबत स्पष्टपणे नमूद केल्याचे दिसत नाही.

डॉ.शामकुवर व डॉ.म्हात्रे यांचे तक्रार अर्ज व संबंधित साक्षीदाराचे जबाब विचारात घेता झालेला प्रकार रुग्णालय परिसरात घडलेला नसल्याने तसेच दोनही डॉक्टर ऑन डयुटी नसल्याचे दिसते.

सबब, उपरोक्त दोन्ही घटनेतील प्राप्त वस्तुस्थितीदर्शक माहिती अर्जदाराच्या विनंती नुसार मा. व्यवस्थापन समितीच्या माहिती तथा उचित निर्देशार्थ सादर करण्यात येत आहे.

**निर्णय क्र.३८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, डॉ.सुभाष शामकुवर, निवासी वैद्यकिय अधिकारी व डॉ.मयुर म्हात्रे, न्युरोसर्जन यांची परस्पर विरोधी तक्रार आपसात समुपदेशाने मिटविणेत यावी.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०९** **व्हिजीटींग पध्दतीने बालरोग तज्ञाची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (4) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरीक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का सोळा मंत्रालय मुंबई दि.०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासनमान्य आकृतीबंधातील अटी शर्ती क्र 3- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी असे नमूद केले आहे.

तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दि.16/10/2012 रोजीचे आदेशातील अ.नं.6 मधील D मध्ये असे नमुद केले आहे की, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करू नयेत.

डॉ रविंद्र मुरलीधर दिघे, डीसीएच, शिर्डी यांनी श्री साईनाथ रुग्णालयात व्हिजीटींग पध्दतीने काम करण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज केला आहे. सदर अर्जावर वैद्यकीय अधिक्षक यांनी "श्री साईनाथ रुग्णालयात सध्या एकच बालरोग तज्ञ आहे. डॉ दिघे हे आठवडयातुन २ ते ३ दिवस येण्यास तयार आहेत तसेच डॉ दिघे ओपीडी व इमर्जन्सी कॉल करु शकतील". असे सुचविले आहे.

श्री साईबाबा संस्थान रुग्णालयाचे आकृतीबंधात बालरोग तज्ञाचे ४ पदे मंजुर असुन सध्या १ पद भरलेले असनु सध्या श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील बालरुग्णांची संख्या विचारात घेता आणखी बालरोगतज्ञाची आवश्यकता आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाकडे सध्या डॉ. शोभना कोल्हे, डिप्लो इन ऑफथल, डॉ अमोल जोशी, डिएनबी इन इएनटी व डॉ अमोल पोकळे, डिप्लो इन ऑब्स्टॅक अॅन्ड गायनॅक यांना अनुक्रमे प्रति व्हीजीट रु.४,५००/-, रु.५,०००/- व रु.२,५००/- व व्हिजीटींग पध्दतीने नेमणुक देण्यात आलेली आहे.

तरी डॉ रविंद्र मुरलीधर दिघे, डीसीएच यांची बालरोगतज्ञ या पदावर व्हिजीटींग पध्दतीने एक वर्ष किंवा स्थायी कर्मचा-याची नेमणूक यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत प्रति व्हिजीट रु ४,०००/- वर नेमणूक देता येईल.

निर्णयास्तव सादर.

---

**विषय नं.१०** **व्हिजीटींग पध्दतीने रुमॅटोलॉजीस्टची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरीक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा मंत्रालय मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासनमान्य आकृतीबंधातील अटी शर्ती क्र 3- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी तसेच अटी– शर्ती क्र.८ – समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमूद केले आहे.

तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशातील अ.नं.६ मधील D- मध्ये असे नमुद केले आहे की, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करू नयेत.

डॉ.नैसार दिलिप नहार, (डीएनबी जन.मेडिसीन- २०११, फेलोशिप इन क्लिनिक रुमॅटोलॉजी) यांनी रुमॅटोलॉजीस्ट या पदावर व्हिजीटींग पध्दतीने श्री साईबाबा रुग्णालयामध्ये सेवा देणेकामी अर्ज केलेला आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाचे आकृतीबंधात रुमॅटोलॉजीस्ट चे पद समाविष्ठ करणेत आलेले नाही. तथापि श्री साईबाबा रुग्णालयात संधीवात या व्याधीवर उपचार घेण्यासाठी बरेचशे रूग्ण येत असतात.

सध्या श्री साईबाबा रुग्णालयातील व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांना (व्हिजीटींग कार्डीओलॉजीस्ट/ कार्डीयाक सर्जन) फक्त प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे. सदरचा प्रोत्साहन भत्ता इतर व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांपेक्षा जास्त असल्याने त्यांना मानधन देण्यात येत नाही.

सबब, डॉ नैसार दिलीप नहार यांना रुमॅटोलॉजीस्ट या पदावर एक वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक देवून त्यांना प्रति दिवस रु.५,०००/- मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देता येईल.

निर्णयास्तव सादर.

---

**विषय नं.११** **व्हिजीटींग पध्दतीने गॅस्ट्रोएन्ट्रॉलॉजीस्टची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरीक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा मंत्रालय मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासनमान्य आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र 3 - सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी असे तसेच अटी-शर्ती क्र.८ – समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमुद केले आहे.

तसेच मा मुंबई उच्च न्यायालयाचे दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशातील अ.नं.६ मधील D-मध्ये असे नमुद केले आहे की, मा मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करू नयेत.

डॉ. शरद देशमुख, डीएनबी (गॅस्ट्रोएन्ट्रॉलॉजी), नाशिक यांचा व्हिजीटींग पद्धतीने नोकरी मिळणेबाबतचा ईमेल (सीव्ही) प्राप्त झालेला आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाचे आकृतीबंधात गॅस्ट्रोएन्ट्रॉलॉजीस्ट तज्ञाचे १ पद मंजुर असुन शैक्षणिक पात्रता एमएस/डीएनबी अशी आहेत. सध्या सदर पद रिक्त आहे.

सध्या श्री साईबाबा रुग्णालयातील व्हीजीटींग वैद्यकीय अधिका-यांना (व्हिजीटींग कार्डीओलॉजीस्ट / कार्डियाक सर्जन) फक्त प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे. सदरचा प्रोत्साहन भत्ता इतर व्हीजीटींग वैद्यकीय अधिका-यांपेक्षा जास्त असल्याने त्यांना मानधन देता येत नाही.

तरी, साईबाबा रुग्णालयातील रुग्णांची संख्या विचारात घेता डॉ. शदर अण्णा देशमुख यांना व्हिजीटींग पद्धतीने गॅस्ट्रोएन्ट्रॉलॉजीस्ट या पदावर एक वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत प्रति दिवस मानधन रु.५,०००/- तसेच इतर वैद्यकीय व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देता येईल.

निर्णयास्तव सादर.

---

**विषय नं.१२** **व्हिजीटींग पध्दतीने रेडीओलॉजीस्टची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरीक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा मंत्रालय मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासनमान्य आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र 3- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी असे तसेच अटी-शर्ती क्र.८ – समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमुद केले आहे.

तसेच मा मुंबई उच्च न्यायालयाचे दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशातील अ.नं.६ मधील D मध्ये असे नमुद केले आहे की, मा मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करू नयेत.

डॉ जातिन कृष्णा राय, ( एमडी रेडीओ, फेलो इन न्युरो अँन्ड पेरिफेरल व्हॅस्क्युलर इंटरव्हेन्शल रेडीओलॉजी-२०११) यांनी इंटरव्हेंन्शल रेडीओलॉजीस्ट या पदावर व्हिजीटींग पध्दतीने श्री साईबाबा रुग्णालयामध्ये सेवा देणे कामी अर्ज केलेला आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाचे आकृतीबंधात सिनी रेडीओलॉजीस्टचे दोन पदे मंजुर असुन सध्या एक पद रिक्त आहे. तसेच ज्यु रेडीओलॉजीस्टचे दोन पदे मंजुर असुन सध्या दोन्ही पदे रिक्त आहेत. इंटरव्हेश्नल रेडीओलॉजीस्ट या पदाचा आकृतीबंधात समावेश नसला तरी यासंबंधीत रुग्णांची संख्या विचारात घेता व्हिजीटींग पध्दतीने इंटरव्हेंश्नल रेडीओलॉजीस्ट यांची आवश्यकता आहे.

सध्या श्री साईबाबा रुग्णालयातील व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांना (व्हिजीटींग कार्डीओलॉजीस्ट/ कार्डीयाक सर्जन) फक्त प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे. सदरचा प्रोत्साहन भत्ता इतर व्हिजीटींग वैद्यकीय अधिका-यांपेक्षा जास्त असल्याने त्यांना मानधन देण्यात येत नाही.

सबब, डॉ जतिन कृष्णा राय, मुंबई यांना इंटरव्हेंश्नल रेडिओलॉजीस्ट या पदावर एक वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत व्हिजीटींग पध्दतीने नेमणुक देवुन त्यांना प्रति दिवस रु.५,०००/- तसेच संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देता येईल.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३८३** **विषय नं.०९ ते १२ वर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मागील दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७५ (५) अन्वये संस्थान रुग्णालयांमध्ये व्हिजीटींग पध्दतीने सेवा करणेसाठी डॉक्टरांचे अर्ज आल्यास त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. सबब उपरोक्त विषय नं.०९ ते १२ बाबत कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय स्तरावर निर्णय घ्यावा.**

**तसेच या व्हिजीटींग डॉक्टर्सवर हॉस्पिटल प्रशासनाने नियंत्रण ठेवावे, यामध्ये हे डॉक्टर्स संस्थानसाठी किती वेळ देतात, त्यांची येण्या-जाण्याची वेळ, एका व्हिजीटमध्ये किती रुग्णांची तपासणी करतात व विनाकारण त्यांच्या खाजगी हॉस्पिटलमध्ये रुग्ण रेफर करतात का याचा अभ्यास करावा.**

**संस्थान रुग्णालयामध्ये रुग्णांची संख्या पहाता, निश्चितच व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक करणेत आलेल्या डॉक्टर्सचा फायदा होणार असून या डॉक्टर्सचे मानधन ठरविणेसाठी शासकीय व्हिजीटींग डॉक्टर्सला देण्यात येणा-या मानधनाचा अभ्यास करावा तसेच संस्थान समकक्ष हॉस्पिटलची पाहणी करावी. तोपर्यंत त्यांना पूर्वीप्रमाणेच मानधन देण्यात यावे.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१३** **(अ) कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने परफ्युजनिस्ट घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये असलेली परफयुजनिस्टची आवश्यकता विचारात घेता, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ठेकेदारामार्फत प्रतिमहा रु.२१०००/- मात्र एकित्रत वेतनावर ११महिने कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने परफयुजनिस्टची तात्पुरती नेमणूक करणेत यावी, असे ठरले. तसेच दरम्यानचे कालावधीत जाहितरात प्रक्रियेव्दारे परफयुजनिस्ट या पदावर योग्य उमेदवार उपलब्ध् झाल्यास कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक दिलेल्या परफयुजनिस्टची मुदत संपुष्टात आणणेत यावी असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार डॉ.हर्षल वाळूंज यांना ठेकेदारामार्फत परफयुजनिस्ट या पदावर रु.२१०००/- तात्र प्रतिमहिना एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी किंवा दरम्यानचे कालावधीत जाहिरात

प्रक्रियेव्दारे परफयुजनिस्ट या पदावर उमेदवार उपलब्ध झाल्यास त्यांना देण्यात आलेली नेमणूक संपुष्टात आणणेत यावी या अटीवर नेमणूक देण्यात आली होती त्यांची नेमणूक दि.१५/०७/२०१५ अखेर संपुष्टात आलली आहे.

रुग्णातयातील रिक्त पदे भरणेकामी व दरम्यानचे काळात Adhoc बेसिसवर नेमणूक करणेसाठी मा.मुंबई उच्च् न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं.३९३९/२०१५ दाखल करणेत आले होते त्यावर मा. न्यायालयाने दि.१७/०४/२०१५ रोजीचे आदेशान्वये रुग्णालयाची नियमीत रिक्तपदे भरणसाठी मंजुरी दिलेली आहे सदर मंजुरीनूसार वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करून मा न्यायालयाचे आदेशानुसार नियुक्त केलेल्या सदस्यांनी अर्जाची पडताळणी करून मुलाखती मार्फत योग्य उमेदवारांची निवड केली होती. सदर जाहिरातीमध्ये परफयुजनिस्टसाठी २ पदांचा समावेश केला होता त्यापैकी एकाच उमेदवाराची निवड झाल्याने एक पद रिक्त आहे.

सध्या दोनच परफयुजनिस्ट कार्यरत असल्याने त्यांना एकतर आहेव्हर टाईम करावा लागत आहे. किंवा त्यांना रजा सुटटी द्यावयाची असल्यास ओटी बंद ठेवावी लागते सबब एका परफयुजनिस्टची तातडीची आवश्यकता भासत असल्याने जिनू थॉमस यांना दि. ०२/०९/२०१५ पासून जय भवानी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर हजर करून घेतलेले आहे.

तरी दि.०२/०९/२०१५ पासून ११ महिने कालावधीसाठी किंवा जाहिरातीमार्फत स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत प्रतिमहा रु २१०००/- वर जय भवानी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर हजर करून घेतलेल्या एक परफयुजनिस्टची कार्योत्तर मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.३८४** **(अ) यावर सविसतर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१३** **(ब) कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने परफ्युजनिस्ट घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरीक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का. सोळा मंत्रालय मुंबई दि. ०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासनमान्य आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र 3- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी असे तसेच अटी-शर्ती क्र.८– समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही, असे नमुद केले आहे.

तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशातील अ.नं.६ मधील D मध्ये असे नमुद केले आहे की, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करू नयेत.

श्री साईबाबा रुग्णालयाचे आकृतीबंधात परफयुजनिस्टची ३ पदे मंजूर असून आणखी एक पदाचा आकृतीबंधात समावेशकरणेकामी शासनामार्फत मान्यता मिळाली असून मा नयायालयाकडून मान्यता घेणेची कार्यवाही चालू आहे. सध्या फक्त दोन परफयुजनिस्ट कायमस्वरुपी व एक कंत्राटी पध्दतीने कार्यरत आहेत. सध्या दोनच कायम परफयुजनिस्ट कार्यरत असल्याने त्यांना एकतर आहेव्हरटाईम करावालागत आहे किंवा त्यांना रजा सुट्टी द्यावयाची असल्यास ओटी बंद ठेवावी लागते. सबब एका परफयुजनिस्टची तातडीची आवश्यकता भासत आहे. मोनाली बाळासाहेब पारखे, कल्याण यांचा बॅचलर ऑफ पॅरामेडीकल टेक्नॉलॉजी इन परफयुजन टेक्नॉलॉजी हा कोर्स पूर्ण झाला असून त्यांनी श्री साईबाबा हॉस्पिअलमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करणेबाबत अर्ज केला आहे.

तरी, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ११ महिने कालावधीसाठी किंवा जाहिरातीमार्फत स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत एक परफयुजनिस्ट जय भवानी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेणेस व त्यास प्रतिमहा रु. २१०००/- एकत्रित मानधन देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३८४** **(ब) यावर सविसतर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ११ महिने कालावधीसाठी किंवा जाहिरातीमार्फत स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत एक परफयुजनिस्ट संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत घेणेस व त्यास प्रतिमहा रु.२१,०००/- मात्र एकत्रित मानधन देण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१४** **संस्थानचे रुग्णालयातील वैद्यकिय अधिका-यांचे रिक्त पदांवर व्हिजीटींग अथवा कंत्राटी पध्दतीने भरती करणेसाठी वर्तमानपत्र/ संस्थानचे संकेतस्थळावर जाहिर आवाहन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. १४/०१/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये रुग्णालयातील रिक्त पदाबाबत जाहिरात प्रसिध्द करणे व दरम्याने काळात Ad hoc basic वर कंत्राटदारामार्फत नेमणुका करणेकामी परवानगी मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे

खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सिव्हिल ॲप्लीकेशन सादर करणेकामी मान्यता मिळणेसाठी मा. त्रिसदस्य समिती सभेसमोर विषय सादर करणेत आला होता. मा. त्रिसदस्यीय समिती दि. १८/०२/२०१५ रोजीचे सभेमध्ये सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय क्र. ६७ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"रुग्णालयातील रिक्त पदांबाबत जाहिरात प्रसिद्ध करणे व दरम्यानचे काळात Ad hoc basic वर कंत्राटदारामार्फत नेमणुका करणेकामी परवानगी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेस मान्यता देण्यात आली."

त्यानुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर सिव्हिल ॲप्लीकेशन नं. ३९३९/ २०१५ दाखल करणेत आले होते. सदर सिव्हील ॲप्लीकेशनवर मा.न्यायालयाने दि.१७/०४/२०१५ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"सिव्हील ॲप्लीकेशनमधील परिच्छेद नं.६ मधील अ.नं.०१ ते १९ ची पदे भरणेकामी डीन, गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजमधील संबंधीत विषयातील तज्ञ व सिव्हील सर्जन अहमदनगर या तीन सदस्यांची समिती गठी करुन त्यांचेसमोर मुलाखती घेणेत याव्यात."

तथापि, उपरोक्त दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशनमध्ये संस्थान रुग्णालयाचे रिक्त पदांवर Ad hoc basic वर कंत्राटदारांमार्फत नेमणुका करणेकामी प्रार्थना करणेत आली होती. मात्र त्याबाबत मा.न्यायालयाकडून कोणत्याही प्रकारचे निर्देश तथा आदेश देण्यात आलेले नाहीत.

श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालय अनुक्रमे २०० ते ३०० बेडचे असुन त्यासाठी शासनाकडून मंजुर असलेल्या आकृतीबंधानुसार तसेच मा. त्रिसदस्य समितीचे निर्णय व मा. न्यायालयाचे परवानगीने आवश्यक वैद्यकीयअधिका-यांच्या भरतीबाबत वर्तमानपत्र तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन मुलाखतीद्वारे भरती करण्यात येते. तथापि जाहिरात प्रसिद्ध केल्यापासुन ते नेमणूक आदेश देईपर्यंतचा कालावधी हा फारच मोठा असल्याने मुलाखतीस उपस्थित असलेल्या जेमतेम उमेदवारांतून काही पात्र उमेदवारांची निवड होते. तथापि, ब-याचशा वेळेसपात्र ठरलेले उमेदवार निरनिराळ्या कारणास्तव इतर रुग्णालयात कामावर हजर होतात. तसेच संस्थानमार्फत मिळणा-या सवलती (उदा. वेतन, कॅन्टीन सुविधा, निवासस्थान इ.) विचारात घेतल्यास निवड केलेल्या उमेदवारांमधुन बोटावर मोजण्याइतपतच वैद्यकीय अधिकारी कामावर हजर होतात.

संस्थान रुग्णालयाचे जवळपास दुसरे मोठे कोणतेही अद्ययावत रुग्णालय नसल्याने संस्थान रुग्णालयात कायमच रुग्णांचा ओघ चालु असतो मात्र त्याप्रमाणात तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने रुग्णांवर उपचार होत नाहीत परिणामी रुग्णांना उपचारासाठी नाशिक, पुणे, मुंबई अथवा इतर दुरच्या रुग्णालयात जावे लागते.

रुग्णांना तात्काळ सर्वतोपरी सेवा देणेकामी वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे भरणे अत्यंत आवश्यक आहे. भरतीसाठी लागणारा वेळ तसेच योग्य मानधन तसेच निवासस्थान उपलब्ध करुन दिल्यास अनुभवी वैद्यकीय अधिकारी संस्थान रुग्णालयास प्राप्त होतील अशी आशा आहे.

मा.न्यायालयाने वैद्यकीय अधिका-यांची भरती करणेकामी दिलेल्या पदांवर कायमस्वरुपी उमेदवार मिळत नसल्याने तसेच संस्थानमध्ये पदाची भरती आरक्षण नियमावली नुसार केली जात असल्याने जात प्रवर्गानुसार वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नाहीत.

तरी सदर पदावर व्हिजीटींग अथवा कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात भरती करणेकामी सोबतचे मसुद्यानुसार संस्थानचे संकेतस्थळावर तसेच नाशिक व अहमदनगर येथुन प्रसिद्ध होणा-या स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर आवाहन करता येईल. त्यासाठी शासकीय दराने येणा-या खर्चास मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.३८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१५** **संस्थान रुग्णालयातील फिजिशियन पदावरील डॉक्टरांचे वेतनाबाबत.**

**प्रस्ताव-** रुग्णालयातील रिक्त पदे भरणेकामी व दरम्यानचे काळात Adhoc बेसिसवर नेमणूक करणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. ३९३९/२०१५ दाखल करणेत आले होते व त्यावर मा न्यायालयाने दि १७/०२/२०१५ रोजीचे आदेशान्वये रूग्णालयाची नियमीत रिक्त पदे भरणेसाठी मंजुरी दिलेली आहे.

उपरोक्त मंजुरी मिळाली असली तरी जाहिरात, मुलाखती याकामी काहीसा कालावधी लागणार होता. त्यामुळे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फिजीशियन नसल्याने रुग्णांची होणारी गैरसोय विचारात घेता तातडीची गरज म्हणुन नियमित नेमणुका करेपर्यंत Adhoc बेसिसवर फिजिशियनची रिक्त पदे भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. ५०७१/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर मा.न्यायालयाने दि. ०६/०५/२०१५ रोजीचे आदेशान्वये रुग्णालयातील फिजिशियन्सची रिक्त पदे Adhoc बेसिस वर भरणेस परवानगी दिलेली आहे. सदर मंजूरीनुसार नवीन फिजिशियन घ्यावयाचे झाल्यास त्यांना दि.२०/११/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीतील निर्णय क्र.१०१६ नुसार, स्थायी पदावर नव्याने रुजू होणा-या वैद्यकिय अधिका-यांसाठी असलेले सुरवातीचे वेतनाइतके म्हणजेच रू ६१०००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता दिला गेला असता. मात्र हे वेतन फारच कमी असल्याने फिजीशियन पदावर कोणीही काम करणेस इच्छुक नसतात.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद सिव्हिल ॲप्लिकेशन नं.३९३९/२०१५ नुसार दि. १७/०२/२०१५ रोजीचे आदेशानुसार संस्थान रुग्णालयाचे रिक्त पदे भरणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. जाहिरातीस अनुसरून विविध पदांसाठी अर्ज प्राप्त झाले होते. मात्र

फिजीशियन या पदासाठी फक्त एकच अर्जदार पात्र ठरल्याने त्यास मुलाखतपत्रही पाठविणेत आले होते तथापि ते मुलाखतीस उपस्थित राहिले नसल्याने फिजिशियनची जाहिरातीत नमुद केलेली ५ पदे रिक्त राहणार आहेत.

सध्या श्री साईबाबा रुग्णालयामध्ये एकच फिजिशियन असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे. रुग्णांना चांगली सेवा देणेकामी आणखी फिजिशियनची आवश्यकता आहे.

-मा.मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद सिव्हिल ॲप्लिकेशन नं.५०७१/ २०१५ नुसार दि.०६/०५/२०१५ रोजीचे ओदशानुसार ५ फिजिशियन Adhoc बेसिस पध्दतीने नेमणेस मान्यता मिळालेली आहे. तथापि त्यांना किती मानधन द्यावे याचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे फिजिशियन पदावर Adhoc बेसिसवर कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या व येथून पुढे घेण्यात येणा-या डॉक्टरांना उपरोक्त नमुद केलेल्या वेतनापेक्षाही जास्त म्हणजेच कमीत कमी प्रति महिना रु. १,५०,०००/- एकत्रित मानधन दिल्यास फिजिशियन मिळणे सोईस्कर होईल असे नम्र मत आहे.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.३८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थान रुग्णालयातील फिजिशियन पदावरील डॉक्टरांना प्रस्तावात नमुद केलेले मानधन कोणत्या आधारावर द्यावयाचे हे स्पष्ट होत नाही, करीता फिजीशियन पदासाठी इतर रुग्णालयांमध्ये किती मानधन/ वेतन देण्यात येते याचा तौलानिक अभ्यास करावा व मा.उच्च न्यायालयाच्या परवानगीची आवश्यकता नमुद करणेत येऊन, सविस्तर प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१६ श्री साईनाथ रुग्णालयातील पदव्युत्तर पदविकाधारक यांना तीन व पदव्युत्तर पदवीधारक वैद्यकीय अधिकारी यांना सहा वेतनवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन निर्णय क्रमवैअ-२०११/ प्रक्र७७६/ सेवा३ दि. १४/१२/२०११ व महाराष्ट्र शासन निर्णय क्रमवैअ-२०११/ प्रक्र७७६/ सेवा-३ दि. १९/११/२०१२ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयात "सार्वजनिक आरोग्य विभागातील ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, मनोरुग्णालये व अति विशिष्ट सेवा रुग्णालये या संस्थांमधून रुग्णांना आरोग्य सेवा देण्यासाठी त्या ठिकाणी बालरोग तज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, भिषक, भुलतज्ञ, मानसोपचार तज्ञ, त्वचारोग तज्ञ, शल्य चिकित्सक, अस्थीव्यंगोपचार तज्ञ, क्षकिरण तज्ञ, क्ष किरण तज्ञ, क्षयरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ, नाक कान घसा तज्ञ इत्यादी विशिष्ट प्रकारच्या विशेषज्ञ वैद्यकीय अधिका-यांची आवश्यकता असते. उपरोक्त आरोग्य संस्थामध्ये प्रत्येक प्रकारच्या विशेषज्ञांच्या आवश्यकतेसंबंधीचे निकष संदर्भीय शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. वरील निकष विहित करण्यात आले असते तरी उपरोक्त आरोग्य संस्थामध्ये पदव्युत्तर पदवी/ पदविका शैक्षणिक अर्हता धारक करणारे वैद्यकीय अधिकारी कमी प्रमाणामध्ये उपलब्ध असल्यामुळे रुग्णांना आवश्यक असणा-या सेवा पुरवितांना अडचण येत आहे. राज्यातील आरोग्य संस्थामध्ये विशेषज्ञांची असलेली कमतरता दूर करण्यासाठी विविध विषयातील पदव्युत्तर पदवी/ पदविका धारक उमेदवारांना वैद्यकीय अधिकारी पदावर आकर्षित करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहनपर वेतनवाढी मंजूर करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती. शासननिर्णय महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४००) या पदावर नियुक्ती झाल्यानंतर पदव्युत्तर पदवीका धारकास तीन अतिरिक्त वेनवाढी व पदव्युत्तर पदवी धारकास सहा अतिरिक्त वेतनवाढी मंजुर करण्यात याव्यात." असे नमुद केले आहे.

श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांनी याकामी वेळोवेळी पारित झालेले शासन निर्णयास अनुसरुन दि. २५/०७/२०१२, दि. ०९/०२/१३ व दि. २५/०८/२०१४ या अर्जान्वये अतिरीक्त वेतनवाढी मिळणेसाठी मागणी केली होती. त्यानुसार दि. १८/०२/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेसमोर दि. १४/१२/२०११ रोजीचा शासन निर्णय विचारात घेऊन प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदरच्या प्रस्तावात श्री साईबाबा रुग्णालयाकडील कर्मचा-यांना प्रोत्साहन भत्ता अदा केला जात असल्याने त्यांना या विशेष वेतनवाढीचा लाभ देता येणार नाही.तसेच श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी यांना या विशेष वेतनवाढी द्यावयाच्या झाल्यास त्यांना विशेष वेतनवाढ किंवा सानुग्रह अनुदान या पैकी एकाची निवड करणे आवश्यक आहे, असे नमुद करण्यात आले होते.

उपरोक्त प्रस्तावावर खालील प्रमाणे निर्णय क्र ६६ झालेला आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमवैअ-२०११/प्रक्र७७६/सेवा३दि.१४/१२/२०११ अन्वये श्री साईनाथ/श्री साईबाबा हॉस्पिटलमधील पदव्युत्तर पदविधारक यांना तीन व पदव्युत्तर पदवीधारक वैद्यकीय अधिकारी यांना सहा वेतनवाढी देणेत तत्वतः मान्यता देण्यात आली.

तसेच संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा खंडपीठाच्या मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी,असे ठरले.

मा.त्रिसदस्य समितीच्या निर्णयानुसार मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३९३८/२०१५ सादर करणेत आले त्यावर दि. १०/०४/२०१५ रोजी मा न्यायालयाने खालील प्रमाणे आदेश दिलेले आहेत.

The applicant be directed to pay three additional increments to the doctors working on the establishment of Sainath Hospital who have completed Diploma in the respective discipline and six additional increments to the doctors who have completed post-graduation degree in the

respective discipline from the date of passing of the resolution and upon the terms and conditions in the said resolution No.66 dated 18.02.2015.

It appears that, the Government Resolution dated 14.12.2011 permits grant of such additional increments to the Medical Officers holding diploma and post-graduate degree. The applicant may grant such additional increments as prayed in prayer clause (B) of this Civil Application strictly in adherence to the Ggovernment Resolution dated 14.12.2011. The same will be effective from the date of resolution passed by the applicant dated 18.02.2015.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव व मा न्यायालयाचा आदेश व दि.१४/१२/२०११ रोजीचे शासन निर्णयातील तरतुदीनुसार साईनाथ रुग्णालयाकडील पात्र वैद्यकीय अधिका-यांना जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एच आर/ १२८/ २०१५ दि. २२/०६/२०१५ अन्वये वेतनवाढी देणेत आलेल्या आहेत.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र वेतन १५१४/प्रक्र३८५/सेवा २दि.२०/०८/२०१४ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयातमहाराष्ट्र शासन निर्णय क्रमवैअ-२०११/प्रक्र७७६/सेवा ३ दि. १४/१२/२०११ व महाराष्ट्र शासन निर्णय क्रमवैअ-२०११ /प्रक्र७७६/सेवा ३दि. १९/११/२०१२ मध्ये नमुद शासन निर्णयान्वये फक्त वैद्यकीय अधिकारी (वेतनब्रॅन्ड रु १५६००-३९१०० ग्रेड पे ५४००) या पदावर कार्यरत असलेल्या पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका धारकांस३ व ६ अतिरिक्त वेतनवाढी लागू असल्याने सदर वैद्यकिय अधिकारी व त्यांच्यापेक्षा वरिष्ठ श्रेणीतील अधिका-यांच्या वेतनापेक्षा जास्त असणा-या अिधका-यांच्या वेतनापेक्षाजास्त होत आहे.सदर वेतन तफावत दूर करण्यासाठीतसेच विभागाच्या अधिपत्याखालील वरिष्ठ पदांवर उमेदवारांना आकर्षित करण्यासाठी व शासन सेवेतील अधिका-यांना शासन सेवेत टिकवून ठेवण्यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट अ मधील वेतनबॅन्ड रु १५६००- ३९१०० ग्रेड पे ६६०० व याहून अधिक वेतनश्रेणीच्या पदावर कार्यरत असणा-या अधिका-यांना दि. १४/१२/२०११ च्याशासन निर्णयाच्या धर्तीवर प्रोत्साहनपर वेतनवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासननिर्णय महाराष्ट्र वैद्यकीय वआरोग्य सेवा गट अमधील वेतन बॅन्ड रु १५६००-३९१०० ग्रेडपे ६६०० व याहून अधिक वेतनश्रेणीच्या पदावरकार्यरत असणा-या विशेषज्ञ संवर्ग, जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग, जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील, पोलीस शल्य चिकित्सक तसेच उपसंचालक, सहसंचालक, अतिरिक्त संचालक व संचालक, आरोग्य सेवा या पदावरील पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवी शैक्षणिक अर्हताधारक अधिका-यांना अनुक्रमे ३ व ६ अतिरिक्त प्रोत्साहनात्मक वेतनवाढी मंजुर करण्यात येत आहेत. असे नमुद आहे.

उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिका-यांच्यादि. २५/०६/२०१५ अर्जामध्ये नमुद केलेल्या वैद्यकीय अधिका-यांनी (मधील वेतनबॅन्ड रु १५६००- ३९१०० ग्रेड पे ६६०० व याहून अधिक वेतनश्रेणी असलेले) अतिरिक्त वेतनवाढी मिळणेबाबत विनंती केली आहे.

यापुर्वी मा व्यवस्थापन समितीचा ठराव व मा न्यायालयाचा आदेश व दि. १४/१२/२०११ रोजीचे शासन निर्णयातील तरतुदीनुसार साईनाथ रुग्णालयाकडील पात्र वैद्यकीय अधिका-यांना तीन अतिरिक्त वेतनवाढी दिलेल्या आहेत त्यामुळे आता महाराष्ट्र शासन निर्णय क्रवेतन१५१४/प्रक्र३८५/सेवा २ दि. २०/०८/२०१४ मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयानुसार संबंधीतव वैद्यकीय अधिका-यांना (वेतनबॅन्ड रु १५६००-२९१०० ग्रेड पे ६६०० याहून अधिक वेतनश्रेणी असलेले) अतिरिक्त वेतनवाढी देता येतील.

शासन निर्णयानुसार श्री साईनाथ रुग्णालयातील पात्र वैद्यकीय अधिका-यानां ३ व ६ वेतनवाढ देणेकामी मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर अर्ज दाखल करणेकामी निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शासन निर्णयानुसार श्री साईनाथ रुग्णालयातील पात्र वैद्यकीय अधिका-यांना ३ व ६ वेतनवाढी देणेकामी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर अर्ज दाखल करणेत येऊन मा.खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील काही वार्डचे बेडचार्जेस व टीएसआर वॉर्डचे शस्त्रक्रिया सेवांच्या सुधारीत दरपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मा.व्य.स.सभेतील निर्णय क्र.१९६/दि.०८.०३.२००९ अन्वये, सुधारीत दर दि.१६.०२.२००९ पासुन लागु करणेत आले आहेत. सदर दर लागु करतांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये २०४ बेडस् उपलब्ध होते. रुग्णांना अधिकाधिक सेवा उपलब्ध करुन देण्याचे हेतुने आवश्यकतेप्रमाणे बेडची संख्या वाढवुन ती सध्या २३६ इतकी झालेली आहे. बेडची संख्या वाढवितांना पुर्वी ज्या स्पेशल रुममध्ये दोन बेड होते, त्या रुममध्ये आणखी एक बेड वाढवुन बेडची संख्या तीन करणेत आली आहे. त्याचप्रमाणे एसी स्पेशल रुममध्ये एक बेड होता, तेथेही आणखी एक बेड वाढवुन तेथील बेड संख्या दोन करणेत आली आहे. काही रुम/वॉर्डमध्ये बेडसंख्या वाढल्यामुळे खालीलप्रमाणे काही दरात सुधारणा करणे आवश्यक आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील काही वॉर्डमध्ये खांटाचे संख्येत फेरबदल करुन महिला जनरल वॉर्डमध्ये खाटांची संख्या ३५ ऐवजी २७, टीएसआर २८ ऐवजी ३६ तर एसपीआर ४ ऐवजी ८ करणेत आलेली आहे. त्यामुळे खाटांचे दरांमध्येही बदल करणे गरजेचे आहे.

**Bed Charges (At Present)**

| Service | Chages Rs. | | |
|---|---|---|---|
| Bed Specification | Female Ward (35 Beds) | TSR (28 Beds) | SPR with AC (4 Beds) |
| Charges | 60 | 300 | 700 |
| Nursing Charges | -------- | 35 | 60 |

**Bed Charges (Proposed)**

| Service | Chages Rs. | | |
|---|---|---|---|
| Bed Specification | Female Ward (27 Beds) | TSR (36 Beds) | SPR with AC (8 Beds) |
| Charges | 110 | 160 | 600 |
| Nursing Charges | 35 | 35 | 60 |

General Surgery (General Surgeon, Orthopedic, Oral & Maxilla-Facial, Gynecology ENT), Ophthalmology, Neuro Surgery, Plastic Surgery & Urology Surgery यांची ऑपरेशन चार्जेसचे दर जनरल वॉर्डपेक्षा टीएसआर ला १५% एसपीआर दर ३०% व डिलक्स रुमचे दर ४५% ने जास्त आहेत. परंतु जनरल वॉर्डपेक्षा रुग्ण ॲडमिट होण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे प्रत्येक रुग्ण जनरल वॉर्डचे बेडचार्ज व सर्जरी चार्ज इतर वॉर्डपेक्षा कमी असल्याने जनरल वॉर्डची मागणी करतात. सर्जरी चार्जेस व्यतिरीक्त टीएसआरमध्ये इतर सर्व चार्जेस जनरल वॉर्डप्रमाणे लागु आहेत, त्यामुळे टीएसआरचे सर्जरी चार्ज (सर्जन, भुलतज्ञ व ओटी दर) जनरल वॉर्डचे सर्जरी दरांप्रमाणे करणे आवश्यक आहे.

**I. Surgical Operative Charges (At Present)**

| Category Suggested | Gen.Surgery Charges | | Opthalmalogy charges | |
|---|---|---|---|---|
| | GW/Semi Pvt | **TSR** | GW/Semi Pvt | **TSR** |
| Minor | 500 | **575** | 500 | **575** |
| Intermediate | 1,000 | **1,150** | 1,000 | **1,150** |
| Major | 2,000 | **2,300** | 2,000 | **2,300** |
| Major + | 4,000 | **4,600** | 4,000 | **4,600** |
| Supra Major | 8,000 | **9,200** | 8,000 | **9,200** |
| Supra Major+ | 15,850 | **18,230** | 15,850 | **18,230** |

**Surgical Operative Charges (Proposed)**



| Category Suggested | Gen.Surgery Charges | | Opthalmalogy charges | |
|---|---|---|---|---|
| | GW/Semi Pvt | **TSR** | GW/Semi Pvt | **TSR** |
| Minor | 500 | **500** | 500 | **500** |
| Intermediate | 1,000 | **1,000** | 1,000 | **1,000** |
| Major | 2,000 | **2,000** | 2,000 | **2,000** |
| Major + | 4,000 | **4,000** | 4,000 | **4,000** |
| Supra Major | 8,000 | **8,000** | 8,000 | **8,000** |
| Supra Major+ | 15,850 | **15,850** | 15,850 | **15,850** |

**II. Surgical Operative Charges (At Present)**

| Category Suggested | Neuro Surgery Charges | | Plastic Surgery Charges | | Uro Surgery Charges | |
|---|---|---|---|---|---|---|
| | GW/Semi Pvt | **TSR** | GW/Semi Pvt | **TSR** | GW/Semi Pvt | **TSR** |
| **Major** | 4,400 | **5,060** | 2,640 | **3,035** | 3,520 | **4,050** |
| **Supra Major** | 12,680 | **14,580** | 7,040 | **8,095** | 8,800 | **10,120** |
| **Supra Major+** | 25,300 | **29,095** | 13,200 | **15,180** | 15,840 | **18,215** |

**Surgical Operative Charges (proposed)**

| Category Suggested | Neuro Surgery Charges | | Plastic Surgery Charges | | Uro Surgery Charges | |
|---|---|---|---|---|---|---|
| | GW/Semi Pvt | TSR | GW/Semi Pvt | TSR | GW/Semi Pvt | TSR |
| **Major** | 4,400 | **4,400** | 2,640 | **2,640** | 3,520 | **3,520** |
| **Supra Major** | 12,680 | **12,680** | 7,040 | **7,040** | 8,800 | **8,800** |
| **Supra Major+** | 25,300 | **25,300** | 13,200 | **13,200** | 15,840 | **15,840** |

तरी उपरोक्त प्रमाणे सुधारीत दरास मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीस समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.३८८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील काही वार्डचे बेडचार्जेस व टीएसआर वॉर्डचे शस्त्रक्रिया सेवांच्या प्रस्तावात नमुद केलेल्या सुधारीत दरपत्रकास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१८ श्री साईबाबा रुग्णालयातील दंत विभागासाठी मटेरीयल खरेदीबाबत.**

प्रस्ताव- श्रीसाईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०१५- १६ या वर्षाकरिता लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य खरेदीकामी येणा-या अंदाजे रु. ५५७३३६३९१.६६ चे खर्चास व औषधे खरेदीची कार्यपध्दत अ. नं. १ ते १० चे प्रस्तावास मान्यता घेण्याचा प्रस्ताव दि. ३०/०१/२०१५ मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यात आला होता यावर चर्चा होऊन निर्णय क्र. २६ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णलयाकरिता वार्षिक सन (२०१५ -१६) या वर्षाक्रिता लागणारे औषधे सर्जिकल साहित्य प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ५५७३३६३९२/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी येणा'या खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा. उच्च् न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी असे ठरले.

त्यानुसार सदरचे खरेदीस सिव्हील अॅप्लीकेशन नं. ३४९५ दि. १३/०३/२०१५ अन्वये ई निविदा मागवून खरेदी करण्यास मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदर खरेदीकामी ई निविदेची जाहिरात संस्थानचे संकेत स्थळावर तसेच दैनिक सकाळा – पुणे, टाईम्स ऑफ इंडीया– मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, चंदीगढ या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली. याशिवाय संस्थान नियमित पुरवठा करणारे कंपनी/ अधिकृत विक्रेत यांना देखील ई– मेल दूरध्वनीव्दारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

सदर खरेदीकामी जाहीरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. तद्नंतर जाहिरातीस अनुसरुन PART A करिता B करिता ३४ तांत्रिक निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सदर ऑनलाईन तांत्रिक निविदा दि. ११/०५/२०१५ रोजी मा. वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आल्या होत्या. त्यामध्ये दंत विभागासाठी लागणारे मटेरियलकामी एकाही निविदाधारकांची निविदा प्राप्त झाली नव्हती तसेच सदरकामी मागील वर्षी सुध्दा दोनदा निविदा काढण्यात आल्या होत्या, तेंव्हा सुध्दा कोणीही निविदा भरलेली नव्हती मागील तीन वर्षाचा अनुभव पाहाता निविदा व कोटेशन मागवून सुध्दा त्याकामी कोणीही सहभाग घेत नाहीत.

परंतु, दंड विभागात सध्या मटेरियल उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी दैनंदिन वापरासाठी खालील मटेरियलची मागणी केलेली होती.

| Sr. No. | Material Name | Qty |
|---|---|---|
| 1 | Yellow Stone | 5 Bag |
| 2 | Zing oxide paste | 1 |
| 3 | Alginate | 10 Bag |
| 4 | Dycal | 1 |
| 5 | RVG plastic cover box | 1 |
| 6 | Alloy silver | 1 |
| 7 | K file 15-40 | 10 |
| 8 | GIC Type I big | 1 |
| 9 | GIC Type II big | 1 |
| 10 | Mircle mix | 1 |
| 11 | Crown & Broge preposition kit | 1 |

उपरोक्त मटेरीयल हे दंत विभागात तातडीने आवश्यक आहे. त्यामुळे सदर मटेरीयलची आवश्यकता पाहता ते तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. त्यामुळे M/s. Daule Distributors, Rahuri यांनी दि. ११/०८/२०१५ रोजी खालील प्रमाणे दरपत्रक दिलेले आहे.

| Sr. No. | Material Name | Qty | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Yellow Stone | 5 Bag | 150.00 | 750.00 |
| 2 | Zing oxide paste | 1 | 470.00 | 470.00 |
| 3 | Alginate | 10 Bag | 360.00 | 3600.00 |
| 4 | Dycal | 1 | 1350.00 | 1350.00 |
| 5 | RVG plastic cover box | 1 | 850.00 | 850.00 |
| 6 | Alloy silver | 1 | 2150.00 | 2150.00 |
| 7 | K file 15-40 | 10 | 210.00 | 2100.00 |
| 8 | GIC Type I big | 1 | 2950.00 | 2950.00 |
| 9 | GIC Type II big | 1 | 2350.00 | 2350.00 |
| 10 | Mircle mix | 1 | 4650.00 | 9300.00 |
| 11 | Crown & Broge preposition kit | 1 | 4850.00 | 4850.00 |
| | | | **Total Amount in Rs.** | **30720.00** |

सदर मटेरियल खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ३०७२०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी :-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील दंत विभाग यांची वार्षिक मागणीन्वये.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्य व अधिकार क्र. १७(२) ण अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यालयास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी उपरोक्त प्रमाणे दंत मटेरियल खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३०७२०/- चे खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.३८९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील दंत विभागासाठी प्रस्तावात नमुद केलेले मटेरीयल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३०,७२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१९ **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.नं.२ करीता Syringe Pumps खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद –** १७ (२) ण.

**प्रास्ताविक–** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 मध्ये दि. १०/०४/२०१५ रोजी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती त्यामुळे ओ.टी. मधील Syringe Pumps खराब झालेले आहे. त्यामुळे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 विभागाने दि.11/04/2015 (औषध भांडार प्राप्त दि.12/04/2015) चे मागणी पत्रकान्वये ५ नग Syringe Pumps ची मागणी केलेली आहे. सदर Syringe Pumps करीता प्रती नग अंदाजे रु.५१०००/- याप्रमाणे ५ नग Syringe Pumps खरेदीकामी एकूण रक्कम रु.२,५५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२५/०९/२०१४ निर्णय क्र.८६९ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयात नवीन Surgical ICU या विभागाकरिता लागणारे Syringe Pump विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. 9,18,000/- चे खर्चास मान्यता मिळालेली असून त्याकामी प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक सिलबंद निविदा उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. सदर खरेदीचे वेळेस अजुन एक ५ नग संख्या वाढवून घेऊन सदर Syringe Pumps खरेदी करता येईल. तसेच जून्या खराब झालेल्या Syringe Pumps ची विमा पॉलीसी काढण्यात आलेली होती त्यामुळे सदर Syringe Pumps खरेदी केल्यानंतर त्याचे बील संस्थानला विमापॉलीसी कडून परत मिळेल.

**मागणी–** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 विभागाचे. दि.17/05/2015 (औषध भांडार प्राप्त दि.12/05/2015).

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** १) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईबाबा रुग्णालयात नवीन Surgical ICU या विभागाकरिता लागणारे Syringe Pump खरेदीचे वेळेस अजुन ५ नग संख्या वाढवून घेऊन सदर Syringe Pumps खरेदी करता येईल. तसेच जून्या खराब झालेल्या Syringe Pumps ची विमा पॉलीस काढण्यात आलेली होती त्यामुळे सदर

Syringe Pumps खरेदी केल्यानंतर त्याचे बील संस्थानला विमापॉलीसी कडून परत मिळेल त्यामुळे Syringe Pumps नविन खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदरचे ०५ नग Syringe Pumps श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन Surgical ICU या विभागाकरिता खरेदी करण्यात येत असलेल्या Syringe Pumps चे खरेदीचे वेळेस ०५ नग संख्या वाढवून घेण्यास तसेच याकामी येणा-या रु.२,५५,०००/- चे खर्चास मान्यता घेणेसाठी सदर प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन Surgical ICU या विभागाकरिता Syringe Pumps खरेदीची प्रक्रिया चालू असून सी.व्ही.टी.एस.ओ.टी.नं.२ करीता आवश्यक असलेले ०५ नग Syringe Pumps चा याच खरेदी प्रक्रियेमध्ये समावेश करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,५५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२०** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.नं.२ करीता Cautery Machine खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 मध्ये दि. १०/०३/२०१५ रोजी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती त्यामुळे ओ.टी. मधील Cautery Machine जळाल्यामुळे खराब झालेले आहे. त्यामुळे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 विभागाने दि.11/05/2015 (औषध भांडार प्राप्त दि.14/05/2015) चे मागणी पत्रकान्वये 1 नग Cautery Machine ची मागणी केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत**-सदर कापड महराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या.मुंबई यांचेकडुन खरेदी करणेस व कापड खरेदी केल्यानंतर सदर कापडाचे ड्रेस शिवुन घेणे गरजेचे राहील त्यामुळे सदर कापडाचे ड्रेस शिवण्याकरीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन शिवुन घेणेस व येणा-या जास्तीच्या खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यक असणा-या लिननचे कापड मे.महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या., मुंबई या एकाच ठराविक कंपनीकडून खरेदी करणे ऐवजी याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी.**

**तसेच कापड प्राप्त झाल्यानंतर शिलाईकामी विहीत पध्दतीने निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३३** **बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिनचे (Konelab 20i) PM Kit खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅब मध्ये रूग्णांचे रक्त तपासणी करणेकामी मे.ट्रिव्हीट्रॉन डायग्नॉस्टिक प्रा. लि. मुंबई यांचेकडुन Konelab 20i हे बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिन एकुण रू. 16, 50,000/-इतक्या रकमेत सन 2005 यावर्षी खरेदी करण्यात आले आहे. सदर मशिन दि. 03/01/06 रोजी कार्यान्वीत करणेत आले असुन सध्या नियमीत वापरात आहे. सध्या दि. 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधीत वार्षीक सर्व्हीस कॉंट्रक्ट करणेत येत आहे. सदर कालावधीत दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या स्पेअर पार्टची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सदर मशिन मधील लॅम्प, टयुबींग्स, मिक्सींग पॅडल, डिस्पेसिंग सिरींज इ.कन्झुमेबल स्पेअर पार्टचा समावेश असलेली PM Kit वर्षातुन एकदा बदलणे आवश्यक असते. अन्यथा मशिनवर केल्या जाणाऱ्या तपासण्यांचे निष्कर्ष चुकीचे येउ शकतात. सदरचे पार्ट कन्झुमेबल प्रकारचे असल्यामुळे कंपनी AMC/CMC कालावधीमध्ये बदलुन देत नाही.

कंपनीने त्याचे पत्र क्र. TRI/August/18/31,दि.18/08/2015 (रूग्णालये प्राप्त दि. 18/08/2015) अन्वये बायोकेमिस्ट्री ऑटोॲनालायझर मशिनची PM Kit बदलुन घेणेकामी सर्व करांसहित एकुण रू. 87,990/-इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन कंपनीने सदर रक्कमेची आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेअंती वरील पार्ट श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये प्राप्त झाल्यानंतर सदर रक्कम अदा होणेस स्वीकृती दर्शविली आहे. सदर बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिनचे स्पेअर पार्टसाठी मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि.चैन्नई हे एकमेव पुरवठाधारक आहेत. सदर 12 Months PM Kit मधील स्पेअर पार्ट हे विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपनीकडे उपलब्ध होत नाहीत. सदर मशिन नियमीत वापरात असल्याने तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. तसेच सदर कंपनी हे एकमेव पुरवठाधारक आहेत. त्यामुळे मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. चैन्नई यांचेकडुन बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिन करीता 12 Months PM Kit खरेदी करणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा. लि. चैन्नई यांचेकडुन बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिन करीता 12 Months PM Kit खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. 87,990/- च्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा.लि., चैन्नई यांचेकडुन बायोकेमिस्ट्री ऑटो ॲनालायझर मशिन करीता 12 Months PM Kit खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु.८७,९९०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३४** **सी.व्ही.टी.एस.ओ.टी.क्र.०२ मध्ये झालेल्या दुर्घटनेबाबत अहवाल.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि.१०.०४.२०१५ रोजी पहाटे ५.०० वाजेच्या दरम्यान सीआरयू-३ विभागातील ऑनडयुटी वॉर्डबॉय श्री अनिल महाले, व ऑनडयुटी स्टाफ नर्स, श्रीमती शितल शेळके, श्रीमती लिला गायकवाड यांना सी.व्ही.टी.एस. ओटी क्र.०२ पॅसेजचे दरवाज्यातून धुर व काहीतरी जळाले असल्याचा वास येऊ लागला. त्यांनी तातडीने ऑनडयुटी इलेक्ट्रीशियन श्री.संजय पगारे यांना फोनव्दारे सदर माहिती कळविली. सदर इलेक्ट्रीशियन यांनी सीआरयू-३ विभागात येऊन पाहणी केली असता सी.व्ही.टी.एस. ओटी २ मधुन धुर येत असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी ऑनडयुटी स्टाफ नर्स यांचेकडुन सदर ओ.टी. दरवाज्याची चावी घेऊन उघडले असता ओटीमध्ये फक्त प्रचंड काळा धुर दिसत होता व आतमध्ये इतर काहीच दिसत नव्हते. त्यांनी ऑनडयुटी बायोमेडीकल टेक्निशियन श्री.निर्मळ बापुसाहेब यांना बोलावून घेतले श्री निर्मळ यांनी ज्यु.बायोमेडीकल इंजिनिअर श्री सचिन जगताप व सि.बायोमेडीकल इंजिनिअर श्री राजेश वाकडे, यांना कळविले. श्री सचिन जगताप व श्री वाकडे यांनी सकाळी ०५.१५ वाजता प्रत्यक्ष येऊन ओटी मध्ये जाण्याचा प्रयत्न केला. परंतु धुरामध्ये प्रचंड त्रास होत असल्यामुळे ते शक्य झाले नाही त्यांनी इलेक्ट्रीशियनमार्फत ओटीचा पॉवर सप्लाय तात्पुरता बंद केला. त्यानंतर संस्थानचे फायर सेफ्टी विभागाचे श्री कैलास कोते हे आले असता श्री जगताप यांनी त्यांचेसोबत CO2 सिलेंडर घेऊन ओटीमध्ये जाऊन ओटी टेबलचे पेटलेले मॅट्रेस विझविले. त्यानंतर ओटीमधील धुर नाहिसा करण्याकरिता सेंट्रल एसी व स्प्लीट एसी श्री वाकडे यांनी चालू केला. तसेच ओटी समोरील रुमचा पॅसेजकडे जाणारा दरवाजा उघडून ठेवला, त्याच दरम्यान मा.वैद्यकीय संचालक डॉ.प्रभाकरराव यांनी भेट दिली असता, त्यांनी स्वत: श्री वाकडे यांना बरोबर घेऊन सीआरयू-३, सी.व्ही.टी.एस. ओटी १, पॅसेज, ओटी २ पॅसेज, या ठिकाणच्या सर्व खिडक्या उघडल्या.

सकाळी ६.३० पर्यंत ओटी २ मधील धुर कमी होऊन ओटीमध्ये प्रत्यक्ष जाता आले. त्यावेळी ओटीमध्ये अजुनही थोडे जळत असलेले टेबल मॅट्रेस ओटीचे बाहेर काढून बिल्डींगच्या मागील बाजुस मोकळया जागेत नेऊन विझविले. आतापर्यंत ओटीतील संपुर्ण आग विझली होती तसेच फक्त थोडासा धुर शिल्लक होता. मा.कार्यकारी

अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी झालेले चर्चेत ठरलेप्रमाणे ओटी विभागाचा विमा उतरविला असल्याचे माहिती झाल्याने इंश्युरन्स कंपनीचे एजंट यांना तसेच शिर्डी पोलीस स्टेशन यांना कळविण्यात आले.

सकाळी ८.३० वाजेच्या दरम्यान वैद्यकीय प्रशासक, डॉ.मैथिली पितांबरे व उप वैद्यकीय संचालक, डॉ.विजय पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली व पुढील कार्यवाहीचे निर्देश दिले. इंश्युरन्स एजंट श्री थोरात यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे सर्व्हेअर श्री घाटे यांना उपरोक्त घटना कळविण्यात आली. श्री घाटे यांनी सकाळी ११.३० वा. श्री साईबाबा हॉस्पिटल येथे भेट देऊन सदर ओटी ची पाहणी केली व पंचनामा, अहवाल तयार केला. त्यांना आवश्यक ती माहिती, मशिनची यादी किंमतीसह देण्यात आली. त्यांनतर दुपारी १२.३० वाजता शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक श्री कहाळे यांनी त्यांचे कर्मचा-यांसह भेट देऊन सदर घटनेचा पंचनामा केला. त्यांना आवश्यक ती माहिती, मशिनची यादी किंमतीसह देण्यात आली. तसेच दुपारी १.०० वा. शिर्डी येथील कामगार तलाठी श्री अनिल मांढरे, यांनी समक्ष भेट देऊन सदर ओटी मधील घटनेचा पंचनामा दु.३.३० वाजता पुर्ण केला. त्यांना देखील आवश्यक ती माहिती, मशिनची यादी किंमतीसह देण्यात आली.

त्यानंतर विविध चॅनेल व दैनिक वर्तमान पत्राचे पत्रकार यांनी समक्ष भेट देऊन सदर घटनेची माहिती घेतली. सायं.५.०० वाजेच्या दरम्यान शिर्डी पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक, श्री कहाळे यांनी येऊन ओटी चे पाहणी करुन पंचनामा पुर्ण करुन पोलीस स्टेशनला येण्यास सांगितले. त्यानंतर रा.८ वाजता श्री वाकडे, व श्री जगताप शिर्डी पोलीस स्टेशनला जाऊन पोलीस निरीक्षक श्री प्रमोद वाघ यांची भेट घेतली व त्यांनी सांगितले की, विद्युत निरीक्षक अहमदनगर यांचेकडून पंचनामा पुर्ण करुन घ्यावा. त्या अनुशंगाने दुस-या दिवशी दि.११.०४.२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता शिर्डीचे MSEB चे सहा. अभियंता, श्री कोपनर यांनी त्यांचे संबंधातील पंचनामा पुर्ण केला व ओटी चे आतमधील मशिनचे व इतर साहित्याचे स्वच्छता करण्यास हरकत नसल्याचे सांगितले. तसेच शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस उप निरीक्षक, श्री कहाळे यांनी पुढील स्वच्छता / दुरुस्ती करण्याची परवानगी दिली.

संबंधित कंपनीचे इंजिनिअर यांनी रुग्णालयात येऊन ओटी मधील दुर्घटनेत झालेल्या प्रभावित मशिनची तपासणी करुन दुरुस्ती करणेकामी खालीलप्रमाणे कोटेशन दिलेले आहे.

| S.N. | Equipment /Machine | Part to be replace | Approx. Cost in Rs. (Inclusive of all Taxes) |
|---|---|---|---|
| 01 | Maquet O.T. Table | All affected spares | 6,68,669. 00 |
| 02 | Maquet O.T. Light | All affected spares | 4,34,585. 00 |
| 03 | Maquet Heater cooler & Heart Lung machine | Adult Blanket & necessary tubing | 3,89,834. 00 |
| 04 | B Brawn syring pump | Total Pump 3 nos. | 1,65,000. 00 |
| 05 | Drager Anethesia machine | Paw tubing,<br>Vaporiser,<br>O2 sensor. | 1,60,875. 00 |
| 06 | Philips monitor accessories | 3 Lead ECG cable,<br>3 Lead trunk cable,<br>NIBP Cuff with hose pipe. | 17,100. 00 |
| 07 | L & T monitor accessories | 5 Lead ECG cable,<br>NIBP hose pipe,<br>NIBP cuff,<br>IBP cable. | 12,000. 00 |
| 08 | Valley lab cautry machine | Power supply | 2,50,000. 00 |
| 09 | UV Sterilizer | New | 22,000. 00 |
| | | **Total Expenditure =** | **21,20,063. 00** |

उपरोक्त खर्चाची रक्कम विमा कंपनीस देखील कळविण्यात येत आहे.

तसेच याव्यतिरिक्त ओटी मधील Epoxy Flooring चे काम श्री साईबाबा हॉस्पिटलचे खरेदी विभागामार्फत करण्याकरिता अंदाजे प्रती चौरस फुट रु.८५/- दराने एकुण ३१०/- चौ.फु. करिता अंदाजे रु.२६,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे व Hepa filter मॅकेनिकल विभागामार्फत बदलण्यात येणार असुन त्याबाबतची कार्यवाही चालू आहे. तसेच ओटी मध्ये नवीन रंगकाम करण्याचे काम बांधकाम विभागामार्फत सुरु आहे.

तरी सदर अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.४०५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सी.व्ही.टी.एस.ओ.टी.क्र.०२ मध्ये झालेल्या दुर्घटनेच्या अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३५** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये अत्याधुनिक संगणकीकृत करणेकामी साहीत्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल सन २००६ मध्ये कार्यान्वीत झाले. हॉस्पिटल कार्यान्वीत होणेपुर्वी १११ संगणक संच खरेदी करण्यात आले होते. तद्नंतर आवश्यकतेनुसार वेळोवेळी संगणक व संगणकीय साहीत्य खरेदी करणेत आले आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय सेवा जलद गतिने मिळावी या करिता आवश्यक असणारे (HMIS) सॉफ्टवेअर कार्यान्वीत करणेत आले होते.

श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वीत झाली असुन पंचक्रोशीतील रुग्ण याचा लाभ घेत आहेत. दिवसेंदिवस येथे रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. त्याच बरोबर दैनंदिन कामकाजही वाढले आहे. यापुर्वी खरेदी करण्यात आलेल्या संगणकीय साहीत्यापैकी किमान ८०% संगणकीय साहीत्य दुरुस्ती होणाच्या मर्यादेच्या पलीकडे जावून पुर्णतः कालबाह्य झालेले आहेत.

उपरोक्त कालावधीत संगणकाकरिता आवश्यक असणारी (HMIS) प्रणाली कार्यान्वीत करणेत आली होती. परंतु मायक्रोसॉफ्ट कंपनीने सदर प्रणालीला आवेश्यक असणा-या VB6 चा सपोर्ट काढून घेण्यात आलेला असल्याने सदर सॉफ्टवेअरमध्ये काही तांत्रिक अढचणी आल्यास दुरुस्त होत नाही व दैनंदिन कामामध्ये अडचणी उद्भवतात. तसेच HMIS Software तयार करण्यात आलेल्या कंपनीने देखील सपोर्ट बंद केलेला आहे. सध्या JAWA, .NET इ. यासारख्या अत्याधुनिक (HMIS) प्रणाली मार्केटमध्ये उपलब्ध आहेत.

सध्या हॉस्पिटलमध्ये वापरात असणारे संगणक, पुर्णपणे बंद पडलेले संगणक व बंद पडणेच्या स्थितीत असणा-या संगणक व संगणकीय साहीत्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

परिशिष्ट " अ "

| **तपशिल** | **एकुण संख्या** | **सध्या कार्यान्वीत** | **पुर्ण बंद पडलेले** | **बंद पडणेच्या स्थितीत** |
|---|---|---|---|---|
| संगणक | १५१ | ७५ | ७६ | ४० |
| प्रिन्टर्स | १०३ | ५८ | ४५ | ३० |
| युपीएस | १३७ | ४० | ९७ | २० |
| स्विचेस | १८ | १६ | ०२ | १२ |
| सर्व्हर | ०४ | ०२ | ०२ | ०२ |
| लॅपटॉप | ०१ | ०१ | ०० | ०१ |

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे कामकाज सुरळीतपणे चालणेच्या दृष्टीने नवीन संगणक, प्रिंटर्स, स्कॅनर्स, लॅपटॅप, टॅब, संगणकीय साहीत्य, नेटवर्कींग, RF साहित्य, संगणकीय प्रणाली, पॅक्स, ॲन्टीव्हायरस इ. खरेदी करणे आवश्यक आहे. दोन्ही रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार सध्या खालीलप्रमाणे संगणक, संगणकीय साहीत्य व संगणकीय प्रणालीची आवश्यकता आहे.

परिशिष्ट " ब "

| तपशिल | संगणक | प्रिन्टर्स | युपीएस | स्विचेस | सर्व्हर | लॅपटॉप | टॅब |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | १६० | १४० | १८० | २० | ७ | १० | ०५ |

परिशिष्ट " क "

| तपशिल | |
|---|---|
| संगणकीय प्रणाली | श्री साईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता अत्याधुनिक प्रणाली (HMIS), PACS System प्रणाली, Marathi Font प्रणाली व ॲन्टी व्हायरस व इतर सॉफ्टवेअर |



तरी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे याकरिता परिशिष्ट "ब" मध्ये नमुद केलेल्या अत्याधुनिक संगणक, हार्डवेअर साहित्य, नेटवर्कींग, RF साहीत्य, अत्याधुनिक संगणकीय साहीत्य तसेच परिशिष्ट "क" मध्ये नमुद केलेले अत्याधुनिक (HMIS), PACS System, ॲन्टीव्हायरस इ. प्रणाली, खरेदी करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३.५ कोटी मात्रचे खर्चास ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदर प्रस्तावावर मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.४०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये अत्याधुनिक संगणकीकृत करणेकामी प्रस्तावात नमुद केलेले संगणकीय साहीत्य खरेदी करावयाचे आहे. परंतु या साहित्याची कशी, कोठे, किती व कशासाठी आवश्यकता आहे, याचा उल्लेख दिसून येत नाही. करीता या सर्व बाबी माहिती तंत्रज्ञान विभागाकडून तपासून घेण्यात याव्यात व त्यांच्या अभिप्रायासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३६** **विरार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, विरार येथील ०४ ज्यादा इंटर्न घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.०४ जानेवारी 2004 चे सभेतील निर्णयानुसार अटी-शर्तीस अधिन राहून श्री साईनाथ रूग्णालात विरार होमोओपॅथिक मेडीकल कॉलेज, विरार यांचेकडील ०८ इंटर्न दर चार महिन्याकरीता घेणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार सध्या श्री साईनाथ रूग्णलयात विरार होमोओपॅथिक मेडीकल कॉलेज, विरार यांचेकडील ०८ इंटर्न कार्यरत आहे. सदर इंटर्नसहे विनामोबदला सेवा देतात संस्थानमार्फत त्यांची जेवणाची व राहाणेची मोफत व्यवस्था केली जाते.

प्राचार्य, विरार होमोओपॅथिक कॉलेज, विरार यांनी त्यांचे जा.क्र. व्ही.एच.एम.सी./१०४/२०१५ दि. ११/०८/२०१५ चे पत्रान्वये श्री साईनाथ रूग्णालयास ०८ ऐवजी 12 होमोओपॅथिक इंटर्न पाठविणेस परवानगी मिळावी म्हणून विनंती केलेली आहे.

संस्थान रूग्णालयातील दिवसेंदिवस रुग्णाची वाढती संख्या लक्षात घेता, अशा प्रकारचे इंटर्नसची आवश्यकता असून सदर इंटर्नचा फायदा संस्थान रुग्णालयास व परिसरातील गरीब रुग्णांना चांगल्या प्रकारे होत आहे.

तरी, विरार होमीओपॅथिक मेडीकल कॉलेज, विरार येथील पुर्वीचे ०८+ नविन ०४ असे एकुण १२ इंटर्न पुर्वीच्याच अटी-शर्तीवर संस्थान रुग्णालयास घेणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.४०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयातील दिवसेंदिवस रुग्णाची वाढती संख्या लक्षात घेता विरार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, विरार येथील ०४ वाढीव इंटर्न पुर्वीच्याच अटी-शर्तीवर घेण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

विषय नं.३७ **दिनांक ०१ ऑक्टोबर २०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सुरु होणार असल्याने शिर्डी व लगतच्या परीसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेकामी सल्लागार संस्था Tata Consulting Engineers Limited, Noida यांची नेमणूक होणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सन २०१७-२०१८ मध्ये शिर्डी येथे येणा-या साईभक्तांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने दिर्घकालीन गरजा विचारात घेऊन सर्व संबंधित विभागांचा एकत्रित कृती आराखडा तयार करुन त्यानुसार कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र/ राज्य शासन व संस्थान मार्फत आवश्यक निधी/ अनुदान उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अंतिम कृती आराखडा तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन, विधी विभाग निर्णय क्र.सासंवि- २०१३/प्र.क्र.१/का.१६, दि.२२/१०/२०१३ अन्वये सन्मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

याप्रमाणे हाती घ्यावयाच्या प्रकल्पाचे स्वरुप ठरविणेसाठी सर्वांगिण अभ्यास व सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करणेसाठी सल्लागार संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. याबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. सदरहू सभेतील नि.क्र.९४३ अन्वये याकामीया क्षेत्रातील नामांकीत, अनुभवी व मोठया स्वरुपाची कामे केलेल्या सल्लागार संस्थाना निमंत्रित करणेत यावे असे ठरले होते. त्यानुसार दि.१३/१०/२०१४ अखेर पर्यंत अंतीम मूदतीत खालील तीन सल्लागारांचे प्रस्ताव संस्थानकडे जमा झाले.

| अ.न. | सल्लागाराचे नाव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | Tata Consulting Engineers Limited, Noida | ११६८१ / दि.२२/०९/२०१४ |
| ०२. | Fortress Infrastructure Advisory Services, Mumbai | ०१३२८९ / दि.१३/१०/२०१४ |
| ०३. | Ernst & Young LLP, Hyderabad | ०१३२६६ / दि.१३/१०/२०१४ |

सदरहू प्रकल्प हा मोठ्या स्वरुपाचा असल्याने वर नमूद सल्लागार यांनी सादर केलेल्या वाणिज्यीक प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे दि.२०.११.२०१४ रोजीचे सभेत उघडणेत येऊन नि.क्र.८१४ अन्वये उपरोक्त तिन झालेले तांत्रिक व वाणिज्यीक प्रस्तावांचे मुल्यमापन करणेत येऊन त्याचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करण्यात यावा असे ठरले होते.

याकामी तांत्रिक व वाणिज्यीक प्रस्तावांचे मुल्यमापन करणेकामी दि.२०/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९८९/१२ अन्वये सल्लागार Arham Constrotech pvt.ltd. Nashik Road यांचे दर मान्य करुन त्यांचेकडून वरिल प्राप्त प्रस्तावांचे मुल्यमापन करुन घेणेकामी त्यांना नियुक्ती आदेश देण्यात यावा असे ठरले. त्यानुसार Arham Constrotech pvt.ltd. Nashik Road यांना संस्थानचे जा.क्र.४४०६/२०१४ दि.१५/१२/२०१४ अन्वये नियुक्ती आदेश देण्यात आला.

सल्लागार Arham Constrotech pvt. ltd. Nashik Road यांनी उपरोक्त प्राप्त ०३ ही प्रस्तावांचे तांत्रिक व वाणिज्यीक माहितीचे मुल्यमापन करुन त्यांचेकडील दि.०१.०१.२०१५ (आवक नं.०१९३६७, दि.०७.०१.२०१५) अन्वये सविस्तर मुल्यमापन अहवाल सादर केला असून तो सोबत अवलोकनार्थ ठेवला आहे. या अहवालाचा गोषवारा खालिलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name Of Consulting Firm | Technical Score (ST) | Financial Score (SF) | Total Marks S = (STx0.7) + (SFx0.3) | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Tata Consulting Engineers Limited, Noida | 69.95 | 100 (Fees Quoted Rs. 87,30,000) | **78.97** | **Recomnended for award.** |
| 2. | Fortress Infrastructure Advisory Services, Mumbai | 70.23 | 12.23 (Fees Quoted Rs. 7,19,95,000) | 52.83 | |
| 3. | Ernst & Young LLP, Hyderabad | 62.71 | 29.59 (Fees Quoted Rs. 2,95,00,000) | 52.77 | |

उपरोक्त सल्लागार Arham Constrotech Pvt. Ltd., Nashik Road यांचे अहवालानुसार Tata Consulting Engineers Limited, Noida यांना इतर दोन सल्लागारांपेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत. तसेच त्यांनी याकामी निम्नतम रु.८७,३०,०००/- मात्र इतक्या फीचा देकार वरील प्रस्तावाव्दारे सादर केला आहे.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.१८/०२/२०१४ रोजीचे सभेपुढे विषय सादर करण्यात आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र.३२ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"दिनांक ०१ ऑक्टोबर २०१७ पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष सुरु होणार असल्याने शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरिता कृती आराखडा तयार करणेकामी सल्लागार संस्था नेमणेसाठी प्रस्तावातील गुणांकाप्रमाणे* Tata Consulting Engineers Limited, Noida *यांचे नेमणूकीबाबत ते करणार असलेल्या कामाचे सादरीकरण समितीसमोर सादर करण्यात यावे. सदरहू सादरीकरण पाहून अंतिम निर्णय घेतला जाईल असे ठरले".*

त्यानुसार मा.त्रिसदस्य समितीचे दि.१२/०३/२०१५ रोजीचे सभेत Tata Consulting Engineers Limited, Noida यांचे (1) Shri B.M. Date, Deputy General Manager, Architecture (2) Shri P.K. Arunkumar, Sector Head– Urban Development & Planning (3) Shri Vishal Pawar, Senior Manager- Enviroment हे प्रतिनिधी हजर होते, त्यांनी सभेसमोर खालील मुद्यांबाबत सादरीकरण केले.

- About TCE
- Terms of Reference & Scope of work
- Project Milestones & Project Back graound
- Approch and Methodology
- Experience in similar projects.

यावेळी TCE कपंनीचे उपस्थित सदस्यांनी TCE कंपनी ही ISO 9001:2008 प्रमाणीत कंपनी असून १९६२ सालापासून या क्षेत्रात कार्यरत आहे. भारतातील मुंबई, बेंगलोर, दिल्ली, पुणे चेन्नई, मजशेदपूर व कोलकत्ता या सात शहरांमधे त्यांचे कार्यालये असून त्यांमधून आता पर्यंत ७४०० प्रकल्प पूर्ण केलेले आहेत. यात प्रामुख्याने Water & Urban development ports & Transportation व Building & Architecture या कामांचा समावेश आहे.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षा निमित्त शिर्डी व लगतचे परिसराचा विकास करणेसाठी खालील मुख्य बाबी विचारात घ्याव्या लागतील असे त्यांनी नमूद केले.

1. Development & widening of roads in and around Shirdi
2. Development of Parking lots
3. Development of public Toilets
4. Additional water supply & sewerage scheme.
5. Solid waste management
6. Additional sewage disposal scheme
7. Extension of electricity supply & distribution system
8. Systemization of public transport facilities
9. Development of parks of garkens
10. Deveopment of accommodation facilities
11. Planning of health related services & facilities
12. Preliminary frame work for disaster & mitigation

उपरोक्त कामे करणेसाठी खालील दोन टप्प्यात कार्यवाही करणेत येईल.

Stage - I - Time line - 12 weeks from issue of LOA

a. Coceptual master plan
b. Preliminary layouts & Schematic drawings of individual infra structure components
c. Concept note
d. Project proposal
a. Stage -II - Time line - 08 weeks after approval of stage – I
e. Deaft detailed project Report
f. Final detailed project Repot

TCE यांचे प्रतिनिधींनी सदर प्रकल्पातील त्यांच्या Planning Aproach व Methodology आजचे सभेसमोर विस्तृत स्वरुपात सादर केली. तसेच त्यांनी यापूर्वी केलेल्या प्रकल्पांबाबत उपस्थितांना माहिती दिली.

मा. त्रिसदस्य समितीचे दि.१२/०३/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झाला.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, Tata consulting Engineers यांना नाशिक येथे आयोजीत कुंभमेळा–२०१५ येथील भक्तांसाठी उपलब्ध केलेल्या सोयीसुविधांचा अभ्यास करुन त्या धर्तीवर शताब्दी महोत्सवाकरीता प्रस्ताव तयार करणेस सूचना करणेत आली."*

यामुळे सल्लागार Tata Consulting Engineers Limited, Noida यांच्या नेमणूकीबाबत स्पष्ट निर्णय होणेसाठी व त्याकरीता मा.उच्च न्यायालयात सिव्हील अर्ज दाखल करणेस मान्यता मिळणेसाठी इकडील विभागामार्फत दि.०९/०६/२०१५ रोजी टिपणी सादर करणेत आली होती. त्यात खालीलप्रमाणे नमुद करणेत आले होते.

"वरील निर्णयामध्ये श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षाकरीता शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी सल्लागार संस्था Tata Consulting Engineers Limited, Noida यांची नेमणुक करणेस मान्यतेबाबतचा स्पष्ट उल्लेख नाही. वर नमुद सल्लागार संस्थेमार्फत शताब्दी महोत्सवाकरीता प्रस्ताव तयार करुन घेणेपुर्वी त्यांना नेमणूक पत्र देणेसाठी तसा स्पष्ट निर्णय होणे आवश्यक आहे. तसेच सदरहु खर्च हा मोठया स्वरूपाचा असलयाने त्यासाठी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

Tata Consulting Engineers Limited, Noida यांनी दि.०५/०६/२०१५ रोजीचे ई-मेल व्दारे श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षाकरीता शिर्डी व लगतच्या परिसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेसाठी सल्लागार म्हणुन नेमणुकीबाबत त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची वैधता दि.२२/०३/२०१५ पर्यंत होती. सदर प्रस्तावाची वैधता त्यांनी दि.२१/०६/२०१५ पर्यंत वाढवीली आहे. शताब्दी वर्ष ०१ ऑक्टोबर २०१७ रोजी सुरु होणार असल्याने DPR बनविणेसाठी तातडीने सुरवात करणे गरजेचे आहे. त्यासाठी वरील कामाचा कार्यादेश वेळेत झाल्यास सदर काम लवकरात लवकर हाती घेणेत येईल असे कळविले आहे."

इकडील विभागाचे उपरोक्त दि.०९/०६/२०१५ रोजीच्या टिपणीवर तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी "C.A. दाखल करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. दरम्यान सादरीकरणासाठी संबंधीतांशी बोलुन वेळ निश्चित करावी" असा आदेश दिला. त्यानुसार विधी विभागामार्फत ॲड गोंदकर यांचेकडून सिव्हील अर्ज तयार करणेची कार्यवाही सुरु केली होती. त्यांनीही सल्लागार यांच्या नेमणूकीबाबत स्पष्ट निर्णय होणे आवश्यक असल्याचे कळविले.

तरी Tata Consulting Engineers Limited, Noida यांची विषयांकीत कामासाठी वरीलप्रमाणे रु.८७,३०,०००/- मात्र इतक्या फीवर नेमणूक करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सल्लागार Arham Constrotech Pvt. Ltd., Nashik Road यांचा अभिप्राय व निम्नतम दर याचा विचार करता, श्री साईबाबा महासमाधी शताब्दी निमित्त शिर्डी व लगतच्या परीसराचे विकासाकरीता कृती आराखडा तयार करणेकामी Tata Consulting Engineers Limited, Noida यांची सल्लागार म्हणून रु.८७,३०,०००/- मात्र फीवर नेमणूक करणेत यावी. तसेच याबाबत मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थान वकिलामार्फत तात्काळ सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.३८** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१५ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या कमल २१ मधील पोट - कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय –**

दि.२३/०७/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र.२०४ (१९) संमत करणेत आलेला आहे.

*"श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव सन २०१५ निमित्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, ई– निविदांची मागणी करणे व याकामी येणा-या एकूण अंदाजे रु.६,०९,३८६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या समितीची शिफारस मान्य करण्यात आली."*

**प्रस्तावनाः-** सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक जा.नं.एसएसएस/वशी-५/२१०९/२०१५ दि.०२/०९/२०१५ अन्वये श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव बुधवार दि.२१ ऑक्टोबर २०१५ ते शुक्रवार दि.२४ ऑक्टोबर २०१५ अखेर ०४ दिवस साजरा होणार असलेबाबत कळविणेत आले होते. संस्थानचे सन २०१५ चे दैनंदिनीमध्ये श्री पुण्यतिथी उत्सव दि.२१/१०/२०१५ ते दि.२४/१०/२०१५ असा चार दिवस असल्याचे नमूद आहे. त्यानुसार इकडील दि.१५/०९/२०१५ रोजीचे टिपणीद्वारे चार दिवसांचे उत्सव कालावधीसाठी सुधारीत वेळापत्रकानुसार निविदा सूचना संस्थानचे संकेत स्थळावर व निविदा प्रपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आल्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या ०३ ई– निविदांमधील टेक्नीकल बीड दि.०३/१०/२०१५ रोजी प्रशासकीय अधिकारी (बांधकाम विभाग) यांचे समक्ष उघडणेत आले.

वरीलप्रमाणे उघडण्यात आलेल्या ई– निविदांचे टेक्नीकल बीडमधील ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| तपशिल | ठेकेदार नांव | | |
|---|---|---|---|
| | साईकृपा टेंन्ट हाऊस, बेलापूर ता. श्रीरामपूर | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर |
| को-या निविदेची किंमत व बयाना रक्कमेचा डी.डी. | SBH – Dt.19/09/2015 D.D. No.502000 Rs.500/- SBH – Dt.19/09/2015 D.D. No.501937 Rs.6000/- | SBH-Dt.21/09/2015 D.D.No.503128 Rs.500/- SBH-Dt.21/09/2015 D.D.No.503127 Rs.6000/- | SBI –Dt.29/09/2015 D.D.No.666731 Rs.500/- SBI –Dt.29/09/2015 D.D.No.666730 Rs.6000/- |
| पॅन कार्डची छायांकीत प्रत | जोडली आहे. | जोडली आहे. | जोडली आहे. |
| सर्व्हीस टॅक्स रजिस्ट्रेशन | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. |
| रु.१००/- मात्रचे मुद्रांकावर हमीपत्र. | जोडले आहे. | जोडले आहे. | जोडले आहे. |
| मंडप उभारणीच्या उलब्ध साहित्याचा तपशिल | जोडला आहे. | जोडला आहे. | जोडला आहे. |
| ४ लक्ष किमतीचे एक काम पूर्ण केल्याचे संबंधीत संस्थेचे प्रमाणपत्र. | जोडलेले नाही. | जोडलेले नाही. | जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, पुणे यांचेकडे रु.४,६७,६१९/- मात्र इतक्या रकमेचे मंडप, स्टेज, इतर व्यवस्थेबाबतचे कामाचे दि.२७/०१/२०१४ चे प्रमाणपत्र सादर केले आहे. |
| **शेरा** | सदर ठेकेदार यांनी रु.४ लक्ष किमतीचे एक काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही, त्यामुळे तांत्रिकदृष्टया ते अपात्र ठरतात. तथापी त्यांनी यापुर्वी संस्थानकरीता सन २०१५ मधिल उन्हाळी मंडपाचे रु.८,६०,७४६/- इतक्या रकमेचे काम पूर्ण केलेले आहे. | सदर ठेकेदार यांनी रु.४ लक्ष किमतीचे एक काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही, त्यामुळे तांत्रिकदृष्टया ते अपात्र ठरतात. तथापी त्यांनी यापुर्वी संस्थानकरीता सन २०१४ मधिल पुण्यतिथी उत्सव कालावधीतील मंडपाचे रु.४,६६,३९६/- इतक्या रकमेचे काम पूर्ण केलेले आहे. | पात्र |

वरीलपैकी ठेकेदार कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर हे पात्र असून, ठेकेदार न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर, ता. राहुरी व साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर ता. श्रीरामपूर यांनी किमान पात्रता निकषामधील रु.४ लक्ष किमतीचे एक काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नसल्याने ते तांत्रिकदृष्टया अपात्र ठरत आहेत.

तथापी वरीलपैकी ठेकेदार न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर, ता. राहुरी व साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर ता. श्रीरामपूर यांनी वरील तक्यात नमूद केलेनुसार यापुर्वी सन २०१४व२०१५ मध्ये संस्थानचे रु.४ लक्ष पेक्षा जास्त रकमेचे मंडप, स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था पूरविणेचे काम पूर्ण केलेले आहे. त्यामुळे त्यांना पात्र ठरविणेबाबत विचार होणेस हरकत नाही.

श्री पुण्यतिथी उत्सव जवळ आलेला असल्याने सदर मंडप व अनुषंगिक कामे उभारणीचे काम तातडीने सुरु करणे आवश्यक आहे. त्यासाठी वरील तिनही ठेकेदारांच्या ई– निविदांमधील कमर्शिअल बीड दि.१०/१०/२०१५ रोजीचे मा. उपसमितीचे सभेत उघणेत आले आहे. त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Bidder Name | Amount | Bid Rank |
|---|---|---|---|
| 1 | New RoshaniMandap& Light Decorators, Sankrapur, Tal. Rahuri | 5,80,424.00 | L - 1 |
| 2 | SaiKrupa Tent House, Belapur Tal. Shrirampur | 6,00,631.40 | L - 2 |
| 3 | KailashMandap& Light Decorators, Ahmednagar | 10,03,198.00 | L - 3 |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटरर्स, संक्रापूर, ता. राहुरी यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत. सदरहू दर हे चार दिवसांचे कालावधीसाठी आहेत. तथापी संस्थानमार्फत श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव तीन दिवस साजरा करणेत येणार असल्याने, त्यानुसार तीन दिवसाचे कालावधीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी रु.४,३५,३१८/- मात्र इतका खर्च येईल.

तरी श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१५ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वरीलप्रमाणे न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटरर्स, संक्रापूर, ता. राहुरी यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१५ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेची नोंद घेण्यात येऊन याकामी प्रत्यक्षात आलेल्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३९** **दिपावली सुट्टीचे कालावधीत तसेच डिसेंबर-२०१५ मधील नाताळ सुट्टी व नववर्षानिमीत्ताने होणारे गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये " रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे'' या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

तसेच सदर कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे'' या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** दिनांक ११ नोव्हेंबर, २०१५ ते दि.२५ नोव्हेंबर, २०१५ अखेर १५ दिवस दिपावली सणानिमित्त तसेच दि.२५ डिसेंबर, २०१५ ते दि.०२ जानेवारी, २०१६ अखेर ०९ दिवस शैक्षणिक व इतर कार्यालयांना सुट्टया आहेत. या कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने, साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरते व्यवस्थेकरीता खालील ठिकाणी एम.एस. पाईपचे स्ट्रक्चर असलेले ताडपत्रीचे छतासह कापडी मंडप टाकणे आवश्यक आहे.

**अ) दिपावली मंडप (कालावधी दि.११/११/२०१५ ते दि.२५/११/२०१५ अखेर १५ दिवस):-**

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | साईज | परिमाण (चौ. फुट) |
|---|---|---|---|
| ०१ | लाडू विक्री काऊंटर समोर | ३०x ६० | १८००.०० |
| ०२ | समाधी मंदिरासमोर सभाकुंड येथे | ६१x ६१ | ३७२१.०० |
| ०३ | उदी काऊंटर | ४५ x २०<br>२०x १५ | ९००.००<br>३००.०० |
| ०४ | गुरुस्थान मंदिरासमोर एम.एस. पाईप फ्रेममध्ये ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप टाकणे. | ४५x ३० | १३५०.०० |
| ०५ | गेट नं.०३ चे बाहेरील बाजूस एम.एस. पाईप फ्रेममध्ये ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप टाकणे. | २०x ३० | ६००.०० |
| | एकूण चौ. फुट | | ८,६७१.०० |
| **दिपावली मंडपासाठी अंदाजे रु.१.२२ प्र. चौ. फुट प्र.दिवसाप्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च (अ)** | | | **१,५८,६७९/-** |

**नाताळ मंडप (कालावधी दि.२५/१२/२०१५ ते दि.०२/०१/२०१६ अखेर ०९ दिवस)-**

| अ.नं. | मंडपाचा तपशिल | साईज | परिमाण (चौ. फुट) |
|---|---|---|---|
| **अ** | **मंडप व्यवस्था** | | |
| ०१ | गुरुस्थान समोर पश्चिम बाजूस दक्षिण – उत्तर असा | ४५x ३० | १३५०.०० |
| ०२ | उदी काऊंटर समोरील रेलींगवर | ४५x २०<br>२०x १५ | ९००.००<br>३००.०० |
| ०३ | नगर – मनमाड रोड पश्चिम बाजू फुटपाथ | ४३१x ८-३ | ३५५५.७५ |
| ०४ | पिंपळवाडी रोड उत्तर बाजू फुटपाथ | १५४x६-८ | १०२७.१८ |
| ०५ | लाडू विक्री काऊंटर समोर | ६०x ३० | १८००.०० |
| ०६ | पिंपळवाडी रोड गेट नं.२ ते महालक्ष्मी मंदिरापर्यंत दर्शन रांगेसाठी | ३२०x १८-६ | ५९२०.०० |
| | एकूण चौ. फुट | | १४८५३.०० |
| | **अंदाजे रु.१.२९ प्रती चौ.फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च-** | | **१,७२,४४३.००** |
| **ब** | श्री साईप्रसादालयातील भोजन प्रतिक्षालय रेलींगला संरक्षक कठडे बांधणेकामी बांबुची ४ फुटी उंचीची बॅरेकेडींग करणे | ६५१ र. फुट | ६५१.०० |
| | एकूण र. फुट | | ६५१.०० |
| | **अंदाजे रु.९.९ प्रती र. फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च-** | | **५८,००४.००** |
| **क** | साईनगर मैदानाकडे जाणारा रस्त्यावर स्वागत कमान उभारणे (१ दिवस) | २०x १५ फुट | ०१ नग |
| | **अंदाजे प्रती नग प्रती दिवस याप्रमाणे** | | **४,४००/-** |
| **ड** | साईनगर मैदान येथे शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी ग्रीनरुमसह स्टेजची उभारणी करणे. ( १ दिवस ) | ३०x २०फुट | ६०० चौ. फुट |
| | **अंदाजे रु.३८.५० प्रती चौ. फुट प्रती दिवस प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च -** | | **२३,१००/-** |
| | **नाताळ मंडपासाठी अपेक्षित एकूण अंदाजे खर्च– (ब)** | | **रु.२,५७,९४७/-** |
| **दिपावली व नाताळ कालावधीतील मंडपासाठी अपेक्षित एकूण अंदाजे खर्च (अ+ब)** | | | **रु.४,१६,६२६/-** |

| | |
|---|---|
| | **प्रस्ताव**:- तरी वरील प्रमाणे दिपावली व नाताळ सुट्टीचे कालावधीत होणारे गर्दीचे निमित्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक सुविधा उभारणे ही नित्याची व अत्यावश्यक बाब असल्याने याकामी वरीलप्रमाणे येणारे अंदाजे रक्कम रु.४,१६,६२६/- मात्रचे अपेक्षित खर्चास तसेच याकामी विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती. |
| **निर्णय क्र.४१०** | **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिपावली व नाताळ सुट्टीचे कालावधीत होणा-या गर्दीचे निमित्ताने साईभक्तांच्या सोयीसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक सुविधा उभारणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४,१६,६२६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख) |

---

| | |
|---|---|
| **विषय नं.४०** | **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत मंदिर परिसर, साईप्रसादालय तसेच वाहनतळ व्यवस्थेचे ठिकाणी पत्राशेड मंडप, लॉकर्स व बॅरेकेडींग आदी अतिरिक्त व्यवस्थेबाबत.** |
| **प्रस्ताव-** | **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** |

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :-**

**१)** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*“.. .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी. तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले.”*

*२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०७/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.२०८ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.*

*“.. .. सिंहस्थ कुंभमेळा कालावधीचा विचार करता, तातडीची आवश्यकता म्हणून सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीत संस्थान परिसर, अतिरिक्त दर्शनरांग व नियोजित वाहनतळांचे ठिकाणी साईभक्तांचे सोईसाठी पत्राशेड मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामीच्या उपरोक्त प्रस्तावास मा. अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे.” यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.*

मा. उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश :- Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011 वर मा.उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना:-** दि.२७ ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने या गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधांमध्ये साई भक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाचे निवारा शेडस्, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सावर्जनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, पाणीपुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इ. सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणेचे प्रस्तावित असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये इकडील विभागामार्फत संस्थान परिसर, अतिरिक्त दर्शनरांग व नियोजीत वाहनतळांचे ठिकाणी साईभक्तांचे सोयीसाठी पत्रा शेड मंडप, दर्शनरांगेकरीता शेड उभारणे, बॅरेकेडींग व्यवस्था, टॉयलेट करीता पत्रा पार्टीशन करणे व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी ठेकेदार लल्लूजी ॲण्ड सन्स, अहमदाबाद यांना इकडील जा. क्र. एसएसएसटी/ बांधकाम/ २३६९/ २०१५, दि.२८/०७/२०१५ अन्वये रक्कम रु. २,२६,२८,८००/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मा. विभागीय आयुक्त नाशिक, मा. जिल्हाधिकारी, अ.नगर , पोलीस अधिक्षक अहमदनगर , उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी तथा अध्यक्ष तालुकास्तरीय कुंभमेळा समिती शिर्डी व मा. कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी वेळोवेळी दिलेल्या सुंचनानुसार कुंभमेळा कालावधीत खालीलप्रमाणे वेगवेगळया ठिकाणी अतिरिक्त व्यवस्था केलेल्या आहेत.

अ) विभागीय आयुक्त नाशिक भाग नाशिक, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर, व पोलीस अधिक्षक अहमदनगर मा. कार्यकारी अधिकारी, मा. उपविभागीय अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांनी दि. ०१/०८/२०१५ रोजी सर्व वाहनतळे व पत्राशेड मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था कामाची पाहणी केली पाहणी दरम्यान मा. विभागीय आयुक्त नाशिक यांनी निमगाव –को-हाळे येथील गट नं. ८९,९०/२ (मिलीटरी गेस्ट हाऊसचे पश्चिमेस ) वाहनतळ क्र. ०४ हे ठिकाण शिर्डी शहरालगत असल्याने या ठिकाणी मोठया प्रमाणात भाविकांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने सदर ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी वाढीव निवारा शेड मंडप व चप्पल स्टॅण्ड व लॉकरसाठी १००x२० मापाचा मंडप टाकण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सदरचे काम उपरोक्त कामाचे ठेकेदार लल्लुजी ॲण्ड सन्स, अहमदाबाद यांचेकडून मंजूर दरात करुन घेण्यात आले आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च होणे अपेक्षित आहे.

| अ. नं. | कामाचा तपशिल | साईज | परिमाण | दर(एकूण ३० दिवसांकरीता) | एकक | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पत्र्याचे छत असलेले निवारा शेड उभारणे. | ६०'x ६०' | ३६०० चौ.फुट | ७२/- | चौ. फुट | २,५९,२००/- |
| ०२ | पत्र्याचे छत असलेले चप्पल स्टॅण्ड व लॉकर मंडप तयार करणे. | १००'x २०' | २००० चौ.फुट | ७२/- | चौ. फुट | १,४४,०००/- |
| | | | | | एकूण रक्कमः- | ४,०३,२००/- |

ब) श्री साईप्रसादालय विभागाने त्यांचेकडील दि. ३०/०६/२०१५ रोजीचे पत्रान्वये कुंभमेळा गर्दीच्या कालावधीत श्री साईप्रसादालयाचे प्रतिक्षालयातील रेलींगचे दोन्हीबाजूस बांबुचे संरक्षक कठडे तयार करणेबाबत कळविलेले आहे. तसेच दि.२२/०८/२०१५ रोजी कुंभमेळा कालावधीतील अतिरिक्त सोई-सुविधांची पाहणी करतेवेळी मा.श्री.एकनाथ डवले, विभागीय आयुक्त, तसेच दि. २७/०८/२०१५ रोजी उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांनी दिलेल्या सुचनांनुसार वाहनतळांचे ठिकाणी बचत गटांकडून अल्पोपहार स्टॉल लावणेची व्यवस्था करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च होणे अपेक्षित आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण | दर(एकूण ३० दिवसांकरीता) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | व्दारकामाईचे दर्शनासाठी रथपालखी रस्त्यावर बॅरेकेडींग करणे | १९० र. फुट | १००/- | १९,०००/- |
| ०२ | गेट नं. ४ ते गेट नं. ५ पर्यंत लेंडीबागेतून बॅरेकेडींग करणे | ११०० र. फुट | १००/- | १,१०,०००/- |
| ०३ | श्री साई प्रसादालयाचे प्रतिक्षातलयातील रेलिंगला बॅरेकेडींग बांधणे (दि.२८/०८/२०१५ ते २६/०९/२०१५ या ३० दिवसांकरीता) | ७०० र. फुट | १००/- | ७०,०००/- |
| ०४ | प्रसादालयाचे उत्तर गेट समोरील उदीप्रसाद वाटप काऊंटर येथे पत्रा शेड मंडप उभारणे. (दि.२८/०८/२०१५ ते २६/०९/२०१५ या ३० दिवसांकरीता) साईज- ७६ x ११ | २५८० चौ. फुट | ७२/- | १,८५,७६०/- |
| ०५ | प्रसादालयाचे पश्चिम बाजूस साईभक्तांना ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण म्हणून पत्राशेड मंडप उभारणे (दि.२८/०८/२०१५ ते २६/०९/२०१५ या ३० दिवसांकरीता) साईज- ६३ x २७ | १७०१ चौ. फुट | ७२/- | १,२२,४७२/- |
| ०६ | प्रसादालयाचे उत्तर गेट समोरील उदीप्रसाद वाटप काऊंटर समोर बॅरेकेंडीग बांधणे (दि.२८/०८/२०१५ ते २६/०९/२०१५ या ३० दिवसांकरीता) | १६५ र. फुट | १००/- | १६,५००/- |
| ०७ | प्रसादालयाचे प्रवेशव्दार ते बुकींग काऊंटर पर्यंत लाकडी बल्ली बॅरेकेंडीग बांधणे (दि.२८/०८/२०१५ ते दि २६/०९/२०१५ या ३० दिवसांकरीता) | ७३५ र. फुट | १००/- | ७३,५००/- |
| ०८ | प्रत्येक वाहनतळावर बचज गटासाठी स्टॉल तयार करणे. (दि. २८/०८/२०१५ ते २६/०९/२०१५ या ३० दिवसांकरीता) | ५५७० चौ. फुट | ७२/- | ४,०१,७६०/- |
| | | | एकूण रक्कम | ९,९८,९९२/- |

क) पोलीस निरिक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांनी जा. क्र.२५३५/२०१५, दि. ०९/०९/२०१५ रोजीचे संस्थानला दिलेल्या पत्रात पोलीस स्टेशन येथे राखीव पोलीस बंदोबस्त तसेच नेमण्यात येणारा बंदोबस्तकरीता मार्गदर्शन करणेसाठी १०० x १०० (फुट) असा वॉटर प्रुफ टेंन्ट तात्काळ तयार करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तथापी सदर ठिकाणी आवश्यकतेनुसार २७ X ६३ या आकाराचा मंडप टाकणेत आला आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च होणे अपेक्षित आहे.

| अ.न. | तपशिल | मंडप साईज | परिमाण/एकक | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | पत्र्याचे छत, आतील बाजूस सुशोभित कापड व तिनही बाजूने बंदीस्त असलेले निवारा शेड उभारणे . | २७X६३ | १७०१चौ. फुट | ७२/- | १,२२,४७२/- |

ड) मा. उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी तथा अध्यक्ष तालुका स्तरीय कुंभमेळा समिती व मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांनुसर शिर्डी नाला (हॉटेल स्वराजजवळ) येथे बस वेटींग शेड उभारणेत आले आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च होणे अपेक्षित आहे.

| अ.न. | तपशिल | मंडप साईज | परिमाण/एकक | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | पत्र्याचे छत, आतील बाजूस सुशोभित कापड व तिनही बाजूने बंदीस्त असलेले निवारा शेड उभारणे . | १०X६० | ६००चौ. फुट | ७२/- | ४३,२००/- |

**उपरोक्त अ+ब+क+ड मध्ये नमूद केलेनुसार एकुण खर्चाची रक्कम रु. १५,६७,८६४/- मात्र इतकी होते.**

कुंभमेळा कालावधीत होणा-या गर्दीच्या अनुषंगाने उपलब्ध करावयाच्या सोयी-सुविधांकरीता मा.उच्च न्यायालयाने रु.५७.५४ कोटी मात्र खर्चाचे प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्यापैकी रु. ३,५२,१३,७५०/- मात्र इतकी रक्कम मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करण्याचे कामासाठी मंजूर आहे. वर नमूद केलयाप्रमाणे मंडप व इतर व्यवस्थेकामी मे. लल्लूजी ॲण्ड सन्स, अहमदाबाद यांना रु. २,२६,२८,८००/- मात्र इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदरचा खर्च वर नमूद मंजूर रकमेपेक्षा कमी आहे. याप्रमाणे बचत होणा-या रकमेतून वरीलप्रमाणे वाढीव बॅरेकेडींग व पत्रा शेड मंडपाचा खर्च करता येईल.

तरी वर नमूद कामे ही साईभक्तांची सोयी, सुविधा व सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असल्याने ती तातडीने पूर्ण करुन घेणेत आली आहेत. तरी मंडप ठेकेदार मे. लल्लुजी ॲण्ड सन्स, अहमदाबाद यांचेकडून वरीलप्रमाणे पत्राशेड मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था उभारणीसाठी केलेल्या कार्यवाहीस व सदर कामाचे त्यांचे मंजूर निविदा दरानुसार येणारे रु.१५,६७,८६४/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत साईभक्तांच्या सोयी, सुविधा व सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेली मंदिर परिसर, साईप्रसादालय तसेच वाहनतळ या ठिकाणी पत्राशेड मंडप, लॉकर्स व बॅरेकेडींग आदी तातडीने केलेल्या अतिरिक्त व्यवस्थेस व सदर कामाचे मंजूर निविदा दरानुसार होणा-या रु.१५,६७,८६४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१** **श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटनेच्या वतीने दिनांक ०१.०९.२०१५ रोजीचे उपोषणाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानला ठेकेदार मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स इंडिया प्रा.लि.पुणे व मे जय भवानी एन्टरप्राईजेस, पुणे यांचेमार्फत प्रतिदिनी अकुशल-१६८८ व कुशल-५८७ असे एकुण-२२७५ कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेत येत आहेत. सदरचे अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२८ सप्टेंबर-२०१० रोजीचे मुळ किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस अनुसरून किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ या अधिसुचनेस उदयोगातील किमान वेतन दरास अनुसरून मुळवेतन व मा.कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडील दि.०६-०८-२०१५ रोजीचे नोटीफिकेशन नुसार स्पेशल अलौन्सप्रमाणे सध्या किमान वेतनदरानुसार अकुशल कंत्राटी कामगार रूपये २७०.७९ प्रतिदिनी व कुशल कंत्राटी कामगार रूपये ३०१.५६ प्रतिदिनी वेतन देण्यात येत आहे. व वेळोवेळी स्पेशल अलौन्स दरामध्ये होणारी वाढ देणेत येवून कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले सर्व कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना नियमानुसार सुधारीत किमान वेतनदराप्रमाणे वेतन देणेत येते.

सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचे पत्र जा.क्र.सकाआ/नगर/किवेब/२३०३ दि.०६-०४-२०१५ यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कंत्राटी कामगारांना कंत्राटी कामगार अधिनियम ,१९७० अन्वये वेतन व महागाई भत्ता मिळणेबाबत यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथील कंत्राटी कामगार संघटनेच्या प्रितिनिधीत्व करणा-या कामगार संघटनेने कंत्राटी कामगार व नियमित कामगार हे समान स्वरूपाचे काम करीत असल्याने त्यांचे पगारामध्ये खुपच तफावत असल्याने कंत्राटी कामगार अधिनियमाच्या तरतुदीनुसार समान कामासाठी समान वेतन याचा अवलंब करण्यात येऊन त्यांना नियमित कामगाराप्रमाणे वेतन मिळवुन दयावे अशी मागणी सदर निवेदनामध्ये करणेत आलेली आहे.

सदर प्रकरणी चर्चा करून, मार्ग काढण्यासाठी दि.१०-०४-२०१५ रोजी सकाळी ११.३० वा.माझेसमोर बैठक आयोजित करणेत आलेली आहे. सदर बैठकीस निर्णय घेण्यास सक्षम असणा-या प्रतिनिधीस योग्य त्या कागदपत्रासह उपस्थिती राहणेबाबत सुचीत करणेत यावे असे कळविलेले होते. त्यावर मा.का.अ.सो. यांनी प्रशासकीय अधिकारी (कामगार विभाग) व प्र.कामगार अधिकारी यांना आवश्यक माहितीसह उपस्थित राहणेबाबत सचना करणेत आल्या. दि.१०-०४-२०१५ रोजी प्रशासकीय अधिकारी व प्र.कामगार अधिकारी हे सदर बैठकीस उपस्थित होते. बैठकीदरम्यान सदर संघटनेचे दि.२३-०२-२०१५ रोजीचे पत्र संस्थानला प्राप्त झाले नसलेबाबत सांगितले. मा.सहाय्यक कामगार आयुक्त यांनी सदर पत्राची प्रत संस्थानला देणेबाबत संघटनेचे प्रतिनिधींना सांगितले. त्यांनतर सहाय्यक कामगार आयुक्त यांनी तुम्ही तुमचे लेखी म्हणने दि.२४-०४-२०१५ रोजी सादर करावे, असे निर्देश दिले होते. याकामी संस्थानमार्फत ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचे सल्ल्याप्रमाणे दि.२४-०४-२०१५ रोजी लेखी म्हणने समक्ष खालीलप्रमाणे सादर करण्यात आले आहे.

मे.जय भवानी एन्टरप्राईजेस, पुणे व मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स इंडिया प्रा.लि.पुणे यांचेमार्फत श्री साईबाबा संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहेत.

उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२८ सप्टेंबर-२०१० रोजीचे मुळ किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस अनुसरून किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ या अनुसुचित उदयोगातील किमान वेतन दरास अनुसरून मुळवेतन व मा.कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडील दि.०५-०२-२०१५ रोजीचे नोटीफिकेशन नुसार स्पेशल अलौन्सप्रमाणे सध्या किमान वेतनदर कंत्राटी कामगारांना देण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र शासन यांचेकडुन किमान वेतन अधिनियम नुसार मुळ किमान वेतन दरात होणारी वाढ व कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडुन वेळोवेळी स्पेशल अलौन्स दरामध्ये होणारी वाढ देणेत येवुन कंत्राटदारामार्फत् कामकरीत असलेले सर्व कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना नियमानुसार सुधारीत किमान वेतन दराप्रमाणे वेतन देणेत येते. त्यामुळे संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत काम करीत असलेल्या कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रमांक सीएलए-०३-२०१४ पत्र क्र.९५/कामगार-१०, मंत्रालय, शासन परिपत्रकानुसार वेतन देणेचा प्रश्नच निर्माण होत नाही.

तसेच आम्ही असे नमुद करू इच्छितो की, संस्थानच्या हजेरी पटावरील कायम कामगारांचे कामगाचे स्वरूप व कंत्राटी कामगारांचे कामाचे स्वरूप हे पुर्णतः भिन्न असुन, त्या कामाच्या स्वरूपात व पध्दतीत कुठेही समानता नाही. संस्थानने कंत्राटी कामगार कायदयाच्या तरतुदीचे पुर्णपणे पालन केलेले असुन कंत्राटी पध्दतीने केलेली सर्वच कामे हे नैमत्तीक व नियमित असतील असे नाही. ब-याच वेळा कंत्राटी कामगारांच्या संख्येत कामाच्या उपलब्धतेनुसार कमी जास्त बदल होतो.

मा.सर्वोच्च न्यायालयाने समान काम समान दाम या तत्वासाठी विविध नियम ठरवुन दिलेले आहे. त्यानुसार काम करण्यासाठी लागणारा अनुभव, शैक्षणिक पात्रता, कामाचे कौशल्य इत्यादी गोष्टी अतिशय महत्वाच्या ठरतात. कंत्राटी कामगार व नियमित कामगार वरील नियमामध्ये देखील कुठेही बसत नाही. त्यामुळे प्रस्तुत विवाद हा औद्योगिक विवाद होऊ शकणार नाही. सबब, श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना शिर्डी यांचे दि.२३-०२-२०१५ चे पत्रान्वये करण्यात आलेली मागणी अमान्य करण्यात येऊन् सदर प्रकरण निकाली काढणेत यावे ही विनंती.

त्यानंतर मा.कामगार आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांना असंघटीत कामगार संघटनेने दि.१४-०८-२०१५ रोजीचे पत्रान्वये सदरचे प्रकरणाबाबत तारखांची मागणी करूनही तारखा देण्यास व कार्यवाही पुढे चालु ठेवण्यास टाळाटाळ करत असल्याचे आमचे निदर्शनास येत आहे.तेव्हा आपणास विनंती की, येत्या १५-२० दिवसांचे आंत संदर्भीय नमुद प्रकरणात त्वरीत कार्यवाही सूरू न केल्यास संघटना दि.०१-०९-२०१५ पासुन आपले अहमदनगर येथील कार्यालयासमोर प्राणांतीक उपोषण सुरू करील यांची कृपया नोंद घ्यावी असे कळविल्याने, सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांनी पत्र क्र.सकाआ/अ.नगर/पीएमएएस/२०१५ दि.२५-०८-२०१५ अन्वये श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटनेच्या वतीने दि.२३-०२-२०१५ मागणी संदर्भात उपोषणाची नोटीसीस अनुसरून या कार्यालयात खालील स्वाक्षरी करणा-याकडे समोर दि.२६-०८-२०१५ रोजी दुपारी ठिक २.३० वा.चर्चा आयोजीत करणेत आलेली आहे. करीता आपण स्वतः अगर आपले सक्षम प्रतिनिधी, जे की प्रकरणात उचीत निर्णय घेऊ शकतील यांनी चर्चेसाठी सर्व संबंधीत कागदपत्रासह कृपया न चुकता, हजर राहावे ही विनंती असे कळविले होते. मा.कार्यकारी अधिकारी सा ो. यांनी प्रशासकीय अधिकारी यांनी दि.२६-०८-२०१५ रोजी अहमदनगर येथे उपस्थित राहणेबाबत सुचना केली होती. दि.२६-०८-२०१५ रोजी प्रशासकीय अधिकारी (कामगार विभाग) हे सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचे कार्यालयात समक्ष हजर होते. संस्थानने यापूर्वी दि.२४-०४-२०१५ रोजी आपले म्हणणे दिलेले आहे. या व्यतिरिक्त वेगळे म्हणने संस्थानमार्फत दयावयाचे नाही असे सहाय्यक कामगार आयुक्त यांना दि.२६-०८-२०१५ रोजी सांगितले आहे.

त्यानंतर दि.१४-०८-२०१५ रोजी श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना यांचे मा.कामगार उपायुक्तसाहेब, नाशिक विभाग, नाशिक अहमदनगर जिल्हयाकरीता चे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले आहेत. त्यात श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटनेच्या वतीने दि.२३-०२-२०१५ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडील कंत्राटी कामगारांना कंत्राटी (नियमन व निर्मुलन) अधिनियम, १९७० अन्वये समान काम समान वेतन व महागाई भत्ता मिळणेबाबत व शासन परिपत्रक क्र.सीएलए/०३/२०१४ प्र.क्र.९५ कामगार-१० दि.१०-०६-२०१४ या परिपत्रकाची अंमलबजावणी करणेबाबत मा.सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडे लेखी तक्रार केली असता, या तक्रारी संदर्भात संघटना व व्यवस्थापन या दोन्ही पक्षाचे लेखी म्हणने आल्यानंतर मा.सहाय्यक कामगार आयुक्त यांनी त्यांचेकडील जा.क्र.सकाआ/अ.नगर/आस्था/३०२७/२०१५ दि.२२-०५-२०१५ रोजीचे पत्रान्वये कामगार अधिकारी याना संस्थानकडील कायम कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी यांच्या कामाच्या संदर्भात प्रत्यक्ष पाहणी करून त्याप्रमाणे अहवाल देण्याचे पत्र दिले होते. तथापि, मा.सहाय्यक कामगार आयुकत श्री.वाघ साहेब व कामगार अधिकारी श्री.शिंदे साहेब यांची एकाच वेळी बदली झाल्याने सदरचे काम अपूर्ण अवस्थेत आहे. या संदर्भात आपण मा.सहाय्यक कामगार आयुक्त यांचा चार्ज घेतल्यानंतर आपल्यासोबत वेळोवेळी चर्चा करूनही व पुढील तारखांची मागणी करूनही आपण सदर तारखा देण्यास व कार्यवाही पुढे चालु ठेवण्यास टाळाटाळ करत असल्याचे आमचे निदर्शनास येत आहे. तेव्हा आपणास विनंती की, येत्या १५-२० दिवसांचे आंत संदर्भीय नमुद प्रकरणात त्वरीत कार्यवाही सुरू न केल्यास संघटना दि.०१-०९-२०१५ पासून आपले अहमदनगर येथील कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषण सुरू करेल, याची कृपया नोंद घ्यावी असे नमुद केलेले असुन, पत्राच्या प्रती मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.कामगार मंत्री, मा.जेष्ठ समाजसेवक श्री.आण्णा हजारे, मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, मा.जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर, मा.पोलीस आयुक्त व एक प्रत मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे माहितीसाठी पाठविलेली आहे.

मा.सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडील क्र.सकाआ/अ.नगर/३४३२/२०१५ दि.२६-०८-२०१५ रोजीचे पत्र दिलेले असुन त्यात त्यांनी, "श्री साईबाबा संस्थान असंघटीत कामगार संघटनेने शिर्डी देवस्थानातील कंत्राटी पध्दतीने काम करणा-या कामगारांना समान कामासाठी,समान वेतन व शासनाने जाहिर केलेला महागाई भत्ता मिळत नसल्याबाबत या कार्यालयात उपोषणाची नोटीस देवुन दि.०१-०९-२०१५ पासुन प्राणांतिक उपोषण सुरू करत असल्याचे कळविले आहे. सदरची बाब ही सध्या मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आपण कार्यरत असलेल्या त्रिसदस्यीय समितीची असुन याबाबत शिर्डी देवस्थान प्रशासनास तातडीने कार्यवाही करण्याची सुचना करणे क्रमप्राप्त आहे. (शिर्घ संदर्भासाठी सदर उपोषणाच्या नोटीशीची प्रत माहितीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.) तरी आपणास विनंती आहे की, ही बाबत अतिसंवेदनशील असुन त्यामध्ये तातडीने तोडगा काढुन अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी याबाबत तातडीने सर्व संबंधीतांना योग्य ते आदेश व्हावेत व या कार्यालयास याबाबत तसे अवगत करण्यात यावे. याबाबतीत आपल्या माहितीसाठी व अंमलबजावणीसाठी उदयोग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयाची प्रत सविनय सादर करीत आहे." असे म्हटलेले आहे.

ठेकेदारामार्फत पुरविणेत येणा-या कंत्राटी अकुशल, कुशल कर्मचा-यांना उदयोग, उर्जा, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२८ सप्टेंबर-२०१० रोजीचे मुळ किमान वेतन दराबाबत अधिसुचनेस अनुसरून किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंन्ट झोन नं.०३ या अनुसुचीत उदयोगातील किमान वेतन दरास अनुसरून मुळवेतन व मा.कामगार आयुक्त, मुंबई यांचेकडील दि.०६-०८-२०१५ रोजीचे नोटीफिकेशन नुसार स्पेशल अलौन्सप्रमाणे सध्या किमान वेतनदरानुसार अकुशल कंत्राटी कामगार रूपये २७०.७९/- प्रतिदिनी व कुशल कंत्राटी कामगार ३०१.५६/- प्रतिदिनी वेतन देण्यात येत आहे व वेळोवेळी स्पेशल अलौन्स दरामध्ये होणारी वाढ देणेत येऊन् कंत्राटदारामार्फत काम करीत असलेले सर्व कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचा-यांना नियमानुसार सुधारीत किमान वेतन दराप्रमाणे वेतन देणेत येत आहे.

तरी दि.२६-०८-२०१५ रोजीचे पत्रान्वये मा.सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांनी दिलेल्या पत्रास अनुसरून समान काम समान वेतन दयावे किंवा कसे? याबाबत मुख्य सचिव, विधी व न्याय, मंत्रालय, मुंबई यांचा अभिप्राय घेता येईल असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.४१२ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन परिपत्रक क्रमांक सीएलए/०३/२०१४ पत्र क्र.९५/ कामगार-१०, दि.१०.०६.२०१४ या शासन परिपत्रकानुसार संस्थानमध्ये कार्यरत असणा-या कंत्राटी कामगारांना समान काम समान वेतन देणेबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचा अभिप्राय घेण्यात यावा व शासनाचा अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात संस्थान वकिलामार्फत अर्ज दाखल करण्यात यावा व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करणेत यावी.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी/ विधी अधिकारी)

---

विषय नं.४२ **साईभजन गायनासाठी परदेशी दौरा जाणेकामी परवानगी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री.किशोर काशिनाथ गागरे, लिपीक टंकलेखक कायम कर्मचारी प्रसादालय विभाग यांनी दि.१५-०९-२०१५ रोजीचे विनंती अर्जान्वये कळविले आहे की, मी किशोर कशिनाथ गागरे सन-२००६ पासून संस्थान सेवेत कायम कर्मचारी असुन, संध्या प्रसादालय विभागात लिपीक टंकलेखक या पदावर काम करीतआहे.मला साई बाबांचे हिंदी व मराठी भजने गाण्याची व लिहीण्याची आवड असुन, श्री साईबाबांच्या लिला व प्रसार करण्याचे काम मी गायनाच्या माध्यमातुन करीत आहे. श्री साईबाबाच्या कृपाशिर्वादाने माझे मित्र साईभजन सम्राट श्री.पारस जैन, शिरडी हे सौदी अरब दुबई येथे साई भजन संध्या कार्यक्रमाठी जात असुन, त्यांचे साथीला सहकलाकार म्हणुन मला श्री.पारस जैन हे दुबई येथे सोबत घेऊन जात आहे. आम्ही शिर्डीहुन एकुण ०३ कलाकार श्री साईभजनासाठी दुबई येथे जात असुन, याकामी येणारा खर्च श्री पारस जैन व आम्ही वैयक्तीत करीत आहोत. परदेशात जाण्याकामी आवश्यक कागदपत्राची पुर्तता केली आहे.

तरी मला दि.०५-१०-२०१५ ते दि.१३-१०-२०१५ अशी एकुण ०९ दिवसांची अर्जित रजा मंजूर करावी ही विनंती तसेच मला परदेशी दौरा जाणेकामी परवानगी मिळावी अशी विनंती त्यांनी केली आहे. सदरचा विनंती अर्ज विभाग प्रमुख यांचेमार्फत सादर केला असुन, त्यावर कार्यवाहीसाठी सविनय सादर असा अभिप्राय दिलेला आहे.

खाजगी व्यापार किंवा नोकरी अंर्तगत- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी सेवा वर्तणूक विनियम-२०१३ मधील कलम ११ अन्वये समितीच्या पूर्व परवानगीचा अपवाद वगळता संस्थानचा कोणताही कर्मचारी प्रत्यक्ष किंवा अप्रत्याक्षरित्या कोणही व्यापारात किंवा धद्यात गुंतता कामा नये किंवा त्याने दुसरी नोकरी स्वीकारता कामा नये.

मात्र संस्थानचा कर्मचारी अशा प्रकारच्या मुजूरी शिवाय बिनपगारी/विनामोबदला सामाजिक किंवा धर्मादाय काम किंवा वाडमयीन, कलात्मक किंवा शास्त्रीय स्वरुपाचे काम, त्याच्या अधिकृत कर्तव्यावर किंवा त्यावर विपरीत परिणाम होणार नाही.या अटीच्या अधिन राहून करु शकतो.तथापि कार्यकारी अधिकारी-यांनी निर्देश दिल्यास तो अशा प्रकारचे काम सुरु करणार नाही किंवा अशा प्रकारचेकाम थांबवेल. असे नमुद केले आहे. तसेच परदेशी दौरा जाणेसाठी परवानगी द्यावी असे विननियम-२०१३ मध्ये नमुद केलेले नाही.

श्री.किशोर काशिनाथ गागरे, लिपीक टंकलेखक कायम कर्माचारी प्रसादालय विभाग यांचे दि.१५-०९-२०१५ रोजीचे विनंती अर्जास अनुसरुन परदेशी दौरा सदर कालावधीचा रितसर विहीत नमुन्यातील अर्जित रजा अर्ज विभाग प्रमुखांकडे मंजुरीसाठी सादर करावा तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा वर्तणूक विनियम-२०१३

मधील कलम ११ अन्वये, परदेशी दौरा जाणे साठी परवानगी द्यावी संबंधीत विनियम-२०१३ मध्ये नमुद केलेले नाही. श्री.गागरे यांना साईभजन गायनासाठी परदेशी जाणेकामी परवानगी मिळणे बाबतचे अर्जावर निर्णय होणेस विनंती आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.४१३ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, विनियम- २०१३ मध्ये विदेशात जाणेकामीच्या परवानगीबाबत कोणताही उल्लेख दिसून येत नाही. सबब श्री.किशोर काशिनाथ गागरे, लिपीक-टंकलेखक यांना परदेशी जाणेसाठी परवानगी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. करीता श्री.गागरे यांचा रजा अर्ज मंजूर करणेत येऊन, परदेश जाणेबाबतचा अर्ज दप्तरी दाखल करणेत यावा.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.४३ संस्थानचे सर्व विभागांचे कालबाहय व निकामी झालेले संगणके व संगणकीय (E-Scrap) साहित्य विक्री करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रास्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे विविध विभागांना संगणक प्रिंटर, युपीएस इत्यादी अनुषांगीक तांत्रिक साहित्य पुरविण्यात आलेले आहे. सदर संगणकीय साहित्यांपैकी काही तांत्रिकसाहित्य सहा ते दहा वर्ष वापरुन निकामी व कालबाहय झालेले असल्यामुळे ते दुरुस्त होऊ शकत नाही. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार हे सर्व साहित्य (ई-कचरा) प्रदुषण नियंत्रण मंडळांनी नियुक्त केलेल्या अधिकृत कंपन्यांकडुन निविदा मागवुन विक्री करावे लागणार असुन जेणेकरुन प्रदुषणविषयी प्रश्न उद्भवणार नाही.

आयटी विभागाप्रमाणेच संस्थानचे इतरही विभागाचे डेडस्टॉक यादी मधील नादुरुस्त व कालबाहय झालेले संगणक व तत्सम तांत्रिक साहित्यांची विक्री करणे गरजेचे आहे. प्रत्येक विभागाने स्वतंत्ररित्या (ई-कचरा) ची विक्री करणेऐवजी आयटी विभागामार्फत एकत्रितरित्या सर्व विभागाचे (ई-कचरा) करुन विकण्याची कार्यवाही करणे योग्य राहील. तसेच उपरोक्त विषयांन्वये ज्या विभागांकडील नादुरुस्त तसेच कालबाहय झालेले निकामी संगणक, प्रिंटर, युपीएस इत्यादी अनुषांगीक तांत्रिक साहित्य विक्री करावयाचे असेल, अशा संबंधीत विभागाने आवश्यक त्या मान्यता (अंतर्गत लेखापरिक्षण कडुन घसारा किंमत, विक्रीसाठी व डेडस्टॉक मधुन कमी करण्यासाठी लागणारी प्रशासकीय मान्यता) घेऊन इकडील विभागास कळविल्यानंतर तसेच संबंधित विभागाने विक्रीसाठी कळविलेल्या संगणकीय साहित्याची प्रत्यक्ष पडताळणी (साहित्याची खरेदी दिनांक व सद्यस्थिती) संस्थानचे तांत्रिक सल्लागार यांचेमार्फत करण्यात येऊन त्यांनी दिलेल्या अहवालानुसार विक्रीबाबत निर्णय घेतला जाईल.

त्यानुसार विषयांकीत प्रकरणी सर्व विभागांना दि. 13/12/2014 रोजीचे परिपत्रकान्वये कळविण्यात येवुन सर्व विभागाचे ई-कचरा संबंधीत माहिती खालीलप्रमाणे एकत्रित संकलीत करण्यात आलेली असुन त्यास दि. 28/04/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. तरी, खालील तपशिलातील नमुद केलेले सर्व तांत्रिक साहित्य महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार (ई-कचरा) प्रदुषण नियंत्रण मंडळांनी नियुक्त केलेल्या अधिकृत कंपन्यांकडुन संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवुन विक्री करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करता येईल.

| अ.नं. | विभागाचे नाव | संगणक | युपीएस | प्रिंटरर्स | वेब कॅमेरा | कॅमेरा | टेलीफोन | मदरबोर्ड | मोडेम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | विद्युत विभाग | - | 1 | - | - | - | - | - | - |
| 2 | इंग्लीश मिडीअम | 20 | 16 | 3 | - | - | - | - | - |
| 3 | कन्या विद्यालय | 9 | 1 | 2 | - | - | - | - | - |
| 4 | मुंबई कार्यालय | 3 | 1 | 3 | 1 | 1 | 7 | 1 | - |
| 5 | साई प्रसादालय विभाग | 1 | - | 1 | - | - | - | - | - |
| 6 | प्रकाशने विभाग | 2 | 1 | 3 | - | - | - | - | - |
| 7 | खरेदी विभाग | 2 | - | - | - | - | - | - | - |
| 8 | साईनाथ रुग्णालय विभाग | - | - | 3 | - | - | - | - | - |
| 9 | मंदिर विभाग | 2 | - | - | - | - | - | - | - |
| 10 | वाहन विभाग | - | 1 | 1 | - | - | - | - | - |
| 11 | माहिती तंत्रज्ञान विभाग | 34 | 21 | 20 | - | - | - | - | 1 |
| 12 | ध्वनिक्षेपन विभाग | 3 | - | - | - | - | - | - | - |
| | एकुण- | **76** | **42** | **36** | **1** | **1** | **7** | **1** | **1** |

**मागणी:** तरी उपरोक्त प्रस्ताविकेत नमुद केलेनुसार संस्थानचे सर्व विभागांचे कालबाह्य व निकामी झालेले संगणकीय साहित्य, प्रिंटर, युपीएस, इत्यादी अपुषांगीक सर्व तांत्रिक साहित्य महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार (ई-कचरा) प्रदुषण नियंत्रण मंडळांनी नियुक्त केलेल्या अधिकृत कंपन्यांकडुन संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवुन विक्री करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानचे सर्व विभागांचे कालबाह्य व निकामी झालेले संगणकीय साहित्य, प्रिंटर, युपीएस, इत्यादी अपुषांगीक सर्व तांत्रिक साहित्य महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार (ई-कचरा) प्रदुषण नियंत्रण मंडळांनी नियुक्त केलेल्या अधिकृत कंपन्यांकडुन संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागवुन विक्री करणेसाठी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानचे सर्व विभागांचे कालबाह्य व निकामी झालेले संगणकीय साहित्य, प्रिंटर, युपीएस, इत्यादी अपुषंगीक सर्व तांत्रिक साहित्य महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार (ई-कचरा) प्रदुषण नियंत्रण मंडळांनी नियुक्त केलेल्या अधिकृत कंपन्यांकडुन विहित पध्दतीने निविदा मागवुन विक्री करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.४४** **संस्थानचे दैनंदिन कामकाजासाठी प्रिंटर्स संस्थानचे विहित पध्दतीने खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17(1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** दि. 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णक क्र. 799.

**प्रस्ताविक:** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 799 नुसार Saitech Project उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली असून, सदर कार्यवाहीसाठी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. साईटेक प्रकल्पामध्ये 168 संगणक संच, 18 सर्व्हर, 20 युपीएस संस्थानने खरेदी केलेले आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेशी करण्यात आलेल्या SOW व करारनाम्यानुसार साईटेक प्रोजेक्ट अंतर्गत कार्यालयीन वापरासाठी संगणके पुरविण्यात येणार असून प्रिंटरसाठी त्यांचेमार्फत बाहेरील कंपनीशी करारनामा करण्यात आलेला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे एकूण 118 प्रिंटर Printech infotech Services Pvt. Ltd., Pune या कंपनीमार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

| Description | Model | Free Printouts / Month | Additional Printout Rates INR | Total Printer Quantity |
|---|---|---|---|---|
| DMP 80 Column | Wep 800 DX or Wep Bonti Or Wep LX 540 | Unlimited | 0.00 | 40 |
| DMP 132 Column | Wep LQDSI 5232 or Wep LQ 1050 | Unlimited | 0.00 | 2 |
| A4 Color Inkjet | HP Photosmart D7100/7200 or Canon 4760 | 500 | 5.00 | 2 |
| Line Printer with print server | Wep P500 | 20000 | 0.25 | 2 |
| A3 Printer Duplex & Network | Canon LBP 3500 or HP 5200 | 12000 | 0.70 | 4 |
| Darshan Pass Laserjet | Canon LBP 3310 or Canon or 2010 or HP 3005 | 10000 | 0.60 | 20 |
| Laserjet for Individual User | HP LJ P1007/1008 or Canon LBP 2900 | 1000 | 0.75 | 36 |
| Certificate Printing | HP LJ 100 P1007/1008 or Canon LBP 2900 | 1000 | 0.75 | 5 |
| MFD Printer+ Scanner | HP LJ 1120N/1319N/1522N | 2500 | 0.70 | 7 |
| | | | **Total Printers** | **118** |

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे करारनाम्यातील अटी शर्तीमधील मुद्दा क्रं. 3.2 नुसार पहिल्या 05 वर्षाचे प्रिंटरचे मासिक भाडे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे हे अदा करणार आहेत. त्यामध्ये डॉट मॅट्रीक्स प्रिंटरला कुठल्याही प्रकारचे चार्जेस लागणार नसून लेजर प्रिंटरचे प्रकारानुसार मासिक ठरावीक मर्यादे पर्यंत चार्जेस पडणार नसून ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त वापर झाल्यास त्याचे चार्जेस संस्थानला अदा करावे लागणार असल्याचे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे SOW मध्ये नमूद आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे SOW नुसार माहे डिसेंबर 2015 अखेर एकुण 118 प्रिंटर्सपैकी 37 नग प्रिंटर्सचा 05 वर्षाचा आऊटसोर्स कालावधी संपुष्टात येत असल्याने Printech infotech Services Pvt. Ltd., Pune हे केव्हाही सदरचे प्रिंटर्सची सेवा बंद करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

| अ.नं. | माहे | मुदत संपुष्टात येत असलेल्या प्रिंटर्स | एकुण |
|---|---|---|---|
| 01 | ऑगष्ट -2015 | Epson LQ 300+ | 10 |
| 02 | सप्टेंबर-2015 | Epson LQ 300+ | 01 |
| 03 | ऑक्टोबर -2015 | Epson LQ 300+ 18 नग<br>लेझर प्रिंटर P1007 5 नग<br>A-3 लेझर प्रिंटर 01 नग | 24 |
| 04 | नोव्हेंबर-2015 | Zebra Printer | 02 |
| | | एकुण | 37 |

Printech infotech Services Pvt. Ltd., Pune यांचेकडे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचेमार्फत देण्यात आलेल्या प्रिंटर्स आऊसोर्समध्ये प्रिंटर्स पुरवीणे व त्याची दुरुस्ती देखभाल करणे, प्रिंटर्स रिबन बदलणे, प्रिंटर्स टोनर बदलणे, प्रिंटर्स हेड, केबल, बदलणे इत्यादी प्रिंटर्स संबधीत सर्व कामे कंपनीचे तांत्रिक प्रतिनिधींमार्फत ऑनसाईट केले जातात व प्रत्येक प्रिंटर्सचे मॉडेलनुसार कंपनीने मोफत पाने प्रिंट करण्याची सुविधा दिली जाते. तसेच कंपनीने दिलेली मोफत पाने प्रिंट झालेनंतर वाढीव पानांचे बील संस्थानला अदा करावे लागते. त्यानुसार संस्थानमध्ये विविध विभागांमध्ये सद्यस्थितीत वापरात आलेले आऊटसोर्स प्रिंटर्सचा कालावधी संपुष्टात येणेचे आत खालील तपशिलातील नमुद प्रिंटर्स नव्याने संस्थानचे विहित पध्दतीने खरेदी करावे लागणार आहे.

| अ.न. | साहित्याचे नाव | तपशिल | नग | अंदाजे दर | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | लेझर प्रिंटर | HP 1020+ | 15 | 7,500/- | 1,12,500/- |
| 02 | लेझर प्रिंटर (प्रिंट स्कॅन कॉपी | HP-MFP M1005 किंवा तत्सम | 10 | 12,000/- | 1,20,000/- |
| 03 | डॉट मॅट्रीक्स प्रिंटर | Epson LQ 300+ | 40 | 11,500/- | 4,60,000/- |
| 04 | 2612 A टोनर | HP | 50 | 3000/- | 1,50,000/- |
| 05 | 1 KVA UPS | DB, Iball | 10 | 6000/- | 60,000/- |
| | | | | एकुण रक्कम | 9,02,500/- + टॅक्स |

उपरोक्त नमुद केलेले प्रिंटर्स दि. 14/08/2014 रोजीचे महाराष्ट्र शासनाचे अध्यादेशानुसार Manufacturer in RC वर तपासले असता RC वर नसल्याचे निदर्शनास आल्याने याकामी विहित पध्दतीने संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,02,500/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच संस्थानमध्ये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे Scope च्या व्यतीरिक्त कार्यरत असलेल्या सर्व संगणक, प्रिंटर्स, नेटवर्क तसेच इतर संबधीत तांत्रिक साहित्याच्या दुरुस्ती देखभालीकरीता आवश्यकतेनुसार FMS चा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेले प्रिंटर्स दि. 14/08/2014 रोजीचे महाराष्ट्र शासनाचे अध्यादेशानुसार Manufacturer in RC वर तपासले असता RC वर नसल्याचे निदर्शनास आल्याने याकामी विहित पध्दतीने संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,02,500/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच संस्थानमध्ये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे Scope च्या व्यतीरिक्त कार्यरत असलेल्या सर्व संगणक, प्रिंटर्स, नेटवर्क तसेच इतर संबधीत तांत्रिक साहित्याच्या दुरुस्ती देखभालीकरीता आवश्यकतेनुसार FMS चा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेले प्रिंटर्स दि. 14/08/2014 रोजीचे महाराष्ट्र शासनाचे अध्यादेशानुसार Manufacturer in RC वर तपासले असता RC वर नसल्याचे निदर्शनास आल्याने याकामी विहित पध्दतीने संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 9,02,500/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच संस्थानमध्ये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे Scope च्या व्यतीरिक्त कार्यरत असलेल्या सर्व संगणक, प्रिंटर्स, नेटवर्क तसेच इतर संबधीत तांत्रिक साहित्याच्या दुरुस्ती देखभालीकरीता आवश्यकतेनुसार FMS चा सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.४१५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दैनंदिन कामकाजासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेले प्रिंटर्स विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.९,०२,५००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच खरेदी करावयाचे प्रिंटर्स सध्या कार्यरत असलेल्या सी.पी.यू. ला सपोर्ट करतात का, याची खात्री करुन घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.४५ **श्री साईबाबांचे ऑनलाईन प्रसाद खाजगी वेबसाईटव्दारे विक्रीबाबतचे प्रस्तावास मा.मुंबई हायकोर्टाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:** कलम १७(१) नुसार.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.** :१) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/१०/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९०९. २) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२८

**प्रास्ताविक** : मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/१०/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ९०९ अन्वये Actor Dino Morea यांच्या www.ibhakti.com या संकेतस्थळाप्रमाणे श्रींचा प्रसाद ऑनलाईन विक्री करणेकामी इच्छुक असणाऱ्या इतरही संकेतस्थळाचा समावेश होणेकामी संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी व त्यानुसार सर्व इच्छुकांचा एकत्रित प्रस्ताव समितीसमोर सादर करण्यात यावा, असे निर्देश दिलेले आहे.

त्यानुसार संदर्भ दि. ०३/०३/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये याकामी सर्व इच्छुक संकेतस्थळांचा प्रस्ताव निर्णयार्थ मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेकामी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. परंतु,सदर

प्रस्तावावर मा. कार्यकारी अधिकारी सो.,यांचेशी दि. १२/०३/२०१५रोजी झालेल्या समक्ष चर्चेनुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२८नुसार भक्तांना श्रींचे समाधी मंदिरामध्ये ऑनलाईन प्रसाद अर्पण करणे व पाठविणेबाबत Actor Dino Morea यांनी प्रस्तावीत केलेली संकल्पना श्री सिध्दीविनायक, मुंबई न्यासामध्ये वापरणेत येत असुन कार्यकारी अधिकारी यांनी तेथे प्रत्यक्ष पाहुन यावी व त्यांचा अहवाल सादर करावा,असे निर्देश दिलेले आहे.

सदर मा. व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार मा.कार्यकारीअधिकारी सो.,यांनी दि. १८/०३/२०१५रोजी चर्चेअंती दिलेल्या निर्देशानुसार खालील मुद्दे विचारात घेता प्रस्ताव निर्णयार्थ मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मुद्दा क्रं.०१.** Actor Dino Morea यांनी प्रस्तावीत केलेली संकल्पना श्री सिध्दीविनायक, मुंबई न्यासामध्ये सध्या कार्यान्वीत नसुन त्यांची सदर ठिकाणी कामकाजाबाबतची तसेच श्रींचा प्रसाद विक्री करणेकामी कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्याची त्यांची कार्यपध्दती व्यवस्थीत नसल्याचे तसेच याबाबत अद्याप याकामी श्री सिध्दीविनायक, मुंबई न्यासामध्ये कुठलीही कार्यवाही सुरु नसल्याचे मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी चर्चेअंती सुचविले आहे. तसेच श्री सिध्दीविनायक मंदिर, मुंबई यांचेशी याकामी ई-मेलव्दारे संपर्क साधला असता त्यांनी दि.०८/०५/२०१५रोजीचे ई-मेलनुसार "The Software however is fairly complex to build, test and debug and is still under final testing and debugging before the service can go live" असे मत व्यक्त केले आहे.

**मुद्दा क्रं.०२.** Actor Dino Morea यांचे कंपनीचे दि.३०/१०/२०१४रोजीचे प्राप्त प्रस्ताव/ करारनाम्यामध्ये नमुद केलेले मुद्दे व इकडील विभागाचा अभिप्राय खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | कंपनीचे प्रस्ताव/ करारनाम्यातील नमुद मुद्दे | विभागाचा अभिप्राय |
|---|---|---|
| ०१ | साईभक्त त्यांचे वेबसाईटचे माध्यमातुन इंटरनेटव्दारे प्रसाद विकत घेतील सदर प्रसादाची मंदिरामध्ये पुजा होईल. | संस्थानचे shrisaibabasansthan.org व Online.sai.org.in या दोनच अधिकृत वेबसाईट आहेत. सदर वेबसाईटव्दारे श्रींचे ऑनलाईन दर्शन आरती/ पास/ रुम बुकींग / देणगी/ मेंबरशिप/ साईलीला व साईचरीत्र खरेदी आदी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. याच सुविधा सुरु करण्यासाठी इतर वेबसाईटला परवानगी दिल्यास त्यावर कुठल्याही प्रकारचे नियत्रंण ठेवणे शक्य नाही. अनाधिकृतपणे इतरही वेबसाईट श्रींचे नावे साहित्य विक्री करु शकतात. |
| ०२ | पुजा होत असतांनी पुजेचे व्हीडेओ शुटींग घेतले जाईल त्यानंतर सदर प्रसाद भक्तांना कंपनीमार्फत घर पोहोच केला जाईल. | संस्थान मंदिर व परिसरातील फोटो व शुटींग घेण्यास परवानगी देऊ शकत नाही. एखादया कंपनीस सवलत दिल्यास इतरही कंपन्या फोटो / शुटींगची मागणी करु शकतात. |
| ०३ | भक्तांना पुजा ऑनलाईन बघता येईल. तसेच भक्त आरती करु इच्छित असल्यास सदर भक्तांना Mobile वर आरती पाठविण्याची व्यवस्था त्यांचे कंपनी मार्फत करण्यात येईल. | उपरोक्त प्रमाणे शुटींगची मान्यता देणे शक्य नाही. तसेच संस्थानमार्फत सुरु असलेल्या वेगवेगळया प्लॅटफार्मवरील लाईव्ह दर्शन सुविधा संस्थान नियमाप्रमाणे ई-निविदा प्रक्रिया करुन देण्यात आले असुन संस्थानने अधिकृत केलेल्या कंपनी व्यतिरिक्त इतर कुठल्याही कंपनीस लाईव्ह सिग्नल पुरविता येणार नाही. सदरकामी संस्थानला संबंधीत कंपनीकडुन देणगी/ रॉयल्टी स्वरुपात महसुल मिळत आहे. |
| ०४ | त्यांचे वेबसाईटचे माध्यमातुन भक्तांना स्पेशल आरती/ पुजा उत्सव काळात तसेच इतर दिवशीही आरक्षीत करण्याची सुविधा संस्थानला उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे. तसेच सदरची पुजा/ आरती भक्तांना थेट लाईव्ह प्रक्षेपन व रेकॉर्डेड आरती भक्तांना दाखविणेकामी संस्थानमार्फत पुर्ण जगभर विनामोबदला त्यांना उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे. | संस्थानचे अधिकृत वेबसाईट शिवाय इतर कोणत्याही अनाधिकृत कंपनीचे वेबसाईटला आरती दर्शन व पुजा देणे पुर्णत: चुकीचे ठरेल. तसेच टाटा स्काय व टि.व्ही.– ९ टि. व्ही. चॅनेल या संस्थानने अधिकृत केलेल्या कंपनी व्यतिरिक्त इतर कुठल्याही कंपनीस लाईव्ह सिग्नल पुरविता येणार नाही. |
| ०५ | तसेच त्यांचे वेबसाईटला व मोबाईल ॲप्लीकेशन वरती व्ही आय पी पासेस विकण्याची सुविधा तसेच स्वतंत्र दर्शन लाईन व गेट संस्थानला उपलब्ध करुन द्यावे लागणार आहे. | संस्थानचे अधिकृत वेबसाईट शिवाय इतर कोणत्याही अनाधिकृत कंपनीचे वेबसाईटला व्ही आय पी पासेस विकण्याची सुविधा उपलब्ध करुन देता येणार नाही. दिल्यास अदा होणारे पासेस् व भक्तांची संख्या यावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही. सद्या कार्यरत असलेल्या प्रणालीमधुन पासेसची संख्या गर्दीनुसार कमी जास्त करणे सहज शक्य आहेत. पासचे अधिकार इतर कंपन्यांना दिल्यास गर्दीच्या कालावधीमध्ये पास संख्या कमी करण्याचे नियंत्रण संस्थानकडे नसेल. |
| ०६ | प्रसाद विक्री उपक्रमाची सर्व माहिती, भक्तांचे अभिप्राय, मंदिरातील वर्षभरातील कार्यक्रम ते फेसबुक व सामाजीक मिडीया प्लॅटफॉर्म वरती ते उपलब्ध करुन देणार आहे. | सदर सामाजीक मिडीया प्लॅटफॉर्म व्यापक असुन त्यावर श्री साइर्भक्तांमध्ये होणारा परिणाम विचार करण्यात यावा. फेसबुक व तत्सम सोशल मिडीयावर संस्थान विषयी माहिती आयटी विभागाने नियंत्रीत केल्यास योग्य होईल. |
| ०७ | श्रीं चे लाईव्ह दर्शन हे संबंधीत कंपनी इतर कोणत्याही वेबसाईटवरती, इतर कंपन्यांचे ॲप्लीकेशन वरती दाखविणार आहे. | कंपनीचे मागणीनुसार देता येणे शक्य नाही. |

| | | |
|---|---|---|
| ०८ | प्रसाद विक्री कंपनीस सद्यस्थितील साईटेक प्रोजेक्ट संदर्भातील सर्व सॉफटवेअर बरोबर कनेक्टीव्हीटी लागणार असुन त्याव्दारे संबंधीत कंपनी व्ही आय पी पासेस विशिष्ट पुजा तसेच इतर सव्हिसेस त्यांचे वेबसाईटमार्फत भक्तांना पुरविणार आहे. | साईटेक प्रोजेक्ट सॉफटवेअर कनेक्टीव्हीटी सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन कुठल्याही कंपनीस देता येणे शक्य नाही. तसेच संस्थानचे अधिकृत वेबसाईटशिवाय कुठल्याही कंपनीस व्ही आय पी पासेस विशिष्ट पुजा तसेच इतर सव्हिसेस देता येणार नाही. |
| ०९ | प्रसाद विक्री संबंधी पुरवठाधारकांची, उत्पादकांची नेमणुक करण्याचे सर्व अधिकार कंपनीस राहतील. | प्रसादातील साहित्याच्या गुणवत्तेवर संस्थानचे कोणेतेही नियंत्रण राहणार नाही. |
| १० | प्रसाद विक्री नंतर साईभक्तांची होणारी सर्व माहितीचा डाटाबेस कंपनी ही स्वत:कडे ठेवणार असुन त्याबाबत संस्थानला कुठल्याही परिस्थितीत याबाबत हस्तक्षेप तसेच संबंधीत भक्तांशी कुठल्याही प्रकारचा संवाद साधता येणार नाही. | सर्व हक्क कंपनीकडे देणे पुर्णत: चुकीचे ठरेल. |
| ११ | प्रसाद विक्री संबंधीत कंपनी श्रीसाईभक्तांना स्टोन, क्रिस्टल, जेड आणि चांदीचे नाणी व पवित्र जल व इतर प्रसाद देणार असल्याने त्यात संस्थानला कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करता येणार नाही. | मंदिरातील पवित्र जल प्रत्येक भक्तास देणे शक्य नाही. उपरोक्त ११ प्रमाणे प्रसाद साहित्याच्या गुणवत्तेवर संस्थानचे कोणतेही नियंत्रण राहणार नाही व श्रीसाईभक्तांना कमी दर्जाच्या प्रसाद गेल्यास संस्थान विषयी गैरसमज निर्माण होतील. |

तसेच विषयांकीत प्रस्ताव संस्थानचे विविध विभागांशी संबधीत असल्याने याकामी दि.१२/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आला असुन संबधीत विभागाने खालीलप्रमाणे विषयांकीत प्रकरणी आपले मत लिखीत स्वरुपात आपले मत नमुद केले आहे.

**<u>०१. लेखाशाखा विभाग:-</u>** दि.०२/१२/२०१४रोजीचे मंजुर टिपणी अन्वये दि.१२/१२/२०१४रोजी विषयांकीत प्रकरणी लेखाशाखा विभागाचा अभिप्राय मिळणेकामी त्यांना कळविले असता, आज पावेतो लेखाशाखा विभागाचा अभिप्राय इकडील विभागास प्राप्त झालेला नाही.

**<u>०२. विधी विभाग:-</u>** सध्या ऑनलाईन डॉट कॉम व संस्कार प्रसाद डॉट कॉम या कंपन्यांनी अनाधिकृतपणे संस्थानची परवानगी न घेता साईबाबांचे फोटो, प्रसाद, उदी भक्तांना ऑनलाईन विक्री करीत असल्याचे आढळुन आले आहे, याबाबत कायदेशीर कार्यवाही चालु आहे.

उपरोक्त सुविधा वेगवेगळया अनेक कंपन्याना उपलब्ध करुन दिल्यास, सदर कंपन्या त्यांच्या मार्फत इतर कंपन्यांना सबलीजवर ही सुविधा त्यांच्या मार्फत उपलब्ध करुन देतील व त्यांच्यावर संस्थानचे नियंत्रण ठेवणे अशक्य होऊन, अशा कंपन्याकडुन मंदिर प्रशासनावर समातंर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न होईल व भक्तांची फसवणुक होऊन भक्तांच्या तक्रारीत वाढ होण्याचा संभव आहे. सध्या साईभक्तांना दर्शन रांगेतचे साईबाबांचा प्रसाद म्हणुन बुंदी प्रसाद म्हणुन मोफत दिला जात आहे.

साईबाबांचा प्रसाद, कंपन्यांमार्फत ऑनलाईन दिला गेल्यास प्रसादाचे पावित्र्य राहणार नाही व भक्तांचे मनात संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे, म्हणुन साईप्रसाद ऑनलाईन उपलब्ध करण्याची परवानगी कंपन्यांना देऊ नये, असे विधी विभागाचे मत दि. २७/१२/२०१४ रोजीचे पत्रात नमुद केले आहे.

**<u>०३. मंदिर विभाग:-</u>** समाधी मंदिरामध्ये श्रींना मध्यान्न आरती तसेच धुपारतीचे वेळेस समाधीवर नैवेद्य दाखविला जातो. हा नैवेद्य दाखविल्यानंतर श्री साईप्रसादालयाचे अन्नामध्ये मिसळुन त्याचा लाभ श्री साईप्रसादालयामध्ये भोजन घेणारे हजारो भक्तांना होतो. आरती नंतर श्री साईभक्तांना उदी कांऊटरजवळ शिरा प्रसाद वाटण्यात येतो. शुक्रवारी गुळ फुटाणे प्रसाद वाटण्यात येतो. विषयांकीत प्रस्तावाचे अवलोकन करता :-

०१) श्री साईबाबांचा प्रसाद संबंधीत संस्थेमार्फत तयार करुन त्याची समाधी मंदिरामध्ये पुजा करुन त्याची त्या संस्थेमार्फत विक्री करण्यात येणार आहे व या प्रसाद विक्रीतील नफयाचा ५०% हिस्सा ते संस्थानला देण्यार आहेत. त्याबदल्यात त्यांचे करारनाम्यानुसार त्यांचे या प्रसादाची मंदिरामध्ये पुजा करावी लागणार आहे. हा प्रसाद मोठया स्वरुपास असल्यास त्यांनी तयार केलेला हा प्रसाद समाधी मंदिरामध्ये घेऊन येणे, त्याची पुजा करणे, व प्रसाद पुन्हा बाहेर घेऊन जाणे यासाठी समाधी मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमामधुन वेळ द्यावा लागेल व त्याचा परिणाम साईभक्तांचे दर्शन व्यवस्थेवर होऊ शकतो व सुरक्षेच्या दृष्टीने ते धोकादायक ठरु शकते.

०२) विषयांकीत प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे संबधीत कंपनीचे वेबसाईटचे माध्यमातुन भक्तांना स्पेशल आरती/ पुजा उत्सव काळात तसेच इतर दिवशी आरक्षीत करण्याची सुविधा संस्थानमार्फत उपलब्ध करुन द्यावे, असे नमुद करण्यात आलेले आहे. परंतु, समाधी मंदिरामध्ये अशा प्रकारे भक्तांची स्पेशल आरती /पुजा करण्यात येत नाही तसेच उत्सव कालावधीमध्ये अभिषेक पुजा व सत्यनारायण पुजा बंद असतात तसेच पी.आर. ओ. मार्फत वितरीत केले जाणारे दर्शन/आरती पास बंद असतात.

०३) प्रसाद विक्री संबधी पुरवठाधारकांची, उत्पादकांची नेमणुक करण्याचे सर्व अधिकार कंपनीस असल्यामुळे भविष्यकाळामध्ये प्रसादाचे दर्जा/ गुणवत्ता याबाबत समस्या निर्माण झाल्यास श्री साईबाबा संस्थानचे नावलौकीकास बाधा पोहचु शकते.

०४) प्रसाद विक्री संबधीत कंपनी श्री साईभक्तांना स्टोन, क्रिस्टल, जेड आणि चांदीची नाणी व पवित्र जल व इतर प्रसाद देणार असल्याने त्यात संस्थानला कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करता येणार नसल्याने त्यामधुन साईभक्तांची फसवणुक होऊ शकते.

०५) जगात कोणीही, कोणत्याही ठिकाणाहुन, कोणत्याही वेळी साईबाबांना मनापासुन प्रार्थना केली तरीही श्री साईबाबा हे त्या साईभक्तांचे दुख: दुर करतात तसेच त्यांचे मनोकामना पुर्ण करतात त्यामुळेच दररोज हजारो / लाखोंच्या संख्येने साईभक्त शिरडीस दर्शनास येतात या साईभक्तांना श्री साईबाबांची उदी हाच सर्वात मोठा प्रसाद आहे. त्यामुळे **Devotee E-Solution Pvt. Ltd.,** या संस्थेने श्री साईबाबांचे नावाने इतर प्रसाद, स्टोन, क्रिस्टल, जेड, चांदिची नाणी इत्यादी वस्तु जाहिरात करुन विकल्यास श्री साईबाबांचे भक्तीचे व्यापारीकरण होईल व त्यामुळे जगभरातील साईभक्तांची नाराजी निर्माण होऊ शकते, असे मत मंदिर विभागाने दि. २१/१२/२०१४रोजीचे पत्रात नमुद केलेआहे.

**०४. प्रसादालय विभाग**:- प्रसादालय विभागामार्फत कोणत्याही पदार्थाची /वस्तुची बाहेर प्रसादरुपी विक्री होत नाही.

०१) प्रसादालय विभागामार्फत दरारोज सकाळी १०.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत मुख्य प्रसाद भोजन हॉल, साईबाबा भक्तनिवासस्थान स्वंयसेवी प्रसाद भोजन कक्ष, व्दारावती भक्तनिवासस्थान स्वंयसेवी प्रसाद भोजन कक्ष इत्यादी ठिकाणी साईभक्तांची प्रसाद भोजन व्यवस्था सुरु आहे.

०२) साईभक्तांचे सोईसाठी प्रसाद भोजन सुरु होण्यापुर्वी अन्न पाकीटांची व्यवस्थाकरण्यात येते. अन्नपाकीटे प्रसादालय विभागामार्फत पहाटे ०४.०० वाजेपासुन तयार करण्यात येतात. तयार अन्नपाकीटे सकाळी ०७.०० ते ०९.३० वाजेपर्यंत विक्रीसाठी कॅन्टीन विभागाचे ताब्यात देण्यात येतात.

तरी, प्रसादालय विभागार्मात कोणत्याही पदार्थांची /वस्तुंची बाहेर विक्री केली जात नसल्याचे मत प्रसादालय विभागाने दि. २०/१२/२०१४रोजीचे पत्रात नमुद केलेआहे.

**०५. जनसंपर्क विभाग**:- संस्थानचे अधिकृत वेबसाईट शिवाय इतर कोणत्याही अनाधिकृत कंपनीचे वेबसाईटला व्हीआयपी पासेस विकण्याची सुविधा उपलब्ध करुन देता येणार नाही. दिल्यास अदा होणारे पासेस् व भक्तांची संख्या यावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही. सद्या कार्यरत असलेल्या प्रणालीमधुन पासेसची संख्या गर्दीनुसार कमी जास्त करणे सहज शक्य आहेत. पासचे अधिकार इतर कंपन्यांना दिल्यास गर्दीच्या कालावधीमध्ये पास संख्या कमी करण्याचे नियंत्रण संस्थानकडे नसेल. संस्थानच्या वेबसाईटवर सध्या सुरु असलेली दर्शन/आरती सुविधा अत्यंत सुलभ व चांगली असुन त्यास साईभक्तांकडुन अत्तम प्रतिसाद मिळत आहे. या सुविधेतुन संस्थानला दि.१३.०७.२०११ते दि.१८.१२.२०१४ या कालावधीत रक्कम रुपये२७,४४,१८,७००/- (अक्षरी रक्कम रुपये सत्तावीस कोटी चौरेचाळीस लाख आठरा हजार सातशे मात्र) प्राप्त झालेले आहेत.

तरी संस्थानचे अधिकृत वेबसाईट शिवाय इतर कोणत्याही अनाधिकृत कंपनीचे वेबसाईटला व्ही. आय.पी. पासेस विकण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येऊ नये, असे मत जनसंपर्क विभागाने दि. १८/१२/२०१४रोजीचे पत्रात नमुद केलेआहे.

**०६. तांत्रिक सल्लागार**:- विषयांकीत प्रस्तावाबाबत श्री के.व्ही.रमणी सो., यांनी खालील मुद्दे निहाय अभिप्राय दिला आहे. सोबत दि. ०७/०१/२०१५रोजीचे ई-मेलची प्रत जोडली आहे.

1. iBhakti.com is offering following services:

a. Selling of Prasad (Perishable and Non-Perishable), Special Prayers, AshirvachanPooja and other special poojas as mutually decided and added to the annexure in the future, Subscription for Recorded Aartis and Selling of VIP passes

2. We are already offering Livedarshan for devotees, Online booking for Arathi, darshan, Room bookings and donations.

Sansthan is only having Abhishek puja and SaiSayavrat puja done in the Abhishek hall.

If Sansthan wants, we can offer these services also in our online systems of SaiTech.

3. We can also offersale of Laddu and other Prasad similar to our online store for sale of books and publications.

4. Sansthan is not having any other special puja to be done by priests for devotees in the Samadhi mandir or other sanctum for devotees.

5. Since we are already offering these services to all devotees, there is no need to share 50% part of profits of the Sansthan revenues for these service to iBhakti.com.

6. Therefore, my recommendation is following:

i. Sansthan is offering many of these Online services to devotees already.

ii. Sansthan can continue to offer all these services to devotees directly.

iii. Any other services decided by management, like pujas or sales of prasad can be added in SaiTech.

iv. There is no need to share any of the revenues with iBhakti.com or others.

v. The proposal of iBhakti.com can be rejected.

vi. Any additional requirements of Sansthan can be included in SaiTech Online systems itself, without loss of revenues to Sansthan.

वरील सर्व प्रास्ताविकेतील नमुद मुद्दे, सर्व संबधित विभागांचे व तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय तसेच सद्यस्थितीतील श्री सिध्दी विनायक, मुंबई न्यासामधील परिस्थिती विचारात घेता सदरहु प्रस्तावावर/ विषयावर निर्णय होणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेकामी संदर्भ क्रं.०७ चे टिपणी अन्वये सादर करणेत

आला होता. तसेच विधी विभागाचे संदर्भ क्रं. ०८चे पत्रान्वये सदर प्रस्तावावर Setup Box (डीश) वरील श्रींचे ऑनलाईन दर्शन तथा आरती सुविधेकामी Tata Communications Ltd., Mumbai यांचेशी करावयाच्या करारनामा मसुदा तयार करण्याचे कार्यवाही सुरु होती.

परंतु संबंधीत विषयावर दि. १२/०५/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., व मा.मुख्यलेखाधिकारी सो., यांनी दिलेल्या सुचनेनुसार सध्या Tata Communications Ltd., Mumbai यांना डी टी एच टि व्ही व्दारे लाईव्ह दर्शन सुविधा ही Exclusive स्वरुपात All Over India करीता संदर्भ क्रं.०९ अन्वये देण्यात आलेला असल्या कारणाने त्यांचे लाईव्ह दर्शन स्कोप मधुन Online Prasad खाजगी वेबसाईटव्दारे विक्री करणेचा स्कोप वगळता डी टी एच टि व्ही व्दारे लाईव्ह दर्शन सुविधेकामी संस्थानचे विहित पध्दतीने पुनश्च निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येऊन निविदा प्रक्रियेत फक्त Exclusive दर हे All Over India करीता मागविण्यात यावे, असे चर्चेअंती सुचविले आहे. तसेच सदर निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार यांचे मार्गदर्शनानुसार तयार करण्यात यावी व सदरची निविदेतील कायदेशीर बाबी विधी विभाग तसेच आर्थिक बाबी लेखाशाखा विभागाकडुन तपासुन घेण्यात येऊन सदर सेवेबाबतचा करारनाम्याचा मसुदातज्ञ कायदेशीर सल्लागाराकडुन तयार करुन घेण्यात यावा. सदरकामी पुनश्च कार्यवाही करणेपुर्वी प्रथम मुंबई हायकोर्टाचे औरगांबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे निर्देश दिले असुन त्यानुसार प्रस्ताव दि. १४/०५/२०१५रोजी मुंबई हायकोर्टाचे औरगांबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेचे मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.

सदरहु प्रस्तावावर मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी दि. २९/०७/२०१५ रोजी चर्चा झाल्याप्रमाणे “अ” व “ब” प्रकरणी राबविण्यात आलेल्या निविदा पध्दतीतील त्रुटीबाबतच्या उल्लेखासह टिपणी तयार करुन करारनाम्याच्या सल्लागाराकडुन तयार करण्यात आलेला मसुदा मान्यतेच्या निमीत्ताने एकत्रित प्रस्ताव व्यवस्थापन समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावा, असे निर्देश दिलेले आहे.

त्यानुसार **“अ” व “ब”** (Tata DTHव TV-९ चॅनलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधेकामी) प्राप्त झालेल्या निविंदा व त्याबाबतचे झालेल्या कार्यवाहीबाबत मुद्यासह सदरहु प्रस्ताव दि. ११/०८/२०१५रोजी मुंबई हायकोर्टाचे औरगांबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेचे मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

तसेच Online Prasad ची विक्री खाजगी वेबसाईटव्दारे करावयाची झाल्यास यापुर्वीच दि.०९/०५/२०१५ अन्वये संस्थानचे संबधीत विभाग व तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय प्रस्तावात नमुद केलेले असुन मा. कार्यकारी अधिकारी सो., व मा. मुख्यलेखाधिकारी सो., यांनी दि. १२/०५/२०१५रोजी दिलेल्या सुचनेनुसार याकामी संस्थानचे विहित पध्दतीने निविदा प्रक्रिया संस्थानचे तांत्रिक सल्लागार यांचे मार्गदर्शनानुसार तयार करण्यात यावी व सदरची निविदेतील कायदेशीर बाबी विधी विभाग तसेच आर्थिक बाबी लेखाशाखा विभागाकडुन तपासुन घेण्यात येऊन सदर सेवेबाबतचा करारनाम्याचा मसुदातज्ञ कायदेशीर सल्लागाराकडुन तयार करुन घेण्यात यावा, असे सुचविले आहे. त्यानुसार प्रस्ताव दि.१८/०५/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करणेच मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.

परंतु सदरहु प्रस्तावावर मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी चर्चा झाल्याप्रमाणे सध्या ज्यांना Online दर्शनचे Rights देण्यात आले आहेत त्यांची प्रथम NOC घ्यावी लागेल, असे निर्देश दिले आहे.

त्यानुसार याकामी दि.०१/०१/२०१४ अन्वये Tata Communications Ltd., Mumbai यांना डी टी एच टि व्ही व्दारे लाईव्ह दर्शन सुविधा पुरविणेकामी कार्यादेश देण्यात आला असुन त्यांना दि.३०/०७/२०१५ रोजीचे ई-मेलव्दारे मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी दिलेल्या निर्देशानुसार विषयांकीत प्रकरणी NOC मिळणेबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.०४/०८/२०१५ चे ई-मेलव्दारे NOC बाबत खालीलप्रमाणे आपला अभिप्राय कळविला आहे.

“I have internally checked with our legal and we have no objection for any online Prasad distribution service provided by the trust or any trust vendors, in case the service has any component of live Aarti or video part the trust should consider Tata communication service and ask any such vendors to take services from Tata communication for video feeds for which Tata communication may charge a nominal fees to the vendor.”

तसेच दि.०१/०१/२०१४ अन्वये Associated Broadcasting Company Pvt. Ltd., (TV-9) Hyderabadयांना टि व्ही चॅनेलवरील लाईव्ह दर्शन सुविधा पुरविणेकामी कार्यादेश देण्यात आला असुन त्यांना दि.३०/०७/२०१५ रोजीचे ई-मेलव्दारे मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी दिलेल्या निर्देशानुसार विषयांकीत प्रकरणी NOCमिळणेबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.०४/०८/२०१५ रोजीचे ई-मेलव्दारे NOCबाबत खालीलप्रमाणे आपला अभिप्राय कळविला आहे.

“With reference to your mail dated 30.70.2015 regarding your proposals of online Prasad offeringड्s from interested vendors which requires sharing of live feed by using existing infrastructure already deployed.

We have no objection in your giving the live Prasad offering to the vendors however if the vendors are using the live feed being provided to us we will wish to the Sansthan (SST) either reduce our monthly/Quarterly billing to the extent the vendors using the live feed or

alternatively ask the vendors to pay directly to us for the live feed being used by them on the basis of what we are paying to the Sansthan (SST).

We hereby give our No Objection subject to above to enable you to start the online Prasad services for the convenience of Sai devotees."

तरी, सदर Online Prasad ची विक्री खाजगी वेबसाईटव्दारे करावयाची झाल्यास उपरोक्त प्रास्ताविकेतील सर्व नमुद मुद्दे, सर्व संस्थानचे संबधित विभागांचे व तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय तसेच सद्यस्थितीतील श्री सिध्दी विनायक, मुंबई न्यासामधील परिस्थिती तसेच सद्यस्थितीत Online दर्शनचे Rights देण्यात आलेले Tata Communications Ltd., Mumbai व Associated Broadcasting Company Pvt. Ltd., (TV-९) Hyderabad यांचे विषयांकीत प्रकरणी प्राप्त झालेले NOC बाबतचे अभिप्राय प्रथमत: विचारात घेण्यात यावे तसेच सदरकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही करणेपुर्वी प्रथम मुंबई हायकोर्टाचे औरगांबाद खंडपीठाची विषयांकीत प्रस्तावास मान्यता घेणेकामी सदरहु प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात यावा.

**मागणी:** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे Online Prasad ची विक्री खाजगी वेबसाईटव्दारे करावयाची झाल्यास उपरोक्त प्रास्ताविकेतील सर्व नमुद मुद्दे, सर्व संस्थानचे संबधित विभागांचे व तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय तसेच सद्यस्थितीतील श्री सिध्दी विनायक, मुंबई न्यासामधील परिस्थिती तसेच सद्यस्थितीत Online दर्शनचे Rights देण्यात आलेले Tata Communications Ltd., Mumbai व Associated Broadcasting Company Pvt. Ltd., (TV-९) Hyderabad यांचे विषयांकीत प्रकरणी प्राप्त झालेले NOC बाबतचे अभिप्राय प्रथमत: विचारात घेण्यात यावे तसेच सदरकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही करणेपुर्वी प्रथम मुंबई हायकोर्टाचे औरगांबाद खंडपीठाची विषयांकीत प्रस्तावास मान्यता घेणेकामी सदरहु प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात यावा, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** आर्थिक, तांत्रिक व कायदेशीर.

**विभागाचा अभिप्राय:** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे Online Prasad ची विक्री खाजगी वेबसाईटव्दारे करावयाची झाल्यास उपरोक्त प्रास्ताविकेतील सर्व नमुद मुद्दे, सर्व संस्थानचे संबधित विभागांचे व तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय तसेच सद्यस्थितीतील श्री सिध्दी विनायक, मुंबई न्यासामधील परिस्थिती तसेच सद्यस्थितीत Online दर्शनचे Rights देण्यात आलेले Tata Communications Ltd., Mumbai व Associated Broadcasting Company Pvt. Ltd., (TV-९) Hyderabad यांचे विषयांकीत प्रकरणी प्राप्त झालेले NOC बाबतचे अभिप्राय प्रथमत: विचारात घेण्यात यावे तसेच सदरकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही करणेपुर्वी प्रथम मुंबई हायकोर्टाचे औरगांबाद खंडपीठाची विषयांकीत प्रस्तावास मान्यता घेणेकामी सदरहु प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनयसादर.

**निर्णय क्र.४१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन समितीचे असे मत झाले की, श्री साईबाबांचा प्रसाद संस्थानमार्फत साईभक्तांना पुरविणेत येत आहे व तो संस्थानकडून पुरविला गेला पाहिजे त्यामध्ये मध्यस्थीची आवश्यकता नाही. मध्यस्थीला याकामी परवानगी दिल्यास 3rd party Interest निर्माण होऊन मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होऊ शकतो. तसेच मध्यस्थीकडून दिल्या गेलेल्या प्रसादापासून साईभक्तांना विषबाधेसारखा अपाय होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. या सर्व बाबींचा विचार करता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत यावा.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.४६** **शैक्षणिक संकुलाकरीता ग्रथपालांना वेतनश्रेणी नेमणूक दिनांकापासून देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग ४) समितीची कर्तव्ये व अधिकार १७ (२-ढ):-** मध्ये सर्व प्रकारच्या धर्म निरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील तसेच,शिर्डी व अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक**– उपरोक्त विषयान्वये माध्यमिक शाळा संहितेनुसार पदवीधर ग्रंथपालांची अर्हता असलेली जाहीरात देवून अर्ज मागवून जाहीरातीने प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून उमेदवारांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आल्या. दि. 20/08/2010 रोजी निवड समितीद्वारे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येवून खालील नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

**संदर्भ क्र.१ नुसार**- शासन निर्णय क्रमांक एसएसएन/२६०३/(४१/०३)/माशी-०२, दि.२५ नोंव्हेबर २००५ अन्वये सदर पदधारकास सुरूवातीचे तीन वर्ष रू.२५०० मासिक मानधन देवुन त्यानंतर नियमित ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी अनुज्ञेय राहील. (सोबत-संदर्भिय जी.आर.क्रमांक १ जोडलेला आहे.)

उपरोक्त जी.आर.नुसार शैक्षणीक संकुलाकडील खालीलप्रमाणे ग्रंथपाल पदावर नेमणूका करण्यात आल्या.

| कर्मचारी नांव व हुद्दा | नियुक्ती आदेश क्र. | विभाग | शैक्षणिक अर्हता | नेमणूक दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) श्री भाऊसाहेब बाबुराव शिंदे (ग्रंथपाल) | जा. नं. एसएसएस/ कनिष्ठ/ ५४७९/ २०१२ दि.०१ फेब्रुवारी २०१२ | श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय | बी.एस्सी., एम.लिब., आय. सी. | दि.०१/०२/२०१२ |
| २) श्री सुनिल उत्तमराव शेजवळ (ग्रंथपाल) | जा. नं. एसएसएस/ कविम/ ५४८२/ २०१२ दि.०१ फेब्रुवारी २०१२ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर | बी. ए., एम. लिब., आय. सी. | दि.०१/०२/२०१२ |

**संदर्भ क्र.२ नुसार-**

तदनंतर शासन निर्णय क्रमांक एसएसएन/२६०३/(४१/०३)/माशी-०२, दि.२५ नोंव्हेबर २००५ शासन स्तरावर अंमलबजावणी न होता दि.३० डिसेंबर २००५ रोजी रद्द करण्यात आली. या शासन निर्णय क्रमांक एसएसएन/१००८/ (२००/०८)/ माशी-०२, दि.२३ ऑक्टोबर २०१३ या सुधारीत शासन निर्णयामध्ये दि.२५ नोंव्हेबर २००५ या शासन निर्णयाविरूध्द संस्थाचालकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी लक्षात घेता दि. २५ नोंव्हेबर २००५ च्या शासननिर्णयाची अंमलबजावणी होवू शकली नाही. तसेच दि.२५ नोंव्हेबर २००५ प्रमाणे निश्चित करण्यात आलेले व आतांपर्यत वापरत असलेले निकष अधिक्रमित रद्द करण्यात येत असून ते येथून पुढे कोणत्याही परिस्थितीत लागू राहणार नाहीत याप्रमाणे आहेत.

**संदर्भ क्र.३ नुसार-**

तसेच श्री भाऊसाहेब बाबुराव शिंदे व श्री सुनिल उत्तमराव शेजवळ यांनी दि.१९ नोव्हेंबर २०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी यांना अर्ज करून दि.२५ नोव्हेंबर २००५ या शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही असे अर्जाद्वारे परिविक्षाधिन कालावधी संपण्याच्या आत कळविलेले आहे.त्यानुसार मा.प्राचार्या यांनी दि.१२/०५/२०१४, दि.१७/११/२०१४ व दि.१९/०१/२०१५ या टिपणीद्वारे वेळोवेळी मांडलेले आहे. त्यामुळे ग्रंथपालांना अटी व शर्ती व परिविक्षाधिन कालावधी संपण्याच्या आत प्रशासनास कळविलेले आहे. त्यामुळे सदर ग्रंथपालांना अटी व शर्ती मान्य केलेल्या आहेत असे म्हणता येणार नाही.

**संदर्भ क्र.४ नुसार-**

दि.१० ऑगस्ट २०१० प्रशासन शाखा जा.न.एसएसएस/वशी ०१/४२६९/२०१० आदेशानुसार साईबाबा कन्या विद्या मंदिर, इंग्लिश मिडियम स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय सदर विनाअनुदानित संस्थेस महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती विनियम अधिनियम १९७७ सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ०३ आणि नियमावली १९८१ नियम लागू आहेत असे सक्षम आदेश मा.कार्यकारी अधिकारी यांचे आहेत. त्यानुसार

(फ) नियम विनियम माध्यमिक शाळा संहिता शासनाने किंवा संचालकाने वेळोवेळी काढलेले आदेश यांच्या तरतुदीचे पालन करणे बंधनकारक आहे.

(ड) नियम विनियम माध्यमिक शाळा संहिता व शासनाने किंवा संचालकाने वेळोवेळी काढलेले आदेश शाळेच्या प्रशासनासंबंधी व्यवस्थापक वर्गाने वेळोवेळी नेमून दिलेले अनुदेश यांच्या तरतुदीचे पालन करणे बंधनकारक आहे. यानुसार उपसंचालकाने शाळेला मान्यता दिलेली आहे.

**संदर्भ क्र.५ नुसार-**

शासन निर्णय क्रमांक एसएसएन/१००७/४१३/०७/माशि-०२, दि.०४ एप्रिल २००८ महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियम १९८१ नुसार शिक्षकेतर कर्मचा-यांची निवड झाल्यानंतर संस्थेने त्यास दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधीसाठी नेमणूक देणे बंधनकारक आहे.

**संदर्भ क्र.६ नुसार-**

संस्थान कर्मचारी आकृतिबंधानुसार शैक्षणिक संकुलाकडील ग्रंथपालांची पदे मंजुर केलेली आहेत. मात्र माध्यमिक शाळे संहितेनुसार माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रंथपालपदे विद्यार्थी संख्येनुसार ठरविले जातात.माध्यमिक शाळा संहितेनुसार १००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्यामागे एक पुर्णवेळ ग्रंथपालाची नेमणूक करता येते.

कन्या विद्या मंदिर, इंग्लिश मिडियम स्कुल व आय.टी.आय.कडील एकुण विद्यार्थी संख्या ३४०० आहे व ज्युनियर कॉलेजकडील विद्यार्थी संख्या १२२२ आहे म्हणून विद्यार्थी संख्येनुसार दोनही विभागाकडील ग्रंथपालांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

ग्रंथपाल हे पद शिक्षकेतर पदात समाविष्ट असल्याने माध्यमिक शाळासंहीतानुसार ग्रंथपालांची अर्हता वेतनश्रेणी व भत्ते, नेमणूक, सेवा पुस्तक, सेवा जेष्ठता, रजा गोपनीय अहवाल माध्यमिक शाळा संहितेतील निकषानुसार आहेत.

यानुसार ग्रंथपालांना दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी देवुन नेमणूक दिनांकापासून पदवीधर वेतनश्रेणी बंधनकारक आहे. तसेच संस्थान आकृतीबंधामध्ये डिप्लोमा अर्हता असलेल्या ग्रंथपालांची वेतनश्रेणी ५२०० व २०२०० व ग्रेड पे २८०० देण्यात आलेली आहे. सदर वेतनश्रेणी ही देण्यात आलेली नाही. मात्र आपण पदवीधर ग्रंथपालांची नेमणूक केलेली आहे. पदवीधर ग्रंथपाल वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० आहे. माध्यमिक शाळा संहितानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनश्रेण्या शासन वेळोवेळी ठरवुन देईल त्याप्रमाणे असते असे नमुद आहे. या नियमानुसार संस्थान आकृतीबंधात ५२००-२०२०० व ग्रेड पे २८०० असतांनाही वरील नियमाने संकुलातील काही शिक्षकांना नियमानुसार वेतनश्रेणी ९३००-३४८०० व ग्रेड पे ४३०० देण्यात आलेली आहे. याप्रमाणे माध्यमिक शाळा संहितेनुसार शिक्षकेतरानाही हेच नियम लागू असल्याने ग्रंथपालांनाही देय होत आहे.

**संदर्भ क्र.७ नुसार-**

**ठराव-०१** दि.१२/०६/२०१४ मा.व्यवस्थापन समिती विषय नं.६७ निर्णय क्र.५१७ यावर सविस्तर चर्चा होवून परिविक्षाधिन कालावधी पूर्ण झाल्याने कायम करणे व विहीत पदाची वेतनश्रेणी मिळणेबाबत शैक्षणिक संकुलाकडील इतरही पदांचा एकत्रित सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा असे ठरले.

**ठराव-०२** दि.२०/११/२०१४ मा.व्यवस्थापन समिती विषय नं.५१७ निर्णय क्र.१००४(ब) यावर सविस्तर चर्चा होवुन संबंधित विभागाचा अभिप्राय विचारात घेता श्री शेजवळ व शिंदे यांचा परिविक्षाधिन कालावधी संपुष्टात आला असल्याने त्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या परिविक्षाधिन कालावधी संपुष्टात येत असलेल्या तारखेपासून सुधारित वेतनश्रेणी ९३००-३४८०० व ग्रेड पे ४३०० देण्यात येवुन ग्रंथपाल या पदावर संस्थान सेवेत कायम करण्यात यावे असे ठरले. मात्र संबंधित विभागाचा अभिप्राय विचारात न घेता निर्णय झालेला आहे. संबंधित विभागाचा अभिप्राय नेमणूक दिनांकापासून देवुन कायम करणे असा होता. सदर निर्णयाची अद्यापही अंमलबजावणी झालेली नाही.

**ठराव-०३** दि.३०/०१/२०१५ मा.व्यवस्थापन समिती विषय नं.२१ निर्णय क्र.२१ शैक्षणिक संकुलातील ग्रंथपालांना पदावर कायम करणे पदाची विहीत वेतनश्रेणी देणेबाबतचा मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २०-११-२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक १००४(ब) मध्ये दुरुस्ती करणेसाठी फेरसादर यावर सविस्तर चर्चा होवुन प्रस्तावित ग्रंथपालांना नेमणूक दिनांकापासून वेतनश्रेणी देणेबाबत सन २००६ चे शासन निर्णयानंतर काही शासन निर्णय प्रकाशित झाले आहेत का यावर पडताळणी करून अभ्यासपूर्वक प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले त्यानंतर खालीलप्रमाणे शासन निर्णय झालेले आहेत.

**संदर्भ क्र.८ नुसार-**

मा.सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांचा निर्णय क्रमांक ९७३२/२०१२, दि.२४ जानेवारी २०१४ रोजी मा.उच्च न्यायालय यांचा निर्णय कायम केलेला आहे. यात पदवीधर ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी नेमणूक दिनांकापासून देणेकामीचा निकाल देण्यात आलेला आहे.

**संदर्भ क्र.९ नुसार-**

मा.उच्च न्यायालय मुंबई यांचा क्रमांक १७७/२०११, दि.२८ एप्रिल २०११ रोजी पदवीधर ग्रंथपाल यांना त्यांच्या नेमणूक दिनांकापासून पदवीधर ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी देणेकामीचानिकाल देण्यात आलेला आहे. दि.२०/०५/२०१५ या अद्ययावत ग्रंथपालांचे पगारपत्रक, दाखला मा.उपसंचालक पुणे यांनी पदवीधर वेतनश्रेणी देण्याबाबतचे आदेश व अनेक जिल्हयातील शिक्षणाधिकारी यांची वेतननिश्चिती झालेल्या सेवापुस्तकातील पानांची झेरॉक्स व मान्यता पत्र जोडलेले आहे.

**संदर्भ क्र.१० नुसार-**

शासन निर्णय क्रमांक एसएसएन/१७०२/(०९/२००२)/माशि/०२ दि.०३ ऑगस्ट २००६ नुसार ग्रंथपाल पदावरील नियुक्ती ही नविन नियुक्ती दोन वर्षाच्या कालावधीसहीत असल्याने ग्रंथपालपदासाठी अनुज्ञेय वेतनश्रेणीच्या किमान वेतनटप्प्यावर संबंधित व्यक्तिची मुळ वेतनश्रेणीवर नियुक्ती होईल या अन्वये महाराष्टातील माध्यमिक शाळेतील एकुण ९२४ ग्रंथपाल यांची पूर्णवेळ नविन नियुक्ती केली आहे.

**संदर्भ क्र.१० नुसार-**

शासन निर्णय क्रमांक एसएसएन/१०००/(८७/२०००)/माशि/०२ दि.०५ डिसेंबर २००६ शालेय शिक्षण क्रिडा विभाग पान नं.३६८ नुसार पूर्णवेळ पदवीधर ग्रंथपालांना सुधारीत वेतनश्रेणी नेमणूक दिनांकापासून देणेबाबतचा शासन निर्णय.

**विभागाचा अभिप्राय स्पष्ट मत-** उपरोक्त प्रस्तावातील नमुद सर्व शासन निर्णय माध्यमिक शाळा संहितानुसार वरील ग्रंथपालांची नेमणूक दि.०१ फेब्रुवारी २०१२ रोजी करण्यात आलेली असून नियमानुसार त्यांचा दोन वर्षाचा कालावधी परिविक्षाधिन कालावधीदि.३१/०१/२०१४ रोजी संपुष्टात आलेला आहे. त्यांना दि.०१ फेब्रुवारी २०१४ पासून संस्थान सेवेत कायम करण्यात यावे तसेच त्यांचे नेमणूक दि.०१/०२/२०१२ पासून पदवीधर ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी ९३००-३४८०० व ग्रेड पे ४३०० देण्यात यावे असे स्पष्ट मत आहे. तथापि शासन मान्य आकृतिबंधातील कलम क्रमांक ०७ प्रमाणे समितीस कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही अशी तरतुद असल्यामुळे शासन मान्य आकृतीबंधातील नमुद रूपये ५२००-२०२०० पे बॅन्ड व ग्रेड पे रूपये २८०० या ऐवजी सुधारीत पदवीधर वेतनश्रेणी ९३००-३४८०० व ग्रेड पे रू. ४३०० याप्रमाणे संबंधितांना नेमणूक दिनांकापासून वेतन देता येईल. त्यास कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा.प्रधान सचिव विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करता येईल असे मत आहे.

तरी नियमानुसार त्यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी दि.३१/०१/२०१४ रोजी संपुष्टात आलेला आहे. त्यांना दि.०१ फेब्रुवारी २०१४ पासून संस्थान सेवेत कायम करण्यात यावे तसेच त्यांचे नेमणूक दि.०१/०२/२०१२ पासून पदवीधर ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी ९३००-३४८०० व ग्रेड पे ४३०० देण्यास मा.त्रिसदस्सीय समितीचे निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, शैक्षणिक संकुलाकडील ग्रथपालांना प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वेतनश्रेणी लागू करणेसाठी त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक असल्यास, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- प्राचार्या, कन्या विद्या मंदिर/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.४७** **श्री साईबाबा संस्थानकडील मोकळया जागेस व जमीनीस कंपाऊंड करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-

कलम (३) पोटकलम (२) नियत दिवशी, पुर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेची स्थावर अशी सर्व मालमत्ता (सर्व मत्ता, हक्क, दायित्वे व बंधने यांसह) या अधिनियमान्वये संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे हस्तांतरीत व निहीत होईल

आणि समितीच्या वतीने कार्यकारी अधिका-यास, त्या दिवसापासून त्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा व तिचे व्यवस्थापन करण्याचा हक्क असेल.

कलम (४) पोटकलम (३) – कार्यकारी अधिकारी, कलम ३ अन्वये संस्थान विश्वस्तव्यवस्थेत विहीत केलेल्या संपूर्ण स्थावर मालमत्तेची, प्रत्येक मालमत्तेचे तपशिलवार वर्णन व अदमासे किंमत दर्शविणारी सूची तयार करील आणि तिची प्रत, नियत दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत धर्मादाय आयुक्त आणि प्रधान सचिव व विधी व न्याय विभाग यांच्याकडे सादर करील. मालमत्तांची मुळ सूची संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यालयामध्ये कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्यात येईल.

कलम १७ चा खंड (झ) – सर्वसाधारणपणे,विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

**प्रस्तावना-** संस्थानकडील अचल मालमत्तेसाठी स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विधी विभागामार्फत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.९८६ नुसार व उपरोक्त संदर्भीय दि.१९/११/२०१४ रोजीचे आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करणेत आलेला आहे.

**प्रस्ताव-** दि.०६/१०/२०१५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी संस्थानचे मोकळया जागेस व जमीनीस कंपाऊंड करणेबाबत सुचना केलेल्या आहेत.

संस्थान मालकीच्या जमीनींची गावनिहाय माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | गावाचे नाव | एकुण क्षेत्रफळ<br>हे.-आर-चौ.मी |
|---|---|---|
| ०१ | शिर्डी | ३७-१४-६९.४८ |
| ०२ | निमगाव को-हाळे | ५१-१९-०० |
| ०३ | कनकुरी | ०५-३२-१६ |
| ०४ | रुई | ०७-३२-०० |
| ०५ | को-हाळे | १-६२-०० |
| ०६ | पांगरी बु. | ००-२०-०० |
| ०७ | पांढुर्ली | ००-४९-०० |
| ०८ | मुसळगाव (सिन्नर) | ००-३६-०० |
| ०९ | घारी | ००-०१-०० |
| १० | मुंबई, दादर | १०७८.५४ चौ.मी. |
| | एकूण | १०३-६६-८५.४८ (अंदाजे २५९ एकर) |

तरी याकामी बांधकाम विभागामार्फत संस्थान मालकीच्या इमारती, मोकळया जागा व जमीन इ. बाबींचा सर्व्हे करुन याकामी येणा-या एकुण खर्चास तत्वतः मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४१८** **यावर सविसतर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानकडील मोकळया जागेस व जमीनीस कंपाऊंड करणेसाठी या क्षेत्रांचा सर्व्हे करणेत येऊन, अंदाजीत खर्चासह सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.४८** **श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे सन २०१५-२०१६ या कालावधीत वार्षिक कॉन्ट्रक्ट देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१).मंदिर परीसर,०२).साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३).श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर,०४). नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय, ०५).श्री साई प्रसादालय,०६). साईआश्रम भाग-०१,०७). साईआश्रम भाग-०२,०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). रथपालखी जनरेटर या वेगवेगळया ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा पुरवठा काही कारणास्तव वेळोवेळी खंडीत होतो. मोठे दुरुस्तीचे कामे चालू असल्यास २४ तास देखील वीजपुरवठा खंडीत केला जातो. अशा काळात संस्थानचे कामकाज सुरळीत चालावे. गर्दीत अंधारात काही अनुचीत घटना घडू नये म्हणून पर्यायी वीजपुरवठयासाठी ठिकठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहे. हे सर्व जनरेटर सुस्थितीत कार्यान्वित असणे गरजेचे आहे. त्याकरीता यासर्व जनरेटरची काही ठरावीक कालावधीत इंजिन आईल, डिझेल फिल्टर, ऑईल फिल्टर, बायपास फिल्टर, कुलंट फिल्टर बदली करुन बी चेक सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. तसेच काही फॉल्ट झाल्यास तातडीने दुरुस्त करुन जनरेटर कार्यान्वित करणे गरजेचे असते. ऑईल फिल्टर व इतर मटेरीअल हे जनरेटर उत्पादक कंपनीचे वापरणे फायदेशिर असते. हे सर्व मटेरीअल आपल्याकडे उपलब्ध नसते. म्हणून जनरेटर इंजिनची सर्व्हिसिंग हे जनरेटर इंजिन उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हिस सेंटर यांचेकडून करुन घेणे गरजेचे असते.

त्यानुसार मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना दि.१-१०-२०१४ ते दि.३०-०९-२०१५ या कालावधीकरीता श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा संस्थान जा.नं.एसएसएस/ विद्युत/ ३१५८/ २०१४ दि.३०-०९-२०१४ अन्वये रक्कम रु.३३,००,०००/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता. मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे मे.कमिन्स यांचे अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्याकरीता एकमेव कंपनी मान्यताप्राप्त अधिकृत सर्व्हीस सर्व्हिस डिलर आहेत. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व जनसेट सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.३०-०९-२०१५ रोजी संपत आहे. सदरील सर्व जनसेट नेहमी कार्यान्वित राहावे म्हणून वेळोवेळी सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनरेटरसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे आहे.

**मागणी-** आता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१). मंदिर परीसर, ०२). साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३). श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर, ०४). नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय, ०५). श्री साई प्रसादालय, ०६). साईआश्रम भाग-०१, ०७). साईआश्रम भाग-०२, ०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). रथपालखी जनरेटर या वेगवेगळया परीसरातील जनरेटरसेटच्या इंजिनचे सन २०१५-२०१६या वर्षाकरीता या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी जनरेटसेट तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | जनरेटसेट ठिकाण | जनसेट क्षमता | ईएसएन क्र. | मॉडेल क्र. | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साई मंदिर परीसर (नविन) | ५०० केव्हीए | २५२६०००३ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०२) | श्री साई मंदिर परीसर (जुना) | ५०० केव्हीए | २५१६७८०९ | व्हीटीए-१७१०-जी. | ०१ नग. |
| ०३) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | ५०० केव्हीए | २५२४२३१७ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०४) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | १०० केव्हीए | २५१८७२९६ | एनटी-४९५-जी. | ०१ नग. |
| ०५) | श्री साईबाबा हॉस्पीटल | १०१० केव्हीए | २५३६५८०५ | केटीए-३८-जी-५ | ०१ नग. |
| ०६) | श्री साईबाबा हॉस्पीटल | ५०० केव्हीए | २५३५०२८१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| ०७) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९०८५ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ०८) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९२८५ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ०९) | श्री साई प्रसादालय | ५०० केव्हीए | २५३२०२७१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १०) | श्री साई प्रसादालय | २५० केव्हीए | २५२४९०८७ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ११) | साईआश्रम भाग-०१ | ५०० केव्हीए | २५३६९१६६ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १२) | साईआश्रम भाग-०१ | ५०० केव्हीए | २५३६७६०४ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १३) | साईआश्रम भाग-०२ | ५०० केव्हीए | २५३५०९७० | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १४) | साईआश्रम भाग-०२ | ५०० केव्हीए | २५३०९०२८ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १५) | साईआश्रम भाग-०१ ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५७ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |
| १६) | साईआश्रम भाग-०१ ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५८ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |
| १७) | पाणीपुरवठा साठवण तलाव | २५० केव्हीए | २५७६९५२९ | ६ सीटीएए.३-६४ | ०१ नग. |
| १८) | पाणीपुरवठा साठवण तलाव | १०० केव्हीए | २५१५४५१४ | एनटीए-४९५-जी | ०१ नग. |
| १९) | रथपालखी (सिंगल फेज) | १५ केव्हीए | ३०९७४ | F1-7G1 | ०१ नग. |

उपरोक्तप्रमाणे यादीतील दोन जनरेटरसेटचा वापर कमी झाल्यामुळे श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०१५-२०१६ साठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ३०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीस लाख) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. तसेच दिनांक ०७-०८-२०१४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत आयत्या वेळेचा विषय नं.०१ निर्णय क्र.६७६ अन्वये पुर्वीच्या व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेल्या व मा.खंडपीठाची मान्यता असणा-या सर्व खर्चा व्यतिरिक्त साईभक्तांना, रुग्णांना सेवा देण्यात येत असलेल्या सोयी-सुविधा करीता आवश्यक असणा-या सर्व सेवांसाठी लागणारी सर्व मशिनरी/ उपकरणे व तत्सम यांत्रिक सर्व बाबी यांची AMC, CAMC, इतर दुरुस्ती यासाठी येणारा खर्च तसेच मालमत्ता कर, रेग्युलर टॅक्सेस, कायदेशिर जबाबदारीने भरावयाच्या रक्कमा यांसारखे रक्कम रु. १ कोटी पर्यंतचे खर्च मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेनुसार वगळणेत यावेत असा निर्णय झालेला आहे.

तथापी श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१५-२०१६ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेसाठी तसेच सदरहु खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.४९** **मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा संस्थानचे पॅनलवर अॅडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी नियमावलीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** १) श्री संजय भास्कर काळे यांनी मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांना अॅडव्होकेट श्री संजय आर. चौकीदार यांची औरंगाबाद खंडपीठात साईबाबा संस्थानचे वकील म्हणून झालेली नियुक्ती बेकायदा असल्याने

रद्द व्हावी अशा आशयाचे दि. १६/०६/२०१३ रोजीचे पत्राची झेरॉक्स प्रत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे मार्फत संस्थानला प्राप्त झाली. त्यामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वसतव्यवस्था, शिर्डीचे मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे अॅडव्होकेट पॅनलवर नेमणूक केलेल्या अॅडव्होकेट्सबाबत माहिती सदर पत्रात नमुद केली असून अॅडव्होकेट श्री संजय आर. चौकीदार यांची नियुक्ती मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०६/०९/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७९९ अन्वये केलेली आहे. त्यांचेकडे मा. उच्च न्यायालयाचे दि. १३/०३/२०१२ व दि. १६/१०/२०१२ रोजीचे आदेशास अनुसरुन मोठ्या रक्कमेचे खर्चास मान्यता मिळणेबाबतचे सिव्हील अर्ज मा. उच्च न्यायालयात दाखल केले आहे, करण्यात येत आहे. तसेच नव्याने दाखल झालेल्या रिट पिटीशनचे संदर्भातील काम त्यांना दिलेले आहेत. संस्थानचे पॅनल वरिल अॅडव्होकेट नेमणूक करतांना अॅडव्होकेट नियुक्तीसाठी प्रक्रिया राबविणेत आली नाही, पालक न्यायाधिशांना खुश ठेवणेसाठी, झालेली नियुक्ती रद्द करावी, परिक्षेव्दारे अॅडव्होकेटची नियुक्ती व्हावी, सरकारी अॅडव्होकेटव्दारे संस्थानचे कामकाज पहाणेत यावे अशी विनंती श्री संजय भास्कर काळे यांनी केलेली आहे.

२) प्रस्तुतचे पत्रावर मा. त्रिसदस्य समितीचे दि. २८/०८/२०१४ रोजीचे सभेत विषय सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ७११ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली, पुर्वी मा.उच्च न्यायालयामध्ये फारशी प्रकरणे दाखल होत नसत, त्यामुळे वकील नेमणूकीबाबत विशिष्ट अशी निवड प्रक्रिया राबवली जात नव्हती, कुठलीही निवड प्रक्रिया न राबवता वकील नेमले गेलेले आहेत, असे निदर्शनास येते. त्यामुळे मा. उच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने कामकाज पहाण्यासाठी वकीलांच्या नेमणूकासंबंधीची निवड प्रक्रिया फेरविचारासाठी ठेवणेत यावी. यापुढे अशा वकीलांची नेमणूक ही तदर्थ Ad-Hoc अशी करावी व या वकिलांविषयी आक्षेपार्ह गोष्टी आढळून आल्यास त्यांची नेमणूक / वकिलपत्र समिती केव्हाही रद्द करु शकेल, असा अधिकार संस्थानने राखून ठेवावा. मा. उच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने काम पहाण्याकरिता वकीलांचे पॅनल तयार करणेसाठी नियमावली तयार करुन योग्य असा सविस्तर प्रस्तावसमिती समोर सादर करणेत यावा, असे ठरले."

प्रस्तुतचे निर्णयास अनुसरुन विधी विभागाने जा.नं. एसएसएस/ विशी-विधी/ ४९९३/२०१५ दि.१२/०१/२०१५ रोजी अॅडव्होकेट श्री आर. एस. जपे, कोपरगांव यांना संस्थानचे वतीने कामकाज पहाण्याकरीता अॅडव्होकेट पॅनल तयार करणेसाठी विधी विभागामार्फत तयार केलेली नियमावली तपासून आवश्यक ते नियम समाविष्ट करुन देणेस विनंती केलेली होती. त्यांनी दि. १६/०१/२०१५ रोजीचे पत्राने नियमावली तयार केली आहे. ( आवक क्र. ०२००४२) ती सोबत परिशिष्ट अ म्हणून जोडली आहे.

मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने काम पहाण्याकरिता अॅडव्होकेटचे पॅनल तयार करतांनाच अॅडव्होकेटला अदा करावयाचे फी बाबत धोरण ठरविणेची आवश्यकता आहे. करीता महाराष्ट्र शासनाचे Revision of fees and Allowances payable to the Law Officers and Panel Counsel in the State of Maharashtra Government Resolution No: Meeting -2011/ (249)/D-14 Date : 15/02/2015चे ठरावा मधील स्टेटमेंट C,D, G नुसार अॅडव्होकेट फी अदा करता येईल, तसेच एखाद्या केस मध्ये विशेष बाब म्हणून मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेवून वकील फी अदा करता येईल.

तरी सोबतचे परिशिष्ट अ प्रमाणे मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे श्री साईबाबा संस्थानचेपॅनलवर अॅडव्होकेट नियुक्ती करणेकामी तयार केलेल्या नियमावलीस व अदा करावयाचा अॅडव्होकेट फी प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**(परिशिष्ट- अ)**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे पॅनलवर अॅडव्होकेट नेमणूक नियमावली.**

१) कायदा सल्लागार म्हणून नेमण्यात येणारे अॅडव्होकेट हे मान्यता प्राप्त विद्यापीठाचा, किंवा कोणत्याही शाखेचा पदविधर असावा. व कायद्याची एल.एल.बी. पदवी किंवा पदवित्तर एल.एल.एम. अशी शैक्षणीक पात्रता प्राप्त केलेली असावी व पदवी धारण केलेनंतर तालुका कोर्ट, जिल्हा कोर्ट मध्ये १० वर्ष किंवा मा. उच्च न्यायालयात किमान ७ वर्षाचा वकीली व्यवसायाचा अनुभव असावा किंवा माजी न्यायाधिश असावा तसेच वरील क्षेत्रात स्टॅडींग अॅक्टीव्ह प्रॅक्टीशनर म्हणून कार्यरत असावा तसेच मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० चे कायद्याची माहिती असावी व त्यात स्टॅन्डींग प्रॅक्टीसचे ज्ञान असावे तसेच श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट अॅक्ट २००४ ची माहिती असावी.

२) किमान वयोमर्यादा ३५ वर्ष असावी, संस्थानचे कायदेविषयक कामकाज पहाणेसाठी संस्थानला कोणतेही सिनीयर अॅडव्होकेटची थेट नेमणूक करता येईल.

३) संस्थान पॅनलवरील अॅडवहोकेटना संस्थानचे वकिल कायदेशीर सल्लागार म्हणून राहाता, कोपरगांव, अहमदनगर, येथील कामकाजामध्ये वेळ प्रसंगी संस्थानला मार्गदर्शन करावे लागेल. औरंगाबाद, मुंबई व सुप्रिम कोर्ट दिल्ली येथील कामकाजाबाबत सर्वोच्च न्यायालयात माहिती देणे, वकीलांना कागदपत्र व ब्रिफींग करणे वगैरे काम करावे लागेल.

४) श्री साईबाबा संस्थानचे पॅनलवर नेमलेल्या अॅडव्होकेट ची फी त्यांच्या दर्जा नुसार महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या जी.आर. (Government Resolution) प्रमाणे विहीत दराने व मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने अदा केली जाईल.

५) संस्थानचे पॅनलवर कायदा सल्लागार म्हणून नेमणूक केलेल्या अॅडव्होकेटला अॅडव्होकेट फी व अनुषंगीक खर्चा व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

६) संस्थानचे पॅनलवर नेमणूक केलेल्या अॅडव्होकेटची/ कायदा सल्लागाराची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांचा कालावधी नेमणूक तारखेपासून ३ वर्षाचा राहील. संस्थान पॅनलवर नेमलेल्या अॅडव्होकेटला संस्थान सेवेत नोकरीवर हक्क सांगता येणार नाही व तो राहणार नाही.

७) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे पॅनलवर अॅडव्होकेटची (वकिलांची) नियुक्ती करतांना वर्तमान पत्रातुन जाहीरात देऊन व मुलाखतीव्दारे करावी.

८) अ) मा. उच्च न्यायालय मुंबई येथे -५ अॅडव्होकेट.
ब) मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे -५ अॅडव्होकेट.
क) मा.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन कोपरगांव येथे -५ अॅडव्होकेट.
ड) मा.सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन राहाता येथे-५ अॅडव्होकेट याप्रमाणे अॅडव्होकेटची नेमणूक करावी.

९) जाहिराती नुसार प्राप्त झालेले अर्ज छाननी करुन पात्र अर्जदाराची मुलाखतीव्दारे नेमणूक करावी.

१०) पात्र उमेदवारांची मुलाखत (Interview) संस्थानचे मा.अध्यक्ष व विश्वस्त सदस्यांमार्फत घेतली जाईल व त्यानंतर पात्र उमेदवारांना नेमणूक पत्र दिले जाईल.

११) संस्थानचे पॅनलवर नेमणूक केलेल्या अॅडव्होकेटबाबत काही आक्षेपार्ह गोष्टी आढळून आल्यास त्यांची संस्थान अॅडव्होकेट/ कायदा सल्लागार नेमणूक/ वकिलपत्र केव्हाही रद्द करणेचे अधिकार संस्थानने राखून ठेवलेले आहेत.

१२) मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात काम पहाणा-या अॅडवहेकेट ने सामान्यपणे आकलन होईल अशी सर्व माहिती व सल्ला संस्थानला व स्थानिक संबंधीत पॅनलवरील अॅडवहेकेटला द्यावी लागेल म्हणजे कार्यवाही कामी अचुकता येईल.

१३) संस्थान पॅनलवर नेमणूक केलेला अॅडव्होकेट साईबाबांचा भक्त असावा.

१४) संस्थान पॅनलवर नेमणूक केलेल्या अॅडव्होकेटची नेमणूक कोणतेही कारण न देता रद्द करण्यांचा अधिकार संस्थानला राहील व तशी नेमणूक रद्द केल्यावर संबंधीत वकीलाने काम न पहाणे व सुपूर्त केलेले कागदपत्र संस्थानला परत देणे बंधनकारक राहीत.

**निर्णय क्र.४२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान संबंधीत केसेस चालू असलेल्या विविध मा.न्यायालयांमध्ये पुर्वीच्या व्यवस्थापन समितीने वेळोवेळी मंजुर केलेल्या ठरावांनुसार नेमणूक करण्यात आलेले अॅडव्होकेटस् संस्थानच्या पॅनेलवर ठेवणेत येऊन, यापुढे आवश्यक त्या सर्व मा.न्यायालयांमध्ये श्री साईबाबा संस्थानचे वतीने काम पहाणेसाठी संस्थान अॅडव्होकेट पॅनलवर, अॅडव्होकेट म्हणून नियुक्ती करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत येऊन, त्या नियमावलीस मान्यता देण्यात आली.**

**अ.नं.०४ मध्ये- श्री साईबाबा संस्थानचे पॅनलवर नेमलेल्या अॅडव्होकेट ची फी त्यांच्या Seniority/ अनुभवानुसार महाराष्ट्र-गोवा बार कौन्सीलने वेळोवेळी लागू केलेल्या वकील फी प्रमाणे रक्कम अदा करणेत येईल. परंतु अॅडव्होकेटने बार कौन्सीलच्या नियमापेक्षा जास्त फीची मागणी केल्यास, सदर जास्तीची फी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने अदा केली जाईल.**

**अ.नं.०६ मध्ये- "संस्थानचे पॅनलवर नेमणूक केलेल्या अॅडव्होकेटची/ कायदा सल्लागाराची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असून सर्व अॅडव्होकेटस् चा कालावधी नेमणूक तारखेपासून ते पुढील आदेश होईपर्यंत राहील. तसेच संस्थान पॅनलवर नेमलेल्या अॅडव्होकेटला संस्थान सेवेत नोकरीवर हक्क सांगता येणार नाही व तो राहणार नाही."**

**अ.नं.०८ मध्ये- पॅनलवरील अॅडव्होकेटस् च्या संख्येचे बंधन राहणार नाही.**

**उपरोक्त नियमावलीस अनुसरुन अॅडव्होकेटसची नियुक्ती करणेसाठी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी व जाहिरातीद्वारे येणा-या अर्जदारांच्या मुलाखती घेण्यात येऊन, पात्र अर्जदारांना नियुक्ती देण्यात यावी, असे ठरले. तसेच या प्रकियेसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.५०** **शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी श्री साई पोलीस विश्रामगृह यांचे नळ कनेक्शन मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांचे दि. ०४/०९/२०१५ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले असून, त्यामध्ये त्यांनी श्री साई पोलीस विश्रामगृह, शिर्डी हे चालु करावयाचे असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत विश्रामगृहास नळजोडणी करुन मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

सद्यस्थितीत संस्थानकरीता शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजनेच्या मौजे कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातुन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सन १९९५ पासून सदरची पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेत आलेली आहे. या ठिकाणी पाणी साठविणेसाठी तीन साठवण तलावांची निर्मिती करण्यात आलेली असून, त्यांची साठवण क्षमता ३३२ एम.एल. इतकी आहे.

सदर साठवण तलावात नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन गोदावरी/ दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन देण्यात येत आहे. याबाबत नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन ५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणी साठा मंजुर आहे.

सदरचे योजनतून मौजे कनकुरी, पिंपळवाडी या गावांसह संस्थान परिसर, श्री साईप्रसादाल, विविध भक्तनिवासस्थाने, शैक्षणिक संकुले यासह कर्मचारी वसाहती, नव्याने झालेले साईआश्रम प्रकल्प भाग ०१ व भाग ०२ तसेच ०३ कर्मचारी हौसिंग सोसायटी, शिर्डी पोलीस स्टेशन, या ठिकाणी पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सद्यस्थितीत संस्थानचा

दैनंदिन पाणी वापर हा अंदाजे सरासरी ४५ लाख लिटर्स ते ५० लाख लिटर्स इतका झालेला आहे. गर्दीचे कालावधी सदरचा पाणी वापर हा यापेक्षाही जास्त होत आहे. संस्थानची वाढता व्याप लक्षात घेता, कनकुरी साठवण तलाव येथुन होणारा पाणी पुरवठा कमी पडत आहे. तसेच कनकुरी साठवण तलाव ते ओहर हेड टँक, ५०० रुम, व्दारावती, श्री साईप्रसादालय, श्री साईप्रसाद इमारत व रुग्णालय या ठिकाणी पाणी पुरवठा करणारी मेन पाईपलाईन कालबाहय झालेली आहे. सदर पाईपलाईनव्दारे पुर्ण दाबाने पाणी पुरवठा करावयाचा झाल्यास ती ठिकठिकाणी लिकेज होते. सदर पाईपलाईनव्दारे पुर्ण दाबाने पाणी पुरवठा करणे शक्य होत नसल्याने संस्थान परिसर व इतर ठिकाणी कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे.

संस्थान पाणी योजनेतून मिळणारे पाणी कमी पडत असल्याने संस्थानचे मौजे कनकुरी येथील परिसरातील श्री सचिन औताडे, श्री रायभान मारुती डांगे व श्री राजेंद्र सोपान जगताप यांचे खाजगी विहीरी व सायफनव्दारे संस्थानकरीता वर्षभर पाणी पुरवठा जोडुन घेवून साईभक्तांसाठी पाणी पुरवावे लागत आहे.

वाढीव शिर्डी संस्थान, पिंपळवाडी व कनकुरी संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई यांना मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहेत. तसेच या योजनेची किंमत रु.१९६.९३ कोटी व पाणी आरक्षण प्रकल्प खर्चाचा प्रमाणशिर वाटा रु.१८३.९३ कोटी याप्रमाणे एकुण रु.३८०.८६ कोटी इतका निधी संस्थानकडुन उपलब्ध करणेबाबत मा.व्यवस्थापन समिति सभेतील निर्णयानुसार सदरचा विषय मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

वरील नमुद परिस्थितीती विचारात घेता, संस्थानची पणी साठवण व पाणी शुध्दीकरण क्षमता ही कमी पडत असल्याने सद्यस्थितीत तेथुन उपलब्ध होणारे पाणी संस्थानचा वाढता व्याप व वाढती साईभक्तांची गर्दी याकरीता पाणी पुरवठा करणे जिकरीचे झालेले आहे. यामुळे खाजगी व्यक्तिंचे विहीरी व सायफनव्दारे पाणी पुरवठा जोडुन घेवून साईभक्तांचे वापरासाठी पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

यापुर्वी मा.वरिष्ठ विभागीय अभियंता, मध्य रेल्वे सोलापुर विभाग, अहमदनगर कार्यालय यांचेकडुन शिर्डी रेल्वे स्टेशन शिर्डी करीता, कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग शिर्डी यांनी वीज उपकेंद्र शिर्डी करीता, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, बसस्थानक शिर्डी करीता वेळोवेळी संस्थानकडुन पाणी नळ कनेक्शन जोडणी करुन मिळणेबाबत मागणी केलेली आहे. परंतू संस्थान साठवण तलावातील पाणी उपलब्धता व संस्थानची वाढती पाण्याची गरज लक्षात घेता, त्यांची मागणी अमान्य करण्यात येवून त्यांना शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडुन पाणी नळ कनेक्शन जोडुन घेणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

शिर्डी पोलीस स्टेशन शिर्डी यांना संस्थानकडुन यापुर्वीच माहे एप्रिल २००३ पासून १" पाईपलाईन कनेक्शनव्दारे दररोज ०२ तास याप्रमाणे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांनी यापुर्वी त्यांचेकडील जा.क्रं.३३३८/२०१३, दि.०७/१०/२०१३, जा.कं.३३८१/२०१३, दि.०९/१०/२०१३ व जा.क्रं.३५४४/ २०१३, दि.२२/१०/२०१३ रोजीचे पत्रान्वये अतिरिक्त नळ कनेक्शन जोडुन देणेबाबत मागणी केलेली होती. याबाबत पाणी पुरवठा विभागाकडील दि. २६/१०/२०१३ रोजीचे प्रस्तावानुसार त्यांची मागणी अमान्य करण्यात आलेली आहे.

शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांचेकडील दि. ०४/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये त्यांनी मागणी केल्याप्रमाणे श्री साई पोलीस विश्रामगृह, शिर्डी करीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत विश्रामगृहास नळजोडणी करुन देणे सद्यस्थितीतील संस्थान साठवण तलावातील पाणी उपलब्धता व संस्थानची वाढती पाण्याची गरज लक्षात घेता अतिरिक्त नळ कनेक्शन जोडुन देणे शक्य नाही. याबाबत त्यांना शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडे पाणी मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत कळविता येईल. असे नम्र मत आहे.

तरी याबाबत योग्य तो आदेश होणेसाठी सविनय सादर.

निर्णय क्र.४२१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सद्यस्थितीत पाण्याची कमतरता असली तरीही सहकार्याच्या भावनेतून श्री साई पोलीस विश्रामगृह, शिर्डी यांना अतिरिक्त नळ कनेक्शन जोडुन देणेस मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू प्रस्ताव विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

विषय नं.५१ **शिर्डी शहरातील रस्त्यांच्या कडेला शोभेची झाडे लावणेबाबत.**

प्रस्ताव- स्वच्छ शिर्डी अभियान अंतर्गत ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डी यांचा आवक नं.13917 दि.10/10/2015 रोजी प्रस्ताव आलेला आहे. सदर प्रस्तावात शिर्डी शहरातील एकुण 20 रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपन व सौदर्यीकरण करणेकामी श्री साईबाबा संस्थानने सहकार्य करावे असे कळविलेले आहे. सदर रस्त्यांच्या कडेला 3,732 नग शोभेची झाडे यामध्ये निंब, पिंपळ, बोगनवेल व रॉयलपाम, डेडपाम वैगरे लावुन सौदर्यीकरण करणेसाठी रु.62,47,920/- (बासष्ठ लाख सत्तेचाळीस हजार नऊशे विस) मात्र तसेच या झाडांची एक वर्षाचा देखभाल व संगोपन खर्च रु.55,98,000/- (पंचावन्न लाख अठ्यान्नव हजार) येणार असलेबाबत कळविलेले आहे.

दि.27/08/2015 गुरुवार, रोजी मा. जिल्हा अधिकारी श्री अनिल कवडे, यांच्या हस्ते नांदुर्खी रोडला झाडे लावण्याचा शुभारंभ झाला. सदरचे वृक्षारोपन शिर्डीतील स्वयंसेवा संघटना व द्वारकामाई प्रतिष्ठाण यांच्या वतीने घेण्यात आले. यासाठी दिल्ली येथील साईभक्ताने मोठा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यानंतर शिर्डीतील ग्रामस्थाच्या उपस्थितीमध्ये नांदुर्खी- रिंग रोड या ठिकाणी सभा घेण्यात आली. सदर सभेत शिर्डी गावातील नगरसेवकांनी आपआपल्या वार्डामधील रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करणार आहे. व उर्वरीत रस्त्याच्या कडेला भाजपाकडुन वृक्षारोपण करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक गावकरी एक झाड देणार असलेबाबत यावेळी नगरसेवकांनी घोषीत केलेले आहे.

तरी सदर प्रस्तावामध्ये, शिर्डी शहरातील वृक्ष व वृक्षरोपनासाठी आणि सौदर्यीकरणासाठी आवश्यक साहित्य श्री साईबाबा संस्थानने पुरवावे, तसेच सर्व रस्त्यांवर वृक्षारोपनासाठी आवश्यक त्या प्रशिक्षीत मजुरांच्या खर्चाची व्यवस्था करावी, संस्थानने सदर वृक्षांच्या पालकत्वाची व संगोपनाची जबाबदारी स्विकारावी, वृक्षारोपन व सौदर्यीकरणाचे काम संस्थानच्या

सहकार्याने ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डी यांच्या माध्यमातुन व्हावे.वृक्षारोपन करणेसाठी आवश्यक त्या शासकिय,निमशासकिय परवानगी घेण्यासाठी संस्थानने ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डीला सहकार्य करावे. तसेच श्री साईबाबा संस्थान परिसरात,रुग्नालय परिसरात,भक्तनीवास परिसरात वृक्ष लागवड करुन स्वच्छता व सौदर्यीकरण करणे. अशा प्रकारे ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डी यांनी वरिल सर्व अपेक्षा संस्थानमार्फत पुर्ण होणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी रस्त्याचे वृक्षारोपन व सौदर्यीकरणाच्या आलेल्या प्रस्तावात, रोपे खरेदी, खड्डे, खते, औषधे यासाठी लागणारा, (वृक्षारोपन व या झाडांचा एका वर्षाचा देखभाल व संगोपन खर्च) असा एकुण रु. 1,18,45,920/- (एक कोटी अठरा लाख पंचेचाळीस हजार नऊशे विस) एवढा खर्च संस्थानने संबंधीत नर्सरी व ठेकेदार यांना करावा असा प्रस्ताव स्वच्छ शिर्डी अभियान मार्फत संस्थानला प्राप्त झालेला आहे. वृक्षारोपन करुन घेण्याची जबाबदारी अभियान मार्फत करुन घेणार आहे. प्रस्तावात दर्शविणेत आलेली रक्कम प्रस्ताव मंजुर झाल्यास त्यांना प्रत्यक्षात झालेल्या कामाचे मुल्यमापन करुन त्यांना टप्या-टप्याने रक्कम अदा करावयाची आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४२२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील रस्त्यांच्या कडेला शोभेची झाडे लावणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची व मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात येऊन पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.५२ श्री साईबाबा हॉस्पिटल येथील ०३ लिफ्ट तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५००) येथील ०४ लिफ्ट अशा एकूण ०७ लिफ्ट बायबॅकचे शासन मान्यतेबाबत व बील अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाचे जुन्या इमारतीच्या नुतनीकरणासह नविन इमारत ही तळघर + दोन मजले अशी चार मजली बांधण्याचे ठरलेले होते. त्यामुळे रुग्णांना वरील मजल्यावर ने-आण करणेसाठी एक स्ट्रेचर लिफ्ट बसविणेचे नियोजन होते. त्यासाठी बांधकामामध्ये व्यवस्था करणेत आलेली होती. त्यामुळे बांधकाम विभागामार्फत सादर झालेल्या प्रस्तावानुसार रुग्णालयामध्ये 1 लिफ्ट आणि साईबाबा भक्तनिवासस्थान (500 रुम) इमारतीत 4 अश एकूण 5 ठिकाणी मॅन्युअल डोअर लिफ्ट बसविणेकामी नामांकित उत्पादकाकडून निविदा मागविणेस व सदर कामासाठी येणा-या योग्य त्या खर्चास दिनांक 21/10/2014 रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.47 अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार बांधकाम विभागाकडून नामांकित उत्पादकाकडून रजिस्टर्ड पोस्ट ए.डी. व्दारे कोटेशन मागविणेत आले होते.

यानुसार मे. पॉवरलिंक इंजिनिअर्स, नाशिक व मे. कोने इलेव्हेटर्स (इं) प्रा. लि., पुणे या दोन कंपन्याकडून प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत दिनांक 27/12/2004 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा झाली. त्यावेळी मा. विश्वस्त डॉ. तिवारी यांचे सूचनेनुसार रुग्णालयात अजुन दोन लिफ्ट बसविणेचे ठरलेमुळे उपरोक्त कंपन्याकडून प्राप्त झालेले दोन कोटेशन्स रद्द करुन रुग्णालय तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (500 रुम) करीता एकूण 7 लिफ्ट खरेदीकामी एकत्रित निविदा मागविणेत यावे, असे ठरले.

त्यानुसार बांधकाम विभागाकडून पुन्हा एकदा वर्तमानपत्रात निविदा सुचना देऊन प्राप्त झालेल्या निविदा दिनांक 29/01/2005 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेत येऊन विषय नं. 8, निर्णय क्र. 9 अन्वये मे. थायसेनकृप इलव्हेटर यांचे दर स्विकारणेत येऊन त्यांचे लिफ्ट खरेदी करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार बांधकाम विभागाकडून जा.नं. एसएसएसटी/वशी-बांधकाम/2757/2005 दिनांक 14/03/2005 अन्वये मे.थायसेनकृप इलव्हेटर, पुणे यांना रुग्णालयाकरीता 3 तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (500 रुम) येथे 4 अशा एकूण 7 लिफ्ट बसविणेचा कार्यदेश देण्यात आला. तसेच दिनांक 23/12/2005 रोजी बांधकाम विभागामार्फत मे. थायसेनकृप इलव्हेटर, पुणे यांचेशी सदर कामाचा करारनामा करणे आलेला होता. त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पीटल येथे 3 लिफ्ट तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (500 रुम) येथे 4 लिफ्ट अशा एकूण 7 लिफ्ट मे.थायसेनकृप इलव्हेटर, पुणे यांचेमार्फत बसविण्यात आल्या. बांधकाम विभागामार्फत मे. थायसेनकृप इलव्हेटर, पुणे यांना श्री साईबाबा हॉस्पीटल येथील 3 लिफ्टसाठी रक्कम रुपये 19,08,000/- तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (55 रुम) येथील 4 लिफ्टसाठी रक्कम रु.19,88,000/- याप्रमाणे एकूण 7 लिफ्टकरीता रु.38,96,000/- इतक्या रकमेचा कार्यदेश देण्यात आलेला होता.

मे. थायसेनकृप कंपनीने बसविलेल्या लिफ्ट वारंवार नादुरुस्त होऊन बंद पडत असल्याने एकूण बीलांचे रकमेपैकी रुपये 8,30,800/- इतकी जप्त केलेली रक्कम डिपॉझिट खाली संस्थानकडे जमा आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (500 रुम) येथे त्यावेळी वापरात असलेल्या थायसेनकृप कंपनीने बसविलेल्या 7 लिफ्ट वारंवार नादुरुस्त होत असल्याने सदरच्या लिफ्ट ओटीस कंपनीस बायबॅक देऊन नविन ओटीस कंपनीच्या स्वयंचलित लिफ्ट बसविणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 04/07/2010 रोजीचे सभेतील आयत्या वेळच्या विषय नं. 5 निर्णय क्र. 611(2) अन्वये मा. विश्वस्तांनी सभेत मांडलेल्या सुचनेनुसार निर्णय घेण्यात आलेला होता. हा प्रस्ताव विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेला नव्हता. शिवाय या ठरावात कुठेही बायबॅकसाठी शासनाची मान्यता घेण्यात यावी असा उल्लेख केलेला नाही.

त्यानुसार विद्युत विभागामार्फत मे. ओटीस कंपनी यांचेकडून कोटेशन मागविणेत आले होते. ओटीस कंपनी यांचेकडून सादर करणेत आलेल्या कोटेशनच्या तपशीलामध्ये सदरच्या लिफ्ट ॲटोमॅटीक करणे शक्य होणार नाही तसेच मे. थायसेनकृप कंपनीने बसविलेल्या लिफ्ट ओटीस कंपनी बायबॅक घेणार नाही. त्याचप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलच्या लिफ्टच्या कॅबीनमध्ये कोणताही बदल करणार नसल्याचे कळविलेले होते. ओटीस कंपनी यांनी श्री साईबाबा हॉस्पीटलमधील थायसेनकृप कंपनीच्या 3 लिफ्ट बायबॅक न घेता फक्त या 3 लिफ्टचे मशीन व पॅनेल बदलून नविन मशीन व पॅनेल बसविणेकामी प्रत्येक लिफ्टकरीता रक्कम रुपये 9,83,900/- प्रमाणे एकूण 3 लिफ्टकरीता रुपये 29,51,700/- इतका खर्च कळविलेला होता. यामध्ये करावे लागणारे सिव्हील वर्क (पहाड बांधणे, मशीनचे रुममध्ये नविन आय बीम बसविणे, पी.सी.सी./ प्लॅस्टर करणे वगैरे) व जुने मशीन डिसमेंटल करणे, अनलोडींग करणे, डक्टमधील वायरींग काम तसेच महाराष्ट्र शासनाची (लिफ्ट इन्स्पेक्टर) परवानगी घेणे या खर्चाचा समावेश केलेला

नसल्याने या कामास अंदाजे रक्कम रुपये 3,00,000/- जादा खर्च करावे लागणार होते. शिवाय जर कॅबीनवरील स्ट्रक्चर हे ओटीस कंपनीच्या मशीनशी मॅच झाले नाही तर पुन्हा ओटीस कंपनीकडून आणखी जादा रकमेची मागणी होण्याची शक्यता होती. त्यामुळे मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 24/07/2011 रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. 53, निर्णय क्र. 544 अन्वये सदर लिफ्टकरीता ओटीस बरोबरच मे. कोने, मे. जॉन्सन, मे. शिडलर या इतर कंपन्याकडूनही या कामासाठी जर कोटेशन मागविले तर ऑडीटलाही अडचण येणार नाही. शिवाय बायबॅकबद्दल तसेच स्वयंचलित लिफ्टबाबत इतर कंपन्याचे ओपिनियन आपल्याला कळु शकेल असा निर्णय घेणेत येऊन ओटीस बरोबरच इतर कंपन्याकडूनही कोटेशन मागविणेस मान्यता मिळाली होती.

विद्युत विभागामार्फत मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (500 रुम) येथील थायसेनकृप कंपनीच्या 7 नग लिफ्टची बायबॅक रक्कम घसारा वजा जाता पुढीलप्रमाणे ठरविण्यात आलेली होती :

| अ.क्र. | ठिकाण | लिफ्टची एकूण खरेदी किंमत रुपये | बायबॅक किंमत रुपये |
|---|---|---|---|
| 1. | साईबाबा भक्तनिवासस्थान (एकूण 4 लिफ्ट) | 19,88,000/- | 11,18,250/- |
| 2. | साईबाबा हॉस्पीटल (एकूण 3 लिफ्ट) | 19,08,000/- | 10,73,250/- |
| | | **एकूण बायबॅकची किंमत :** | **21,91,500/-** |

त्यानुसार श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच साईबाब भक्तनिवास्थान (500 रुम) येथील थायसेनकृप कंपनीच्या लिफ्ट बायबॅक देऊन त्याठिकाणी नविन स्वयंचलित लिफ्ट बसविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेत आलेल्या होत्या. या निविदा मागवितांना निविदेवर बायबॅकचा ठळकपणे उल्लेख केलेला होता. प्राप्त झालेल्या निविदा उघडून मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 14/01/2012 रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं. 17, निर्णय क्र. 17 अन्वये मे.जॉन्सन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांचे शिर्डी येथे सर्व्हीस सेटंर व कार्यालय असलेमुळे व दुरुस्तीसाठी त्यांचा शिर्डी येथे 24 तास तंत्रज्ञ उपलब्ध असल्याने मे. जॉन्सन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांचे दर मान्य करणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असा मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय झाला. या निर्णयातही कुठेही बायबॅकसाठी शासन मान्यता घेण्यात यावी, असा निर्णय झालेला नाही.

त्यानुसार विद्युत विभागामार्फत जा.नं. एसएसएस/विद्युत/5729/2012 दिनांक 13/02/2012 अन्वये मे. जॉन्सन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. मे. जॉन्सन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांनी काम पूर्ण केलेले असून, सदर केलेल्या अंतिम बील बदा करणेबाबत मेकॅनिकल विभाग यांचेमार्फत टिपणी सादर करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटल येथे 3 लिफ्ट तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (500 रुम) येथे 4 अशा एकूण थायसेनकृप कंपनीच्या लिफ्ट वारंवार नादुरुस्त होऊन बंद पडत असल्याने त्या बायबॅक करुन त्याठिकाणी स्वयंचलीत लिफ्ट बसविण्याचे विभागामार्फत ठरलेले नसून दिनांक 08/07/2011 रोजी मा. व्यवस्थापन समितीचे झालेल्या सभेत मा. विश्वस्तांनी सूचना मांडलेली होती. त्यावर निर्णय होऊन थायसेनकृप कंपनीच्या लिफ्ट बायबॅक करुन त्याठिकाणी नविन स्वयंचलित लिफ्ट बसविणेबाबत [ निर्णय क्र. 611(1) ] निर्णय झाला.

त्यानुसार उपरोक्त झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत सदरचा ठराव व निर्णयाची प्रत विद्युत विभागाकडे सादर करण्यात आलेली होती. मा. व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे ही संबंधीत विभागाची जबाबदारी असल्याने त्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे, जर मा. व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी संबंधीत विभागामार्फत झाली नसती किंवा या निर्णयाचे विरोधात टिपणी केली तर त्याबाबत संबंधीत विभागास जबाबदार धरण्यात येऊन त्या विभागावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात आली असती.

त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल येथील 3 लिफ्ट तसेच साईबाबा भक्तनिवास्थान (500 रुम) येथील 4 लिफ्ट अशा एकूण थायसेनकृप कंपनीच्या 7 लिफ्ट बायबॅक करुन त्याठिकाणी नविन स्वयंचलित अशा मे. जॉन्सन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांच्या लिफ्ट बसविण्यात आलेल्या आहेत.

विद्युत विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीसमोर वेळोवेळी सादर करण्यात आलेल्या ठरावामध्ये बायबॅकचा स्पष्ट उल्लेख असून शासन मान्यतेबाबत कुठलेही निर्देश मा.व्यवस्थापन समितीच्या ठरावात नाहीत. तसेच मे.जॉन्सन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांनी वेळोवेळी सादर केलेली बील आदा करतांनाही त्यामध्ये बायबॅक करणेबाबत उल्लेख करण्यात आलेला होता. परंतु त्यावर मा. ऑडीटर यांनीही कोणताही आक्षेप घेतलेला नाही.

आता सादर झालेल्या बीलावर "बायबॅकची रक्कम रुपये 50,000/- पेक्षा अधिक होती. त्यामुळे त्यास शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक होते. तथापि त्याची पुर्तता न करता प्रस्ताव कार्यान्वित करण्यात आलेला आहे. सदरची बाब व्यवस्थापन समितीच्या निदर्शनास आणुन समितीच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करता येईल" असा शेरा असून त्यानुसार शासनाकडे बायबॅकच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा लागणार आहे. परंतु प्रशासन शाखेकडून दिनांक 24/04/2010 रोजी प्राप्त झालेल्या पत्रामध्ये दिनांक 27/01/2010 रोजी समिती सभागृह मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या सभेमध्ये विषय सूचीवरील चर्चेव्यतिरीक्त मा.मंत्री (विधी व न्याय) यांनी "संस्थानने कोणत्याही योजना राबविण्यापूर्वी आवश्यकतेनुसार शासनाची पूर्वमान्यता घ्यावी. शासन स्तरावरुन कार्योत्तर मंजूरी दिली जाणार नाही. त्याअनुषंगाने ज्या योजनांसाठी शासनाची पुर्वमान्यता आवश्यक आहे अशा योजना/ खर्च शासनाकडून अगोदरच मंजूर करुन घेण्यात यावेत" अशा सूचना वेळोवेळी दिलेल्या असल्याचे कळविले आहे.

तरी याबाबत शासनाची कार्योत्तर मान्यता घेणेसाठी मार्गदर्शन होणेस तसेच मे.जॉन्सन लिफ्टस प्रा. लि., पुणे यांचे बीलाची राहीलेली रक्कम अदा करणेबाबत प्रस्ताव सादर करत आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४२३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामीचे मे.जॉन्सन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांचे उर्वरित अंतीम बील अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल येथील ०३ लिफ्ट तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५००) येथील ०४ लिफ्ट अशा एकूण ०७ लिफ्ट बायबॅक करण्यात आलेल्या आहेत, त्यास कार्योत्तर मान्यता घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.५३ **जुने प्रसादालय येथील कॅन्टीन किचनकरीता एल.पी.गॅस पाईप लाईन बसविणेबाबत.**

प्रस्ताव- **सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 14 (भाग 4)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयममधील 14(2-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविक:-** संदर्भीय आदेशान्वये श्री साई प्रसादालयामध्ये असलेली चहा, कॉफी व दुध तयार करण्याचे कॅन्टीन किचन पुर्वीचे जुन्या प्रसादालयामध्ये स्थलांतरीत करावयाची असलेने मेकॅनिकल विभागामार्फत गॅस पाईप लाईन करुन देणेबाबत कळविलेले आहे.

माहे जुलै, 2015 मध्ये कॅन्टीन व लाडू किचन नविन प्रसादालयात स्थलांतरीत करण्यात आले होते. तसेच सदरच्या ठिकाणी कुंभमेळा कालावधीत वाढीव दर्शनलाईन करावयाची असल्याने तेथील गॅसची पाईपलाईन काढून टाकण्यात आली आहे. सदरच्या चांगल्या पाईपाचा वापर नविन प्रसादालयात कॅन्टीन व पत्रा शेडमधे लाडू किचनसाठी करण्यात आलेला आहे.

संदर्भीय आदेशान्वये कॅन्टीनकरीता नविन गॅस पाईप लाईन तयार करावी लागणार असल्याने, त्यासाठी अंदाजे खालीलप्रमाणे मटेरीयलचा खर्च अपेक्षित आहे:

| Sr. No. | Description | QTY | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MS Pipe sd 40 Seamless 1' | 180 | feet | 60/- | 10800/- |
| 2 | Ball Valve 1' 150# F.E. | 2 | Nos. | 3750/- | 7500/- |
| 3 | Pressure Gauge "4" 4kg Capacity 3/8' | 1 | Nos | 725/- | 725/- |
| 4 | MS Socket Bend "1" Welded | 10 | nos. | 65/- | 650/- |
| 5 | 'M Clamp 1" | 35 | | 45/- | 1575/- |
| 6 | MS Pipe sd 40 Seamless ½' | 20 | feet | 40/- | 800/- |
| 7 | MS Socket Bend ½' Welded | 10 | Nos | 45/- | 450/- |
| 8 | 'M Clamp ½' | 14 | Nos | 35/- | 490/- |
| 9 | Needle Control Valve 3/8' | 8 | Nos | 225/- | 1800/- |
| 10 | MS Elbow 3/8' | 1 | Nos | 135/- | 135/- |
| 11 | MS Adaptor 3/8' | 8 | Nos | 45/- | 360/- |
| 12 | Copper Burner Pigtail 60" long 3/8' | 7 | Nos | 660/- | 4620/- |
| 13 | MS Flanges 1' 150# | 2 | Nos. | 325/- | 650/- |
| 14 | MS 'T' Connection seamless | 1 | no | 325/- | 325/- |
| 15 | Installation, Welding, Colorings, testing | 1 | Job | 19000/- | 19000/- |
| | | | | **Total** | **49880/-** |

**मागणी**– उपरोक्तप्रमाणे पाईपलाईन तयार करणेकामी अंदाजे रक्कम रुपये 49880/- पर्यत खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खर्चास मा.त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेऊन विहीत पध्दतीने एक्सप्लोझीव्ह विभागाचे मान्यता प्राप्त एजन्सी यांचेकडून निविदा मागविता येतील.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** तरी जुने प्रसादालयात कॅन्टीनकरीता एल.पी. गॅस पाईप लाईन विहीत पद्धतीने करुन घेणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये 49,880/- (अक्षरी रुपये एकोणपन्नास हजार आठशे ऐंशी मात्र) पर्यतच्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरील विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.४२४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालय येथील कॅन्टीन किचनकरीता एल.पी.गॅस पाईप लाईन बसविणेकामी एक्सप्लोझीव्ह विभागाचे मान्यता प्राप्त एजन्सींकडून विहीत पध्दतीने कोटेशन्सची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४९,८८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.५४ **विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या भक्तांना आवश्यक त्या पायाभूत सेवा-सुविधा पुरविणेकामी सध्या एकूण ३८ विभाग कार्यरत आहेत. मंजुर आकृतीबंधात प्रत्येक विभागातील कर्मचा-यांकडून काम करुन घेणेसाठी अधिक्षक/ विभाग प्रमुख या पदाची निर्मीती करण्यात आलेली आहे.

सध्यस्थितीस संस्थानचे स्थायी पदावरील विधी अधिकारी, श्री.सुभाष नारायण चित्रे हे दि.३०/०९/२०१५ रोजी व कनिष्ठ कामगार अधिकारी, श्री मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर हे दि.३१/०५/२०१५ रोजी त्यांचे विहीत वयोमान ६० वर्ष पूर्ण केल्याने संस्थान सेवेतून सेवानिवृत्त होणार / झाले आहेत. त्यामुळे विधी अधिकारी व क.कामगार अधिकारी ही पदे रिक्त होणार / झाले आहेत.

तसेच तत्कालीन कामगार अधिकारी, श्री.एस.व्ही.गमे यांना प्रशासकीयअधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आलेली असल्याने कामगार अधिकारी हे पद रिक्त झालेले आहे. सध्यस्थितीत कामगार अधिकारी या पदाचा प्रभारी कार्यभार मनुष्यबळ व्यवस्थापक, श्री.आर.बी.नवले यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.

"सदरची रिक्त पदे तातडीने भरणकामी यापुर्वी आस्थापना विभागकडून दि.२३/०४/२०१५ व दि.२८/०४/२०१५ रोजी टिपणीसादर करण्यात आलेल होती. सदर टिपणीस अनुसरुन तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचेशी दि.१३/०५/२०१५ रोजी समक्ष चर्चा केली असता, मंजुर आकृतीबंधानुसार ज्या ज्या पदांची वेतनश्रेणी, शैक्षणिक पात्रता समान आहे. जी पदे समकक्ष पदावर बदलीस पात्र आहेत. अशा सर्व पदांचे संवर्ग तयार करण्यात यावे. त्यानंतर त्यांची सेवाज्येष्ठता यादी तयार केल्यानंतरजात प्रवर्गानुसार रोष्टर अंतिम करुन पुढील प्रक्रिया करता येईल, असे तोंडी निर्देश दिलेले आहेत. "

छोटया संवर्गातील आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.बीसीसी-२००/प्र.क्र.२२/२०००/१६ बदि.१९/०५/२००३ सोबत जोडला आहे. त्यानुसार ज्या पदांची संख्या एक आहे. अशा पदांना जात प्रवर्ग आरक्षण लागू होत नाही. तसेच संस्थानचे दैनदिन कामकाजात सुसूत्रता रहावीया हेतून विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी हे तीन पदे सरळसेवेने भरणे तातडीने आवश्यक आहे.

**मंजुर आकृतीबंधनुसार रिक्त होणा-या पदांचीमाहिती खालीलप्रमाणे**

| पदनाम | वेतनबँड अधिक ग्रेड पे | पदसंख्या | मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने पूर्वप्रसिध्द केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार शैक्षणिक पात्रता. |
|---|---|---|---|
| विधी अधिकारी | ९३००-३४८०० + ४४०० | ०१ | Age not more than 35 years.<br>Law Graduate from any Government recognized University;<br>MS-CIT or Government prescribed equivalent computer operating course;<br>Experience of 5 years. |
| कामगार अधिकारी | ९३००-३४८०० + ४४०० | ०१ | Age not more than 33 years.<br>Graduate with MSW OR MBA (HR) from Government recognized University;<br>D.L.L. & L.W. From Government recognized University;<br>MS-CIT or Government prescribed equivalent computer operating course;<br>Experience of 5 years in Labour matters. |
| कनिष्ठ कामगार अधिकारी | ५२००-२०२०० + २८०० | ०१ | Age not more than 33 years.<br>Graduate with MSW OR MBA (HR) from Government recognized University;<br>D.L.L & L.W. From Government recognized University<br>MS-CIT or Government prescribed equivalent computer operating course;<br>Experience of 3 years in Labour matters. |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे आस्थापनेवरील कर्मचारी आकृतीबंधास शासन निर्णय क्रमांक- सासंवि – २००९/४३३/(३७/०९)का.सोळा.मंत्रालय मुंबई ३२, दि.०७/०८/२००९ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर शासन निर्णयात खालीलप्रमाणे शर्ती-अटी नमूद केलेल्या आहेत.

**अट-शर्त क्र.(१)** समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासनाची मान्यत घ्यावी.तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

**अट-शर्त क्र.(२)** सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यत यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

**अट-शर्त क्र.(३)** सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

**अट-शर्त क्र.(१०)** तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

मंजुर आकृतीबंधातील अटी-शर्तीस अनुसरुन सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आलेले असून मा.व्यस्थापन समिती दि.२७/०७/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२३ नुसार जा.क्र.एसएसएस /साप्रशा/आस्था/२०२५/२०१५ दि.२७/०८/२०१५ चे परिपत्रकान्वये पूर्व प्रसिध्द करुन हरकती मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर सदरचे सेवाप्रवेश नियम अंतिम करुन मा.त्रिसदस्य समितीचे मान्यतेने शासनास सादर करण्यात येणार आहेत.

तसेच अधिनियमातील तरतूदीस अनुसरुन संस्थानसाठी दि.०१/०१/२०१५ पासून लागू केलेल्या सर्व साधारण सेवा अटी विनियम, २०१३ मधील कलम १२ सेवाप्रवेश मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

- समिती ओदशाव्दारा विविध गटातील आणि प्रवर्गातील सेवा प्रवेशाचे धोरण आणि पध्दत घालुन देईल आणि उमेदवाराने भरावयाचा अर्ज नमुना किंवा नमुने आणि अशा अर्जांनी जोडावयाची प्रमाणपत्रे आणि प्रमाणलेख विहीत करेल.
- संस्थानचे नियुक्ती प्राधिकारी संस्थानच्या सेवेत सेवाप्रवेश आयोजित करताना वेळोवेळी महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, अपंग व्यक्ती, माजी सैनिक, या प्रवर्गातील उमेदवारांच्या किंवा शासनाने विहीत केलेल्या इतर प्रवर्गातील उमेदवारांच्या शासकीय सेवा प्रवर्गाशी निगडीत वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशाचे पालन करतील.

पूर्व प्रसिध्द केलेले सेवाप्रवेश नियम अंतिम करुन मा. त्रिसदस्य समितीचे मान्यतेने शासनास सादर करुन मान्यता मिळालेनंतर पदांचे संवर्ग, एकल पदांची निश्चिती, सेवाज्येष्ठता यादी व जात-प्रवर्गानुसार बिंदु नामावली तयार करणेची कार्यवाही करावयाची आहे.

विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) अधिनियम, २००४ चे कलम ५ मधील पोट-कलम (१), (२) तरतुदीस अनुसरुन दि.२७ मार्च २०१२ रोजीचे अधिसूचने अन्वये १५ सदस्सीय व्यवस्थापन समितीचे गठन करणेतआले होत. तथापी, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने सदरचे अधिसूचनेस तात्पुरती स्थगिती दिलेली आहे.

त्यानंतर मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार दि.३०/०३/२०१२ पासून श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे कामकाज पहाणेसाठी त्रिसदस्य समितीचे गठन करणेत आलेले आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेडील सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ IN PIL No.18/2011 मध्ये दि.१६ ऑक्टोबर २०१२ च्या आदेशात पॅरा (६) (d) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

(d) Shall not take steps to recruit staff, employees in regular vacancies.

मंजुर आकृतीबंधानुसार पूर्व प्रसिध्द केलेल्या भरती विनियमात सरळसेवा व पदोन्नतीने पदे भरण्याचे प्रमाणे ५० : ५० दर्शविले आहे.

उपरोक्त नमूद बाबींचा विचार करता विधी अधिकारी, कनिष्ठ कामगार अधिकारी तसेच कामगार अधिकारी असे एकूण तीन पदे मंजुर आकृतीबंधातील अटी-शर्ती व ज्या त्या विभागाचे प्रशासकीय कामाची गरज विचारात घेऊन सरळसेवेने भरणेची कार्यवाही करावी लागणार आहे. त्याकामी सदरचे प्रस्तावास मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे अंतिम मान्यतेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन सादर करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही रिक्त पदे सरळसेवेने भरणेकामीच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता घेणेसाठी संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.५५** **मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी तांत्रिक/ अतांत्रिक पदे सरळसेवेने भरती करणेकामी सादर केलेल्या पडताळणी अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** मंजुर आकृतीबंधानुसार विविध तांत्रिक/अतांत्रिक विभाग प्रमुखांची रिक्त पदे सरळसेवेने भरणेकामी आलेल्या अर्जांची पडताळणी करुन पात्र उमेदवारांच्या परिक्षेचे तसेच मुलाखतीचे आयोजन करणेचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर समितीने खालीलप्रमाणे निर्णय क्र.१० घेतलेला आहे.

"मंजुर आकृतीबंधानुसार विविध तांत्रिक/अतांत्रिक विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरणेकामी आलेल्या अर्जांची पडताळणी करणे, पात्र उमेदवारांची १०० गुणांची परीक्षा घेऊन Merit नुसार मुलाखतीचे आयोजन करणेकामी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, शिवाजीनगर, पुणे यांचा प्रस्ताव स्वीकारणेत येऊन याकामी येणा-या रक्कम रु.१,२१,०००/- + सेवाकर मात्र आगाऊ मानधन त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली."

समितीचे निर्णयास अनुसरून संबंधीत कामाचा कार्यादेश कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना देण्यात आलेला आहे. त्यानंतर जाहीरातीनुसार संस्थानला प्राप्त झालेले २४२ अर्जांचे पदनिहाय तपशिलवार माहितीचे तक्ते तयार करुन अर्जदाराने अर्जासोबत जोडलेल्या शैक्षणिक, व्यवसायिक तसेच अनुभव प्रमाणपत्रांची पडताळणी करुन लेखी परिक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांची यादी संस्थानला सादर करणेकामी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडे दि.१४/०३/२०१५ रोजी समक्ष पुणे येथे पोहोच करण्यात आलेले होते.

त्यानंतर कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी संस्थानने सादर केलेल्या अर्जांची पडताळणी करुन लेखी परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवारांची यादी दि.०९/०४/२०१५ रोजी संस्थानला सादर केलेली होती.

परंतु, मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी संस्थानला सादर केलेल्या अहवालात त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्याने पुनःश्च पडताळणीसाठी दि.२५/०४/२०१५ रोजी आलेले २४२ अर्ज व तपशिलवार तक्ते मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडे समक्ष नेऊन यापुर्वीचे अहवालातील त्रुटींबाबत समक्ष चर्चा करुन अंतिम अहवाल दि.२५/०४/२०१५ रोजी समक्ष ताब्यात घेतलेला आहे.

मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी पुनःश्च पडताळणी करुन दि.२५/०४/२०१५ रोजी पात्र-अपात्र उमेदवारांची यादी सादर केलेली आहे. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | पदनाम | एकूण अर्ज | पात्र संख्या | अपात्र संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | कार्यकारी अभियंता (Executive Engineer) | 23 | 00 | 23 |
| ०२ | उप कार्यकारी अभियंता (पा.पुरवठा) (Dy.Executive Engineer-Water Supply) | 11 | 01 | 10 |
| ०३ | यांत्रिकी अभियंता (Mechanical Engineer) | 46 | 06 | 40 |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापक (I.T.Manager) | 73 | 02 | 71 |
| ०५ | इलेक्ट्रॉनिक्स अभियंता (ध्वनिक्षेपन व टेलीफोन) (Electronics Engineer) | 41 | 03 | 38 |
| ०६ | व्यवस्थापक (प्रसादालय) Manager (Prasadalay) | 48 | 04 | 44 |
| | **एकूण-** | **242** | **16** | **226** |

सदरचे कामासाठी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांना जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ५७९५/ २०१५ दि.२३/०२/२०१५ चे कार्यदेशानुसार ५०% रक्कम रु.६०,५००/- + सेवाकर (१२.३६%) एकूण रु.६७,९७८/- (अक्षरी रुपये सदुसष्ट हजार नऊशे अठयाहत्तर मात्र) लेखा विभागामार्फत संबंधीतांना अदा करण्यात आलेली आहे.

मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी उपरोक्त परिक्षेसाठी पात्र १६ उमेदवारांची पदनिहाय १०० गुणांची लेखी परिक्षा तसेच मुलाखती एकाच दिवशी घेऊन त्याची दिवशी लेखी परिक्षेचे पेपरची तपासणी करुन अंतिम निकालाची यादी सिलबंद करुन संस्थानचे ताब्यात देण्यात येईल, असे सांगितलेले आहे. प्रस्तुत विषयी यापुर्वी आस्थापना विभागाकडून दि.२९/०४/२०१५ रोजी टिपणी सादर करण्यात आलेली आहे. सदर टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी "मुलाखतीसाठी निवड समिती गठीत करण्याचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन (त्रिसदस्य) समितीचे समोर मान्यतेसाठी त्वरीत सादर करावा" तसेच कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या अहवालानुसार पात्र उमेदवारांची संख्या अगदीच कमी असल्याने जाहीरातीत नमुद केलेली शैक्षणिक पात्रता तपासून लोकल व राज्यस्तरीय दर्जाचे वर्तमान पत्रात पुनःश्च जाहीरात प्रसिध्द करणेकामी समितीपुढे प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश दिलेले आहेत.

यापुर्वी दि.०१, ०३ व ०४/११/२०१४ रोजी संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर तसेच दिव्य मराठी, ईपेपर, सामना व पुण्य नगरी या वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याची प्रत सोबत अवलोकनार्थ सादर केलेली आहे.



सदर जाहीरातीत अ.नं.४ आय.टी.मॅनेजर या पदासाठी 1) Age not more than 40 years; 2) B.E. Computer/ Electronics/ IT from Government recognized University. 3) Microsoft certified professional (MCP); 4) ITIL Certification. 5) Experience of minimum 5 years in a reputed organization. अशी शैक्षणिक पात्रता नमुद केलेली आहे. पडताळणी अहवालाचे निरीक्षण केले असता, असे निदर्शनास आले आहे की, Microsoft certified professional (MCP); व ITIL Certification अशी पात्रता नमुद केल्यामुळे जाहीरातीनुसार आय.टी.मॅनेजर या पदासाठी एकूण ७३ अर्ज येऊनही पात्र उमेदवारांची संख्या फक्त ०२ आहे. सदर परिक्षेचे प्रमाणपत्र हे खाजगी संस्थेकडून दिले जाते. आय.टी.मॅनेजर या पदासाठी सदर प्रमाणपत्राची आवश्यकता नसलेबाबत मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी तोंडी सांगितलेले आहे.

**(अ)** सबब, पुनःश्च जाहीरात देतांना आय.टी.मॅनेजर या पदासाठी 1) Age not more than 40 years; 2) B.E. Computer/ Electronics/ IT from Government recognized University. 3) Experience of minimum 5 years in a reputed organization. अशी शैक्षणिक पात्रता नमूद करता येईल, त्यास मान्यता असावी.

**(ब)** उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, पात्र उमेदवारांची संख्या अगदीच कमी असल्याने मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त तांत्रिक/अतांत्रिक विभाग प्रमुखांची सहा पदे सरळसेवेने भरणेकामी पुनःश्च लोकल तसेच राज्यस्तरीय वर्तमान पत्रात जाहीरात देणे तसेच जाहीरातीनुसार आलेल्या अर्जांचे तपशिलवार माहितीचे तक्ते तयार करुन, पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी निमंत्रीत करणेची कार्यवाही संस्थानमार्फत करता येईल, यासाठी पुनःश्च वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करणेकामी येणा-या खर्चास मान्यता असावी.

(क) तसेच मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेमार्फत पदनिहाय १०० गुणांच्या लेखी परिक्षेचे संस्थानचे उपसमिती समोर आयोजन करुन मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे ज्या त्या विषयाचे तज्ज्ञांना बोलावून मुलाखतीचे आयोजन करता येईल.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, पात्र उमेदवारांची संख्या अगदीच कमी असल्याने मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त तांत्रिक/अतांत्रिक विभाग प्रमुखांची सहा पदे सरळसेवेने भरणेकामी पुन:श्च लोकल तसेच राज्यस्तरीय वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं.५६ **श्री रामनवमी उत्सव-२०१५ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, व श्री पुण्यतिथी हे मुख्य उत्सव साजरा करण्यात येतात.

श्री रामनवमी उत्सव २०१५ चे खर्चाकरीता मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.३१/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.११ अन्वये रु.६०,५५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेनंतर सदर खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळालेली आहे. श्री रामनवमी उत्सव २०१५ साठी खालीलप्रमाणे प्रत्यक्षात खर्च झालेला आहे. तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.न | तपशिल | अंदाजपत्रकातील मंजूर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतूदी पेक्षा जादा खर्च | तरतूदी पेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप, कमानी खर्च | ८,३६,४१० | १४,३७,२८८ | ६,००,८७८ | - |
| २ | कलाकार बिदागी–कीर्तनकारासह | ५,६७,६०० | १४,५९८ | | ५,५३,००२ |
| ३ | भकतांना मिष्टान्न मजुरीसह | ८,००,८९९ | ५,६२,७६२ | | २,३८,१३७ |
| ४ | विद्युत रोषणाई | १०,००,००० | ९,९७,०१४ | | २,९८६ |
| ५ | निमंत्रण पत्रिका, पोस्टेज, उदीप्रसादासह, जाहिरात, बॅनर | १२,००,००० | १३,२०,९७५ | १,२०,९७५ | - |
| ६ | जादा कामगार | ३,००,००० | १,१८,३६३ | | १,८१,६३७- |
| ७ | पालख्या,पिण्याचे पाणी इ. | ६,००,००० | १,६८,१८६ | - | ४,३१,८१४ |
| ८ | कुस्ती हगामा | ७,००,००० | ६,९२,९०० | - | ७,१०० |
| ९ | इतर खर्च | ५०,०९१ | ५०,५९२ | ५०१ | - |
| | **एकुण** | **६०,५५,०००** | **५३,६२,६७८** | **७,२२,३५४** | **१४,१४,६७६** |

उपरोक्त तपशिल पाहता श्री रामनवमी उत्सव-२०१५ करिता रु.६०,५५,०००/- (रु. साठ लाख पंच्चावन्न हजार) मात्र मंजूर करण्यात आलेली आहे. या रक्कमेतून उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकुण रु.५३,६२,६७८/- (रु त्रेपन्न लाख बासष्ठ हजार सहाशे अठ्ठयात्तर) मात्र खर्च झालेला आहे.

तरी सदरचे प्रत्यक्षात झालेल्या एकुण खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२०१५ साठी प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

विषय नं.५७ **श्री विरभद्र महाराज, शिर्डी (बिरोबा बन) येथील कुस्ती हंगामासाठी रक्कम देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री.सर्जेराव भाऊराव काटकर व अन्य ४ शिर्डी ग्रामस्थ (श्री.विरभद्र यात्रा कमिटी, बिरेगांव बन, शिर्डी ) यांनी कळविले आहे की, "सालाबादप्रमाणे श्री विरभद्र यात्रा दि. २४/११/२०१५ ते दिं.२६/११/२०१५ या कालावधीत काच मंदिर बिरेगांव बन, शिर्डी येथे साजरी होणार आहे. मागील वर्षी आपल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून यात्रेतील कुस्ती हगामाकरीता रु.१ लाख रककम देण्यात आली होती. त्या बद्दल आम्ही ग्रामस्थ आपले आभारी आहोत.

तरी मागील वर्षीप्रमाणे याही वर्षी आपलेकडून विरभद्र यात्रा निमित्त दि. २६/११/२०१५ रोजी होणाया कुस्ती हगामाकरीता रु. १ लाख रक्कम मिळावी, ही नम्र विनंती." येणे प्रमाणे अर्ज असे.

दि.१७/११/२००४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.११९ नुसार एक विशेष बाब म्हणून विरभद्र यात्रा बन, शिर्डी यांना दि.२६/११/२०१४ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हगाम्यासाठी रु.२५ हजार रक्कम श्री.रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून देण्यात यावी, असे ठरल्याप्रमाणे रक्कम देणेत आली होती. तसेच त्यानंतर दरवर्षी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खालीलप्रमाणे रक्कम मंजूर करुन वाटणेत आलेली आहे.

| अ.नं. | सभेची तारीख व निर्णय क्र. | मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| १ | दि.१७/११/२००४, निर्णय क्र.११९ | २५,०००-०० | २४,४९९-०० |
| २ | दि.५/११/२००५, निर्णय क्र.७१२ | ५०,०००-०० | ४८,१५२-०० |
| ३ | दि.१४/१०/२००६,निर्णय क्र.८६६ | ५०,०००-०० | ४३,५३३-०० |
| ४ | दि.१८/११/२००७, निर्णय क्र.७८२ | ५०,०००-०० | ४९,०२०-०० |
| ५ | दि.३/१/२००८, निर्णय क्र.०४(१९) | ७५,०००-०० | ६४,०८०-०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | दि.७/११/२००९, निर्णय क्र.८६७ | ७५,०००-०० | ६९,५७०-०० |
| ७ | दि.२१/१०/२०१०,निर्णय क्र.९२३ | ७५,०००-०० | ७२,०८०-०० |
| ८ | दि.१४/१/२०१२, निर्णय क्र.१३१ | ७५,०००-०० | ७०,२७०-०० |
| ९ | दि.३०/११/२०१२,निर्णय क्र.९४८ | ७५,०००-०० | ७०,२७०.०० |
| १० | दि.२७/१०/२०१३,निर्णय क्र.८७२ | ७५,०००-०० | ७०,२७०-०० |
| ११ | दि.०६/११/२०१४,निर्णय क्र.९३७ | ७५.०००-०० | ६८,४९०-०० |

दिनांक. ६/११/२०१४ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.९३७ नुसार मागील वर्षी सदर कामी रु.७५,०००/- मात्रची आर्थिक मदत संस्थानमार्फत देण्यात आली होती. त्यापैकी रु.६८,४९०/- इतकी रक्कम बिदागी म्हणून वाटली असून उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा-नांवे करण्यात आलेली होती.

श्री.विरभद्र यात्रा कमिटी, बिरेगांव बन, शिर्डी यात्रेनिमित्ताने कुस्ती हगामासाठी रु.१,००,०००/- मागणी केलेली आहे. श्री.रामनवमी उत्सव प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पहिलवानांना बिदागी म्हणून रक्कम अदा करुन उर्वरीत रक्कम लेखाशाखेकडे जमा नावे करता येईल.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४२८ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री विरभद्र यात्रा कमिटी, बिरेगाव बन यांना यात्रेनिमित्ताने कुस्ती हगामासाठी मागील वर्षीप्रमाणे रु.७५०००/- मात्र रक्कम देण्यात यावी. तसेच सदर रक्कम संस्थानचा प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पहिलवानांना बिदागी म्हणून अदा करणेत यावी व उर्वरीत शिल्लक रक्कम लेखाशाखेकडे जमा नावे करणेत यावी.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.५८ चनाडाळ व मुग यांच्या बिलाबाबत.**
**विषय नं.५९ विद्युत विभागाचे वार्षिक साहित्य खरेदीबाबत.**
**विषय नं.६० कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदी करणेबाबत.**
**विषय नं.६१ साईआश्रम विभागाकरीता बेडशीट व उशीकव्हर खरेदी करणेबाबत**
**निर्णय क्र.४२९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६२ प्रसादालयाकरीता गहु खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयाकरीता माहे जुलै-२०१५ ते सप्टेंबर-२०१५ गहु आटयाची मागणी पुर्ण झाल्याने पुढील कालावधीकरीता गहु आटा खरेदीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८.०९.२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार "श्री साई प्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसाद भोजन पुरविणेकरीता मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव यांचेकडून रु.२,०५१/- मात्र प्रति क्विंटल या दराने एक महिना कालावधीसाठी आवश्यक असलेला गहू आटा खरेदी करण्यात यावा, तसेच प्रसाद भोजन पुरविणेकामी गव्हाचा वापर करण्याची शक्यता पडताळून पाहण्यासाठी वार्षीक किराणा खरेदीमधील गहू पुरवठ्याचा दर व आजचे बाजारभावातील गव्हाचा दर याचा तौलनिक अभ्यास करुन गहू खरेदी करावा किंवा कसे, याबाबतचा सविस्तर प्रस्ताव समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत यावा," असा निर्णय झालेला आहे.

सदरच्या निर्णयानुसार माहे नोव्हेंबर-२०१५ ते मार्च-२०१६ या कालावधीसाठी गहु-४९६ खरेदीकामी सुरुवातीस जवळपास असणा-या कृषि उत्पन्न बाजार समित्यांकडून गव्हाचे सध्याचे दर मागवून, या दरांची सन २०१५-१६ (एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) चे निविदेतील मंजुर दराशी तुलना करुन त्यानंतरच गहु खरेदीबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा, असे मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी दिनांक १४.०९.२०१५ रोजी झालेल्या प्रत्यक्ष चर्चेत ठरले आहे.

वरील चर्चेमध्ये ठरल्याप्रमाणे गहु-४९६ चे सध्याचे बाजारभावाची मागणी करणेकामी साकुरी, कोपरगांव, राहुरी, श्रीरामपुर, संगमनेर या कृषि उत्पन्न बाजार समित्यांना इकडील जा.नं.३७१५/२०१५ दि.०५.१०.२०१५ रोजी समक्ष पत्र देण्यात आलेले होते.

त्यानुसार कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी त्यांचे दराबाबतचे पत्र सादर केलेले आहेत, सदरचे पत्र प्रशासकीय अधिकारी यांचेसमक्ष १३.१०.२०१५ रोजी उघडलेले आहेत, त्याचा तक्ता खालीलप्रमाणे–

| अ.नं. | कृषि उत्पन्न बाजार समितीचे नांव | आवक क्र./दिनांक | दर प्रती क्विंटल रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | कृषि उत्पन्न बाजार समिती, संगमनेर | १३६०१/०६.१०.१५ | रु.१,८००/- ते रु.२,००१/- पुर्ण क्लिन केलेला |
| ०२. | कृषि उत्पन्न बाजार समिती, श्रीरामपूर, | १३६०६/०६.१०.१५ | रु.१,४००/- ते रु.१,८४४/- |
| ०३. | कृषि उत्पन्न बाजार समिती, राहाता | १३७९४/०८.१०.१५ | रु.२,१५०/- ते रु.२,२५०/- पुर्ण साफ केलेला |
| ०४. | कृषि उत्पन्न बाजार समिती, कोपरगाव | १४०७१/१२.१०.१५ | रु.१,७००/- ते रु.१,८४०/- |
| ०५. | कृषि उत्पन्न बाजार समिती, राहुरी | १४११८/१३.१०.१५ | रु.१,६००/- ते रु.१,७५०/- |

उपरोक्त कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी दिलेले गहु-४९६ चे दर हे शेतक-यांकडून आवक झालेल्या गव्हाचे लिलावाने विक्रिचे असून संस्थानचे भांडार पोहचचे दर दिलेले नाहीत. सध्या मार्केटमध्ये आवश्यक तेवढया प्रमाणात गहु-४९६ ची आवक नसल्याचेही त्यांनी सागितले. संगमनेर व राहाता वगळता इतर कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी साफ न केलेल्या गहु-४९६ चे दर दिलेले आहेत. उर्वरित बाजार समित्यांनी संस्थानला स्वच्छ गहू घ्यावयाचा असल्यास व्यापा-यांकडूनच खरेदी करावा लागेल असे सांगितले आहे. तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून गव्हाचा हंगाम नसल्यामुळे व आवक कमी असल्यामुळे एकाच प्रतीचा गहू सध्या उपलब्ध होण्याची शक्यता कमी आहे.

सन २०१३-१४ या वर्षासाठी किराणा माल खरेदीचे मान्यतेसाठी सादर केलेले सिव्हील ॲप्लीकेशनवर मा.उच्च न्यायालयाने दि. ०५.०४.२०१३ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

"We direct that henceforth the Sansthan shall issue tenders throgh e-tendering/e-auction system in addition to publication of the tender in the leading newspapers widely circulated at national level and in state of Maharashtra."

त्यानंतर संस्थानकडून सदर निर्देशानुसार सर्व किराणा माल ई-निविदा पध्दतीनेच खरेदी केला जात आहे. संस्थानने सन २०१५-१६ सालासाठी किराणा माल खरेदी करतांना ई-निविदा पध्दतीने खरेदी करणेस प्रस्ताव सादर केला होता त्यास मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक २८.०५.२०१५ निर्णय क्रमांक १५८(२) नुसार सन २०१५-१६ चे ई-निविदेतील गहु-४९६ साठी मे.गुप्ता एंटरप्रायजेस, पुणे यांचे प्रती क्विंटल रु.२,१२१/- मात्र भांडार पोहचचे दर मान्य करण्यात आलेले आहेत. मात्र यावर्षी गहू आटा घेतल्यामुळे गहू खरेदीकामी पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही.

प्रसादालयाचे चालू वर्षाची गव्हाची वार्षिक मागणी ११,७०० क्विंटल विचारात घेता, संस्थानला नोव्हेंबर-१५ ते मार्च-१६ या उर्वरित ५ महिन्यांसाठी अंदाजे ५००० क्विंटल गहू खरेदी करावा लागेल.

मा.उच्च न्यायालयाने दिलेली पुर्वीची मान्यता ई-निविदा पध्दतीने खरेदी करण्याची असल्यामुळे, कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत गहू खरेदी करावयाचा असल्यास मोंढयावरुन लिलाव पध्दतीने खरेदी करावा लागेल व याकामी पुन्हा गहू खरेदीसाठी मा. उच्च न्यायालयाची मान्यता घ्यावी लागेल असे वाटते.

मे.गुप्ता एंटरप्रायझेस, पुणे यांना दि.१६.१०.२०१५ रोजी दुरध्वनीवरुन, वरील ई-निविदा मान्य दराने संस्थानला उर्वरीत कालावधीसाठी ५००० क्विंटल गहू देऊ शकतील काय? याबाबत विचारणा केली असता, त्यांनी सदर दराने गहू-४९६ चा पूरवठा करण्यास संमती दर्शवलेली आहे.

मे. गुप्ता एंटरप्रायझेस, पुणे यांचे गहू-४९६ प्रती क्विंटल दर २,१२१/- शिर्डी पोहच आहेत. तर कृषी उत्पन्न बाजार समिती, राहाता यांचे दर हे २,१५०/- ते २,२५०/- चे दरम्यान आहेत. तसेच इतर बाजार समित्यांचे दर १,४००/- ते २,०००/- दरम्यान आहेत. यामध्ये प्रती क्विंटल २ गोण्यांचा खर्च रु.१००/- + हमाली व तोलाई खर्च रु. ११/- तसेच वाहतूक खर्च, साफ करण्यासाठीचा खर्च वगैरे धरुन दोन्हीही प्रकारे खरेदी केल्यास दरांमध्ये फार थोडा फरक पडेल असे वाटते.

वरील नमूद वस्तुस्थिती विचारात घेता, उर्वरित ५ महिन्यांसाठी

(अ) गहू खरेदी कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत करावी अगर कसे ?

(ब) गहू-४९६ मे.गुप्ता एंटरप्रायझेस, पुणे यांचेकडून वरील मंजूर दराने खरेदी करावा अगर कसे ?

(क) गहू आटा मे.संतोष ट्रेडिंग कंपनी यांचेकडून चालू मंजूर दराने खरेदी करावा अगर कसे ?

तरी "अ" किंवा "ब" किंवा "क" बाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उचित निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेला गहु, सन २०१५-१६ चे वार्षिक किराणा माल खरेदी प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.गुप्ता एंटरप्रायझेस, पुणे यांचेकडून मंजूर दराने खरेदी करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६३** **सन २०१५-१६ गावरान तूप खरेदी.**

**विषय नं.६४** **देणगी रवा व आटयाबाबत.**

**निर्णय क्र.४३१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६५** **पोलिस विभाग, साई मंदीर सुरक्षा यांना वॉकीटॉकी व रिपीटर मशिन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईमंदीर सुरक्षेबाबत दि.16/10/2015 रोजी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षामध्ये सभा झाली असता सभेमध्ये पोलिस निरीक्षक साईमंदीर सुरक्षा यांनी मंदीर सुरक्षेकरीता 10 नग वॉकीटॉकीची मागणी केलेली आहे व साई मंदीर सुरक्षा जा.क्र.377/2015 दि.18/10/2015 चे पत्राने खालील तपशिलप्रमाणे व मॉडेलप्रमाणे वॉकीटॉकी व डिजीटल मशिन मिळणेबाबत कळविलेले आहे.

| अ.नं. | तपशिल | नग | अंदाजे प्रतिनग दर | अंदाजे एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| 01. | Motorola Digital repeater Model-XIR R 8200 | 01 | 1,22,954.95 | 1,22,954.95 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 02. | Motorola Digital repeater Model-XIR M 8268 | 01 | 26,907.62 | 26,907.62 |
| 03. | Motorola Digital Portable radio Model-XIR 8268 P | 10 | 26,396.76 | 2,63,967.60 |
| | | | एकुण रु. | 4,13,830.17 |
| | | | पुर्णांकित रु. | 4,13,830.00 |

पोलिस निरीक्षक, साई मंदीर सुरक्षा यांचे मागणीनुसार उपरोक्तप्रमाणे वॉकीटॉकी व रिपीटर मशिन पोलिस विभागास देणेसाठी अंदाजे रु.4,13,830.00 खर्च अपेक्षित आहे.

तरी पोलिस निरीक्षक, साई मंदीर सुरक्षा यांचे मागणी प्रमाणे वॉकीटॉकी व रिपीटर मशिन देणेकामी व त्याकामी येणारे अंदाजे रु.4,13,830/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पोलिस विभाग, साई मंदीर सुरक्षा यांना प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वॉकीटॉकी व रिपीटर मशिन देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.**

**तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.४,१३,८३०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.६६** **कुंभमेळा- २०१५ चे नियोजनाकामी खरेदी करण्यात आलेले सुरक्षा साहित्यांपैकी मुदतीत प्राप्त/ मुदतीनंतर प्राप्त/ आज अखेर प्राप्त न झालेले सुरक्षा साहित्यांबाबत.**

**विषय नं.६७** **श्री क्षेत्र शिर्डी साईबाबा संस्थान येथे पार पडलेल्या गुरुपौर्णिमा उत्सवामध्ये भाविकांच्या दर्शन व्यवस्थेतील त्रुटीबाबत कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.४३३** विषय नं.६६ व ६७ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ मधिल गर्दीचे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरांत साईभक्तांसाठी करण्यात आलेल्या अतिरिक्त सोई-सुविधांकरीता झालेल्या खर्चाचा अहवाल मा.उच्च न्यायालयापूढे सादर करणेकामी मूदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक असल्याने त्या अनुषंगाने संस्थानतर्फे गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधांमध्ये साईभक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, तात्पुरत्या स्वरूपाची निवासव्यस्था, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सावर्जनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, पाणीपूरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसादभोजन व्यवस्था, अल्पोपहार इत्यादी सोयी-सुविधा संस्थानतर्फे उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

त्या अनुषंगाने संस्थानचे संबधीत विभागांनी आपापले विभागामार्फत साईभक्तांना द्यावयाच्या अतिरिक्त सोई-सुविधांबाबतचे प्रस्ताव, अंदाजे खर्चाची रक्कम, विभागांना करावी लागणारी कार्यवाही इत्यादीबाबत अंदाजपत्रक सादर केले होते. संस्थानचे संबंधीत विभागांनी दिलेल्या अंदाजपत्रकीय खर्चाच्या एकत्रित प्रस्तावास मा.त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्र.०६ अन्वये नियोजित कामासाठी येणारे अंदाजे रू.५७,५४,८०,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू खर्चास परवानगी मिळणेसाठी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे समोरील रिट पिटीशन नं.१८/२०११ मध्ये सिव्हील अर्ज क्र.३५००/२०१५ अन्वये दाखल करण्यात आला होता. त्यास मा. उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजीचे सदरहू आदेशातील कलम ४ मध्ये याबाबत खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

"…….The Applicant shall see that no unnecessary expenses are made and shall maintain the separate account and on the culmination of the said Kumbhamela Festival, shall submit the accounts to the court regarding the expenses made, within a period of FOUR WEEKS from the date of culmination of the kumbhamela"

मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशान्वये कुंभमेळा कालावधीत झालेला खर्च ०४ आठवड्याच्या आत, म्हणजेच दि.२३/१०/२०१५ अखेरपर्यंत मा.न्यायालयात सादर करणे आवश्यक होते. तथापी अद्याप काही विभागांकडून सदर खर्चाची बिले अदा करणेची कार्यवाही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे सदरचा खर्च एकत्रित स्वरूपात मा. उच्च न्यायालयाकडे सादर करता आलेला नाही.

तरी कुंभमेळा कालावधीत केलेल्या खर्चाची माहिती ०४ आठवड्याच्या आत मा. उच्च न्यायालयाकडे सादर करणे शक्य झालेले नसल्याने संस्थानचे विधी विषयक सल्लागार श्री.चौकीदार यांचेमार्फत मा. उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद येथे मुदतवाढ मिळणेसाठी सिव्हील अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. याकामी संस्थानचे विविध विभागांमार्फत झालेल्या खर्चाची बिले अदा करणेची कार्यवाही पूर्ण झालेनंतर सर्व माहिती एकत्रित करून लेखाशाखा विभागामार्फत तपासणी करून मा.उच्च न्यायालयापूढे सादर करता येईल. त्यासाठी सुमारे दोन महिन्यांचा कालावधी लागेल असा अंदाज आहे.

तरी वरीलप्रमाणे दोन महिने मुदतवाढ मिळणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील अर्ज दाखल करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत.**

**निर्णय क्र.४३५** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

(१) त्रीसदस्य समितीच्या दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५१ अन्वये सालाबादप्रमाणे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव साजरा करणेस मान्यता देण्यात आली व त्यानिमित्त येणा-या अंदाजे रु.५२,४६,२००/- मात्रचे खर्चास संस्थान वकिलामार्फत तातडीने अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालयात सिव्हील अॅप्लीकेशन नं.१३२६८/ २०१५ दाखल करण्यात आले होते. या सिव्हील अॅप्लीकेशनवर मा.उच्च न्यालयाने दि.१५.१०.२०१५ रोजीचे आदेशाने निमंत्रण पत्रिका छपाई, स्टिकर, उदीप्रसाद भरणेचा मजुरी खर्च रु.५,००,०००/- मात्र व पत्रिका पोस्टेज खर्च रु.९,९६,०००/- मात्र वगळता उर्वरीत खर्चास मान्यता दिलेली आहे.

परंतु साईभक्तांना संस्थानचे सभासदत्व द्यावयाच्या फॉर्मवर, अजिव व आश्रयदाते सभासदांना वैयक्तीक रित्या तीनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व उत्सव संपल्यानंतर कोणताही आकार न घेता त्यांचे पत्त्यावर बाबांचा उदीप्रसाद मिळण्याचा हक्क राहील, अशी ग्वाही दिलेली आहे. (सध्या निमंत्रण पत्रिका व त्यासोबतच बाबांचा उदीप्रसाद पाठविला जात आहे, त्यामुळे एका वेळेच्या पोस्टेज व इतर खर्चात कपात झालेली आहे.) प्रस्तुत खर्च करणे अत्यावश्यक आहे, ही बाब मा.उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे. यासाठी संस्थान पॅनलवरील वकिलामार्फत मा.उच्च न्यायालयामध्ये पुनःर्विचार याचिका अर्ज दाखल करणेत यावा. तसेच पुण्यतिथी उत्सव- २०१५ निमित्ताने भक्तमंडळ सभासदांना उदी-प्रसादासह निमंत्रण पत्रिका पाठविणेसाठी एकत्रित रु.१३,९२,४०९/- (निमंत्रण पत्रिका छपाई, स्टिकर, उदीप्रसाद भरणेचा मजुरी खर्च रु.४,२८,१९२/- व पत्रिका पोस्टेज खर्च रु.९,६४,२१७/-) मात्र झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबतचा उल्लेखही सदरहू अर्जामध्ये करणेत यावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५/ विधी अधिकारी)

---

वरील निर्णय क्र.३७६ ते ४३५ सर्वानुमते घेण्यात आला.

यानंतर सकाळी १०.४० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| (बाजीराव शिंदे) | (अनिल कवडे) | (श्रीकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**